UNIVERSAL
LIBRARY
OU_192479
UNIVERSAL
LIBRARY

नागपूर प्रकाशन क्र. ४१

# श ला का

( लघुकथा-संग्रह )

प्रा. वसंत अनन्त शहाणे,
एम्. ए., एल् एल्. बी.

नागपूर प्रकाशन

[ किं. २ रुपये

OUP—13—30-1-71—5,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No Accession No

Author

Title

This book should be returned on or before the date last marked below

नागपूर प्रकाशन क्र. ४१

# श ला का

( लघुकथा-संग्रह )

—•—

प्रा. वसंत अनन्त शहाणे,
एम्. ए., एल् एल्. बी.

१९५३ ]

नागपूर
प्रकाशन

[ किं. २ रुपये

प्रकाशकः—दि. मा. धुमाळ
नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर

प्रथमावृत्ति, मार्च, १९५३.
सर्व हक्क प्रकाशकाधीन
मुखपृष्ठावरील चित्रः श्री. शंकरराव आळंदकर, हैद्राबाद.

मुद्रकः—ल. म. पटले
रामेश्वर प्रिंटिंग प्रेस, नागपूर

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | अन्तर हें अनिवार ... ... ... | ५ |
| २. | विशाल हृदय ... ... ... | १६ |
| ३. | बढती ... ... ... ... | २६ |
| ४. | खरं न वाटणारं सत्य ... ... ... | ३१ |
| ५. | पत्त्यांचा खेळ ... ... ... | ४२ |
| ६. | पोलिसी तर्कशास्त्र ... ... ... | ५१ |
| ७. | कामधेनु ... ... ... ... | ५४ |
| ८ | गंगाखेडकर... ... ... ... | ६२ |
| ९. | लपलेला प्रकाश ... ... ... | ६८ |
| १०. | एक रात्र अन् एक दिवस... ... ... | ७७ |
| ११. | क्रीमची करामत ... ... ... | ९६ |

# ना ग पू र प्र का श न

## सी ता ब र्डी, ना ग पू र

★

# प्रकाशित वाङ्मय

| | | |
|---|---|---|
| १ | माझें कादंबरी लेखन | १।। |
| २ | वीणा | ३. |
| ३ | लढवय्ये | ३ |
| ४ | शककर्ता शालिवाहन | २।। |
| ५ | परामर्श | ३ |
| ६ | प्रमद्वरा | २।। |
| ७ | द्राविडी प्राणायाम | २। |
| ८ | अमावास्या | २।। |
| ९ | कंगाल | १। |
| १० | अडेलतट्टू | ४ |
| ११ | प्रत्यय | २।। |
| १२ | पुनः एकदां | ४ |
| १३ | माझी शीला | १।। |
| १४ | मृगाचा पाऊस | २ |
| १५ | दोन घडीचा डाव | ३। |
| १६ | म्हणे लढाई संपली | १।। |
| १७ | लांब लांब सांवल्या | २ |
| १८ | तेरी चूप मेरी चूप | २ |
| १९ | दोन प्रख्यात युद्धतंत्रे | २ |
| २० | सन १८५७ चे स्वा. यु. | -।।- |
| २१ | नवीं मूल्यें | ४ |
| २२ | सखी | ३। |
| २३ | सावलीच्या उन्हांत | ३ |
| २४ | जीवनप्रवाह | २।। |
| २५ | हंसदूत | २। |
| २६ | मार्क्सवादी अभ्यासक्रम | १।। |
| २७ | तिसरें राज्य | -।।= |
| २८ | इंदिरा | २।।। |
| २९ | गोल देऊळ | ३ |
| ३० | दूर कुठें तरी | २।।। |
| ३१ | जगाला कळलं पाहिजे | ३।। |
| ३२ | कालसमुद्रांतील रत्नें | ४ |
| ३३ | लकेरी | २।। |
| ३४ | मधु | २।। |
| ३५ | विचित्रिता | २ |
| ३६ | पहिला कवि | १।।। |
| ३७ | शापित आणि उःशापित | २ |
| ३८ | कोणी कुणाचें नव्हे | ५ |
| ३९ | रान गुलाब | २।। |
| ४० | मी एकटीच जाणार | ३ |
| ४१ | शलाका | २ |

# १. अंतर हें अनिवार !

पडदा न पाळणारी मुसलमान मुलगी हा जर एक "हैद्राबादी आश्चर्याचा" प्रकार आहे, तर दोन शेपटे सोडून आपल्या हिरव्या ओढणीला अविरतपणें हवेंत विहरूं देणारी अन् सायंकाळच्या प्रहरीं टँकबंडवरून सायकलवर भटकणारी मुस्लिम षोडषी एखाद्या ' बादळाची ' नायिका न ठरली तरच नवल !

पण नसीमला त्याची पर्वा नव्हती !

कीज गर्ल्स स्कूलच्या बागेंतल्या सायकल स्टँडमधून हलकेच तिनें आपली ' लेडीज ' बाहेर काढली अन् पट्टेवाल्याच्या 'अदाबे-अर्ज बेगमसाहेबा' या ठरलेल्या अभिवादनाचा नेहमींप्रमाणें किंचित् मान लववून स्वीकार करीत पॅडलवर पाय देण्याच्या पंचायतींत न पडतां एकदम तिनें सीटवर जवळ जवळ उडीच मारली ! आज शाळा केव्हा सुटते असें तिला होऊन गेलें होतें. साडेचार होऊन गेले होते ! बँक स्ट्रीट ओलांडून ती ऑक्सफर्ड स्ट्रीटच्या रस्त्याला लागली. आतां जेम्स स्ट्रीट ओलांडून पुढें गेलें कीं, जीरा मैदान ! सिकंदराबादेच्या जीरा विभागांत नबाब रहमतयारजंग यांचा ग्रीष्म-निवास होता. उन्हाळा सुरूं झाला कीं, नबाबसाहेबांचं कुटुंब हैद्राबादेच्या आपल्या टोलेजंग गढींतून सिकंदराबादेच्या या ' ग्रीष्म-निवासांत ' मुक्कामाला येत असे ! कारण हैद्राबाद अन् सिकंदराबाद या शहरांना जोडणारा ' हुसेन-सागर ' आजपावेतों अनेक नबाबांच्या तब्येतींची आग निववीत आला होता ! हुसेन-सागरच्या कोपऱ्यावरचें मैदान म्हणजे जणुं सिकंदराबादेची चौपाटी होती ! अन् मैलभराच्या ' टँक बंड ' चा तो कट्टा ! हैद्राबादेचें अपोलो बंदरच जणुं ! रहमतयारजंग अन् त्यांच्या बेगम नरगिससाहेबा यांना सिकंदराबाद फार आवडत होतें. त्यांचें सगळेंच कुटुंब हैद्राबादेची ती भव्य पुराणी गढी सोडून

सध्यांपुरतं तरी या 'ग्रीष्म–निवासा'त राहायला आलें होतें. हैद्राबाद अन् सिकंदराबाद यांतलें अंतर पुरतें पांच मैल सुद्धां नसेल. पण नरगिसला तें पांच हजार मैलांपेक्षां जास्त वाटत होतें! हैद्राबादेची शान निराळी होती अन् सिकंदराबादेचा नूर न्यारा होता! हैद्राबादेच्या त्या प्रचंड दगडी देवडया, गजबजलेले पण घाणेरडे रस्ते, पानांच्या पिचकाऱ्या सतत सोडणारीं पडद्यामागचीं पात्रं, लुंगी अन् लाठी यांच्या विचित्र मिश्रणानें रंगलेले मुसलमान अन् त्यांचीं चहाचीं हॉटेलें! या सगळ्यांनीं जणुं हैद्राबादेला एखाद्या उकडहंडीचें स्वरूप देण्याचा निश्चय केला होता! अगदीं या उलट सिकंदराबाद! किती शांत न् किती रम्य! इथें पडद्यांतल सौंदर्याचे विकृत स्वप्न नव्हतें तर उजळ माथ्यानें वावरणाऱ्या बेगुमान सौंदर्याचे साक्षात्कार होत होते! किती निराळें जग! वेगळें वातावरण! साध्या सुंदर इमारती! झकपक दुकानें! तें ग्रीन्स अन् पॅराडाइज अन् पॅलेस! चित्रविचित्र चिनी उपहारगृहें! सिकंदराबादेंत विसावें शतक होतें, तर हैद्राबादेंत फसली सनाच्या रूपानें चौदाव्या शतकांतली सरंजामशाही आपला नगा नाच घालीत होती...

नसीम धांवतच दिवाणखान्यांत आली. तिनें सायकल फाटकांतच उभी केली होती. आंत जाऊन तिनें झटकन् कपडे बदलले, नवी ओढणी घेतली अन् मधल्या खोलींत कोचावर लवंडलेल्या नरगिसला ती धांदलीनें म्हणाली,

"अम्माजान! मैं चली!" (आई! निघालें मी!)

"अग नसीम? आलीस केव्हां न् चाललीस कुठे अशी एकदम? जरा सबूर! तुझे बाबाजान कचेरींतून यायचे आहेत अजून! पण तूं दमलीस किती शाळेच्या ओझ्याखालीं!"

"नाहीं अम्मा! पांच मिनिटांत आलें मी एवढा रस्ता कापून! आज स्टॅन्ले गर्ल्स स्कूलशीं मॅच आहे आमची! या हैद्राबादी पोरींना हात दाखविला पाहिजे चागला!"

"म्हणजे तूं हैद्राबादेची नाहीस कीं काय!"

" नाहीं बाई ! इश्श ! काय मेलं तें हैद्राबाद ! जिथं तिथं पडदपोशी अन् गुलपोशी ! "

" पण आपण तर आतां परत तिथं जाणार आहोंत. "

" काय ? काय म्हणतेस ? त्या देवडींत ? तिथं सायकल फिरवायला तरी जागा आहे का ? छेः ! आपण नाहीं येणार ? "

" म्हणजे ? .."

" म्हणजे...म्हणजे वाघाचे पंजे ! "

" ए, तुझ्या बाबाजानची गाडी घेऊन जा. एवढया मोठया पोरीनं सायकलवर बाहेर बसणे बरे दिसत नाहीं बाळ. "

" वा ग वा ! अम्माजान ! अशी ग तूं कशी ! एवढी इंग्लंडांत जाऊन आलेली ! अन् तूं नाहीं वाटतं बसत होतीस सायकलवर ? मला कोणाची भीति आहे ! मुस्कटांत लगावीन या उल्लू पोरांच्या ! रहमतयारजंगांची मुलगी आहे मी ! अन् म्हटलं तुझी पण !..."

नसीम खिदळत बॅडमिंटनची बॅट फिरवीत पायऱ्यांच्या रोखानें धांवली. नरगिस काय बोलणार ! नसीमच्या अल्लडपणापुढें तिच्यांतल्या मातृत्वाची जिव्हा लुळी पडत होती !

सायकलशेजारी जातांच पुनः मागें वळून नसीम म्हणाली,

" अम्माजान ! मला उशीर होईल हं परत यायला ! अन् मॅच जिंकली तर आम्ही प्लाझाला जाणार आहोंत शोला ! मी, जॉन अन् लुई ! अब्बाजानना म्हणावं तुम्ही दस्तरख्वान ( भोजन-वस्त्र ) वर बसून घ्या ! "

" असं काय करतेस ग नसीम ? तूं लहान नाहींस आतां बाळ ! असं बरं दिसत नाहीं आपल्याला ! आपण प्रतिष्ठित आहोंत ! हैद्राबादचे नबाब आहोंत आपण ! इथं तुझं एक ठीक आहे-पण, पण...हैद्राबादेंत सायकलवर हिंडूं नकोस तूं ! आतां गाडी येईल इतक्यांत ! "

"हें काय ग अम्माजान," मान वेळावून नसीम म्हणाली, "इतर मुली नाहीं वाटतं बाहेर जात ? त्या मराठी बोलणाऱ्या पोरी पाहा ! मला साडे-पांचच्या आंत पोंचलंच पाहिजे ॲबिड्सवर ! मी चाललें !"

नरगिसच्या उत्तराची वाटहि न पाहतां नसीमनें नेहमींप्रमाणें सायकलवर उडी मारली. नसीमच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात नरगिस किती तरी वेळ व्हरांड्यांत उभी होती भरभर सायकलवर दूरदूर जाणारी नसीमची ती पाठमोरी सुंदर आकृति ! नरगिसला वाटलं निसर्गानं आपल्या स्वैर जीवनाची स्मृतीच जणुं साकार केली आहे ! आपल्या भूतकाळांतल्या उच्छृंखल जीवनाचें रूपच जणूं निसर्गानें नसीमच्या रूपानें ओतलें आहे !

"असं बरं दिसत नाहीं आपल्याला ! आपण प्रतिष्ठित आहोंत !"

हेंच ते शब्द ! हेच ते उद्गार ! हेंच तें आक्रंदन !

वीस वर्षांपूर्वी—

हाच वेळ अन् हाच प्रसंग ! आतां उडणारें "ग्रैष्मनिवासांतलें" कारंजें आज बरोबर वीस वर्षांपूर्वी असेंच उडत होतें. पण नरगिस ? नरगिस किती बदलून गेली होती ! वीस वर्षांपूर्वीची नरगिस यौवनाच्या उच्छृंखल प्रांगणांत नुकतीच प्रवेश करीत होती. नरगिस हें फारसी कवीचं किती आवडतं फूल ! एकजात फारसी काव्यानं या नरगिसला आरती ओवाळली होती ! नरगिसला काय म्हणायचं ? जाईजुई, बकुल, मालती, मोगरा कीं गुलाब ? छेः ! छेः ! नरगिस म्हणजे हिरवा चाफा होता ! अगदीं मदनमस्त ! अक्षरशः मदनमस्त ! तिच्या नसानसांत तारुण्य उसळत होतं. तिचे उन्नत उरोज अन् गोबरे गाल ! त्या स्वरूपाचा तिला आतां हेवा वाटत होता. अन् तिचं अंतर?...

तें तर आतां पार बदलून गेलं होतं !

नरगिस नुकतीच इंग्लंडहून आली होती. शादी होतांच खऱ्या मधुचंद्राची मजा तिला बोटीवर बघायला मिळाली होती. रहमतयारजंग बॅरिस्ट-

रीच्या अभ्यासासाठीं विलायतेला जाऊन आले होते. रहमतयारजंग मोठा उमदा माणूस ! खरा हाडाचा नबाब ! फार मोठया मनाचा ! उदार अंतःकरणाचा उमराव ! नबाबसाहेबांनीं आप्तेष्टांच्या इच्छेविरुद्ध नरगिसलाहि इंग्लंडला नेलं होतं. नरगिसवर त्यांचं केवढं प्रेम ! तिच्यासाठीं किती जीव टाकायचे ते !

पण रहमतजंगची थंड प्रकृति नरगिसला आकृष्ट करूं शकली नव्हती !

नरगिसला प्रणयाची ऊब हवी होती ! त्याकरितां तिचे ओठ आसुसलेले होते ! मजा हीच तिची सृष्टि. हसावं, खेळावं, नाचावं, हेंच तिचं जग. खूप खावं, खूप प्यावं अन् नृत्यगृहांत धुंद करणाऱ्या संगीताच्या तालासरशीं नाचावं असं तिला उत्कटतेनं वाटे. तिनं लंडनचं कल्पनेतलं दृश्य पाहिलं होतं. पण तीं नृत्यगृहं, तो सिगारेटचा धूर अन् मद्याच्या उग्र दर्पानं उन्मत्त झालेलं वातावरण नरगिसच्या उसळत्या यौवनाला गप्प बसूं देईना. चोवीस तास नाचावं असं तिला वाटे तिथंच राहावं, कुठं कुठं जाऊं नये ! ··

पण रहमतयारजंगला तर नृत्याचा तिटकारा ! लिंकन्स इनमधलीं डिनर्स संपलीं कीं त्यांना हायसं वाटे ! अन् स्वतः नाचायचं ही कल्पनाच त्यांना भयंकर वाटे ! सगळ्यांच्या समोर ! कारण उमरावी रक्त त्यांच्या नसांत वहात होतं आपल्या श्रेष्ठ संस्कृतीची स्मृति त्यांना दूर सारतां येत नव्हती.

पण आपलं मनोगत त्यांनीं नरगिसपुढें कधींच उघडपणानं सांगितलं नाहीं. ते फार मोठया दिलाचे. नरगिसच्या सुखाच्या आड यायची कल्पना ? ती कल्पनाच त्यांना सहन होत नसे. उलट, "मला ती कला येत नसली म्हणून तुला येऊं नये असं थोडंच आहे ?" असं उत्तेजन देऊन धंदेवाईक नाचणाऱ्या-बरोबर नरगिसला ते नृत्य शिकवूं लागले.

कायद्यावरचीं व्याख्यानं संपतांच नरगिसबरोबर रहमतजंगांनाहि नृत्य-गृहाचा मार्ग सुधारावा लागे. रहमतजंग एका कोपऱ्यांत सोडा पीत बसत. अन् नरगिस ? रात्रीचा जसा एकेक टोला पडे तशी तिची धुंदी अधिकाधिक

वाढत होती. तिला कशाचंच भान राहात नसे. आपला देश, आपलं हैद्राबाद, आपला रहमत !··· सगळं सगळं ती विसरून जात असे ! रात्रीं दोन दोन वाजेपर्यंत रहमतनां जागरणं घडत.

ती अशीच एक रात्र होती. नरसिगला रहमतच्या अकालीं थंडपणाचा उद्वेग आला होता धंदेवाईक पोरं तिला नको होतीं किती केलं तरी 'प्रोफेशनल पार्टनरच' ते ! तिला जिवाभावाचा संवगडी हवा होता ! तिच्या शरीराचे मांसल स्नायु उष्ण स्पर्शासाठीं हुळहुळत होते ! रहमतचं हार्दिक प्रेम तिला नको होतं, तर उचंबळणाऱ्या प्रणयचेष्टा तिला हव्याशा वाटत होत्या. हैद्राबादेनंतर ती एकदम लंडनच्या पाश्चात्य वातावरणांत वाहवून गेली होती. काय करूं न काय न करूं असं तिला होऊन गेलं होतं.

अन् अशा अवस्थेत तिची अन् पापामियाँची गांठ पडली.

पापामियाँ मोठा गोड ! भ्रमर नुसता ! अनंदानं बागडणारं पांखरूं ! नृत्य करीत असतांना तर स्वर्गच भूमीवर आलासा त्याला वाटे. त्याचे ते घारे डोळे अन् मानेपर्यंत मागें वळवलेले भरदार केस ! त्याच्या हनुवटीवरची पाकिस्तानाची सीमारेषाच नरगिसला वेडी करायला पुरेशी होती. शेले, कीट्स अन् नेपोलियन यांच्यांतली बायकी सौंदर्याची पापामियाँवर उतरलेली झाक नरगिसला हुरळून सोडीत होती पापामियाँची अन् तिची ओळख व्हायचा अवकाश, एकमेकांना कांहीं तरी हरवलेलं परत सांपडल्याचा आनंद झाला.

त्या रात्रीपासून रोज रात्री पापाबरोबर नरगिसचीं नृत्य होऊं लागलीं.

रहमत दयाशील होते, पण तेहि "माणूस" होते. प्रेम दुधासारखं शुभ्र अन् पवित्र असतं खरं, पण मत्सराच्या मिठाचा अगदीं लहानसा खडा पडतांच तें नासून जातं.

उत्तरोत्तर पापाचा अन् नरगिसचा परिचय वाढूं लागला तसा रहमतच्या हृदयांतला विषवृक्ष फोफावूं लागला रहमतनं बॅरिस्टरीचा अभ्यास सोडला

अन् बेताल झालेल्या नरगिसला बरोबर घेऊन हिंदुस्थानाचा मार्ग स्वीकारला. नबाबसाहेब जसे गेले तसे परत आले.

नरगिसला हैद्राबाद आवडत नव्हतं. तिला देवडी नको होती, बंगला हवा होता तिला पाश्चात्य वातावरण हवं होतं. परत निघतांना तिनं केवढं आकांडतांडव केलं होतं. त्याआधीं दोन तीन रात्रीं पापाबरोबर तो मनसोक्त नाचली होती. त्या रात्रीं नरगिस न् पापाचं कांहीं तरी गुपित ठरलं !

नरगिस रहमतयारजंगाबरोबर "ग्रीष्म-निवासांत" राहूं लागली खरी. पण बाईसाहेबांचं चित्त ठिकाणावर नाहीं, हें हैद्राबादेंतल्या रिकामटेकडया दर्दी लोकांना कळायला वेळ लागला नाहीं रहमतजंग एका सायंकाळीं क्लबांतून परत येतांच नरगिस त्राग्यानं म्हणाली;

"माझं पोट भयंकर दुखतं आहे !"

"का ? कांहीं विशेष ?" उत्सुकतेनं नबाबांनीं पृच्छा केली.

"नाहीं ! मला अन्न पचत नाही, अन् नृत्याचा नियमानं व्यायाम घेतल्याखेरीच तें मला कधींच पचणार नाहीं !"

"असं ग काय वेडयासारखं ? आपण सर्जनला दाखवूं."

"कसला कपाळाचा सर्जन ! तुम्हांला सांगतें ना ! माझ्या नृत्याची ताबडतोब व्यवस्था करा ! नाहीं तर मी जीव देईन !"

रहमतयारजंग विचारांत पडले. थोडंसं थांबून ते हलक्या आवाजांत म्हणाले,

"असं बरं दिसत नाहीं आपल्याला ! आपण प्रतिष्ठित आहोंत !" हेच ते शब्द ! हेच ते उद्गार ! इंग्लंड निराळं, हैद्राबाद निराळं ! तिथं कुणी ओळखत नव्हतं,–पण इथं ?..."

पण उन्मत्त बुद्धीचे घट पालथे करण्याचं कार्य विधाता करीत असतो ! पालथ्या घागरीवरचं तें अमृत ?

नरगिस दुसरे दिवशीं घरांतून चालती झाली. माहेरीं जाण्याचं निमित्त. आठच दिवसांत रहमतला तिनं पत्र लिहिलं—

" प्रिय महाशय,

दैवाच्या विचित्र विसंगतीनं आपण एकत्र आलों आहोंत. आपल्या जीविताची निरगांठ कृत्रिम आहे. तिच्यांत ' जान ' नाहीं. तुमचा सहवास म्हणजे माझा अपेक्षाभंग. तुम्हाला वाटत असेल, आयुष्य म्हणजे तडजोड. तें खरं नाहीं. हीं वैवाहिक बंधनं तोडण्याचं मी ठरवलं आहे.

पापा येत्या आठवड्यांत इंग्लंडहून येईल. त्याच्या स्वागताप्रीत्यर्थ मी उद्या मुंबईला जात आहे इद्दतची मुदत संपली कीं, माझं त्याच्याशीं लग्न होईल. आपण मला कायदेशीर घटस्फोट देण्याची कृपा करावी. माझ्या लग्नाच्या मिळकतीच्या कपर्दिकेचीहि मला आशा नाहीं.

—नरगिस. "

तें पत्र वाचून रहमतयारजंगांना धक्काच बसला !

अन् खरंच तीन महिन्यांनीं पापामियांचं अन् नरगिसचं लग्न झालं. अन् लवकरच त्यांना एक मुलगी झाल्याचंहि रहमतला कळलं.

पण रहमतयारजंगांना बसलेला खरा धक्का दुसराच होता.

अवघ्या एक वर्षानंतरच त्यांना एका सायंकाळीं पांच ओळींचं पुढील पत्र आलं :

" प्रिय रहमत,

' प्रिय ' म्हटलं म्हणून रागवाल ? कसं सांगूं ? कसं तुम्हाला तोंड दाखवूं ? रहमत ! मी फसले ! त्या पाप्यानं मला पुरतं फसवलं ! माझे हाल कुत्रा खाईनासा झाला आहे ! रहमत ! मला पदरांत घ्या ! रहमत ! मी तुमची आहे, सदैव तुमची आहे ! मी तुमच्या आज्ञेबाहेर कधींहि जाणार नाहीं ! माझ्या नसीमची शपथ ! अनुतापानं दग्ध झालेली नरगिस !... आज पदर पसरते आहे !

सदैव तुमची होऊं इच्छिणारी,
नरगिस "

रहमतना फार मोठा पेंच पडला. पण त्यांचं हृदय खरोखर कर्णासारखं उदार होतं. पापाशीं रीतसर घटस्फोट घेतल्यानंतर नरगिसनें पुनः रहमतयार-जंगाशीं लग्न लावलं. एवढंच नव्हे तर नसीम सुध्दां त्यांच्याकडंच राहायला आली.

नसीमच्या त्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहातांच भूतकाळांतला हा सगळा चित्रपट नरगिसच्या डोळ्यांपुढनं सरकला. नरगिस 'प्रतिष्ठितपणाची' भाषा बोलत होती. नरगिस आतां पडदा सुद्धां पाळीत होती. पण—

पण आपलं अंतर निराळं आहे याची जाणीव मधूनच तिला होई. अन् तशी जाणीव झाली कीं, ती कावरीबावरी होई.

आत्तांच पहा ना ! हृदयांतल्या दडपलेल्या भावनांच्या स्मृतींनीं तिची मुद्रा कावरीबावरी झाली. पण तेवढयांत बाहेर मोटारीचा कर्णा वाजला.

रहमतयारजंग आले होते.

नरगिस चटकन् आंत आली. ते रोज आले कीं, पडदा दूर सारून स्मित करून ती त्यांचं स्वागत करी. पण आज तसं कांही झालं नाहीं. रहमत विचार-मग्न होते. आंत आले तरी कोचावर बसलेल्या नरगिसकडे नेहमींप्रमाणं हंसून दृष्टिक्षेप करण्याचं त्यांच्या लक्षांत आले नाहीं. ते एकदम म्हणाले,

"नरगिससाहेबा ! अखेरीस निश्चित झालं बरं का आज आपलं हैद्रा-बादला राह्यला जायचं ! आजच ! अगदीं आतांच ! माझं नवं ऑफिस आपल्या गढीच्या अगदीं जवळ आहे ! आज आम्हांला बढती मिळाली ! खूप आनंद झाला. उद्यां सर्वांना फार मोठी दावत द्यायची आहे आपल्या राहत्या घरीं. पण तुम्हांला आतां आवडतं ना हैद्राबाद ? अन् नसीमला ? नसीम कुठंय् ?......"

"ती मॅच खेळायला गेलीय्."

"कुठं ?"

"हैद्राबादेच्या स्टॅन्ले गर्ल्स स्कूलमध्यें."

" अन् गेली कशी ती ? "

" सायकलवर गेली. मोटारची वाट पाहायला सांगितलं तिला. निदान बसमधून तरी जा म्हणून सांगितलं. पण मॅचचा मोह ! हैद्राबादेतली मोंगलाई आपल्याला मुळींच आवडत नाहीं असं सारखं बडबडत होती ती "

रहमतयारजंग पुनः विचारमग्न झाले त्यांनी हळूंच विचारलं,

" बेगमसाहेबा ! आपल्याला तरी आतां पसंत आहे ना हैद्राबाद ? नसीम तो अभी बच्ची आहे ! "

" इश्श ! हें काय विचारणं ? माशाल्ला ! तुमचं आपलं कांहीं तरीच निघतं ! मी ताबडतोब तयारी करतें निघायची ! आजचा चाँदहि शुभ आहे ! अन् उद्यां आपली दावत ! त्याची नको का तयारी करायला ? "

तिच्या भुंवया वक्र झाल्या. सुरमा घातलेले तिचे ते टपोरे डोळे ! मधूनच लटक्या रागानें ते अधिकच विस्तृत झाले कीं, त्यावरून रहमतना आपला जीव कुर्बान करावासा वाटे ! नेहमींप्रमाणें तिचे ओठ आणि गाल आज रंगलेले नव्हते; परंतु लज्जेनें आरक्त झालेल्या तिच्या चेहऱ्याची लाली रहमतना वेडी करून सोडीत होती ! अशा वेळीं तिच्या रंगलेल्या नखांचीं टोकं धरून तिचीं नाजूक बोटं दाबण्याची रहमतयारजंगांना फार हौस होती.

आतांहि असंच झालं.

भर दिवसा चुंबन घेणं रहमतच्या थंड प्रकृतीला मानवणारं नव्हतं. पण नरगिसचीं मधलीं दोन बोटं हातांत घेऊन ते म्हणाले,

" बेगम ! आज उँगलियोंके नाखून को मेहँदी नहीं लगाई ? "

" नहीं जनाब ! आज खुषीमें भूल गई ! माफ फरमायिये गुलाम को !" जरा ठैरिये ! आपको पान खिलाती हूँ ! "

पानाच्या चांदीच्या डब्यांत नरगिसनं तें साहित्य बाहेर काढलं, विडा बनवून रहमतच्या हातावर ठेवला अन् अत्तरदानांतल्या एका कुपींतलं अत्तर त्यांच्या पुढयांत धरलं.

"वाहवा! बेगम! ईतर की मेहमाननवाजी! वाहवा! गोया आप चाहती है कि हजरत रुख्सत ले लेवें!"

"नही जी!" नरगिस हंसून म्हणाली.

नरगिस तयारीला लागली. थोडयाच अवकाशांत ते उभयतां मोटारींत बसले तरी नरगिसला भान नव्हतं. आज ते हैद्राबादेला राह्यला जात होते. पण नसीमला तें कसं मानवणार?

नरगिस स्तब्ध होती. रहमत म्हणाले,

"नसीमनं सिकंदराबादेच्या बंगल्यातच राहावं असं मी ठरवलंय्. हैद्राबादेची मोंगलाई तिला आवडत नाहीं. कदाचित सिकंदराबादेंत कांहीं दिवस तरी तिला बरं वाटेल."

रहमतचे हे उद्गार ऐकून नरगिसनं त्यांच्याकडं अशा दृष्टीन पाहिलं कीं, जणुं ती दृष्टी म्हणत होती, "मला कळतंय नसीमचा पिंड वेगळा आहे! हें वातावरण तिला मानवायचं नाहीं. पाश्चात्यांप्रमाणं ती सुधारली आहे. मी अशीच नव्हतें का? अन् अजून सुद्धां मी तशीच नाहीं का? ..."

या क्षणाला नरगिसनं बाहेर पाह्यलं. मोटार हैद्राबादेंत आली होती. रहमतच्या औदार्याचं नरगिसला कौतुक वाटत होतं. पण तिच्या हृदयांत कुठं तरी खोल लपलेल्या त्या सुप्त इच्छा पुनश्च डोकं वर काढीत होत्या. नसीम तिची मुलगी होती! लाडकी होती ती दोघांची! पण ती काय नरगिसहून वेगळी होती? का नरगिस तिच्याहून वेगळी होती? छेः! छेः! त्यांचं हृदय, त्यांची प्रकृति, त्यांचा स्वभाव, त्यांचं सौंदर्य, सगळं सगळं सारखं होतं! पण नसीम नुकतीच उमलूं लागलेली कलिका होती तर नरगिसचं निर्माल्य झालं होतं. नसीमच्या जीवनांत प्रातःकालाची प्रसन्नता होती तर नरगिसच्या आयुष्यांत सायंकालाचं उदासरम्य सौंदर्य होतं. नरगिसला वाटत होतं. नसीमच्या कलिकेचं कधीं निर्माल्यवत् सुकलेलं फूल होईल का? छेः! छेः! 'तिच्यांत अन् माझ्यांत केवढं अंतर आहे!'

नसीम मॅच जिंकून गढींत त्यांना भेटायला आली. खाना झाला. ती परत जायला निघतांच तिला निरोप द्यायला रहमत अन् नरगिस बाहेर आली "सांभाळून जा हं बाळ! संभाळून राहा!" नरगिसचं मातृहृदय बोलत होतं. त्या बोलांत वात्सल्य होतं, प्रेम होतं अन् अंतरांतल्या अनिवार भावनांचं आविष्करण होतं!

नरगिस अन् नसीम काय दोन होत्या? पण नरगिसमधली नसीम संपुष्टांत आली होती अन् नसीम—मधली नरगिस आतां कुठं विकसूं लागली होती! नरगिसला वाटलं, , "अंतर हें अनिवार!"

नसीम गेल्यावर रहमतनीं रेडिओ लावला. आरंभींच इंग्रज सरकारनं सिकंदराबाद शहर निजाम सरकारला परत करण्याचं ठरवलं असल्याची बातमी होती! ती वार्ता ऐकतांच नरगिसच्या नेत्रांतून अश्रु गळूं लागले.

"ध्रुव," जून, १९४७

---

# २. विशाल हृदय

आज सव्वीस जानेवारी......

मुंबईच्या हॉटेलांतील एका प्रशस्त खोलींत मंगेशराव अंथरुणावर लोळत पडले होते. 'सव्वीस जानेवारी'च्या कल्पनेनें त्यांना झोप येत नव्हती. त्यांच्या आयुष्यांत किती क्रांति केली होती त्या दिवसानं! त्यांच्या आयुष्यांत घडलेल्या अनेक विलक्षण घटनांच्या स्मृतीनें ते हुरळले होते. त्यांचें जीवन म्हणजे एक च चितारलेला बोलपटच होता जणुं! सव्वीस जानेवारीचा स्वातंत्र्य-दिन! मंगेशरावांच्या आत्म्यालाच जणु त्या दिवशीं स्वातंत्र्य लाभलें होतें! त्या विलक्षण तारखेच्या कल्पनेनेंच त्यांना झोंप येत नव्हती!

त्यांनीं कुशी बदलली, रग ओढून घेतला अन् त्या इवल्याशा अंधाऱ्या थिएटरांत त्यांना त्यांच्या आयुष्याचा चित्रपट दिसूं लागला.

सव्वीस जानेवारी ! हाच दिवस !

बरोबर पांच वर्षांपूर्वीं......

महाराजा कॉलेजमध्यें प्रोफेसर मंगेशराव म्हणजे सगळ्या विद्यार्थ्यांच्या कुचेष्टेचा विषय झाला होता. मंगेशराव म्हणजे विलक्षण भावनाप्रधान माणूस ! अतिशय सालस ! हिंदी भाषा बोलणारे सगळे विद्यार्थी त्यांना "प्रोफेसर बेचारे" ( बिचारा प्रोफेसर ) म्हणून संबोधीत ! अंगानें कृश अन् किडकिडीत ! विद्यार्थीदशेंत स्कॉलरपेक्षां 'पुस्तकातला किडा' अशा हेटाळणीच्या सुरांत त्यांची संभावना होई ! कुठलीहि मुलगी त्यांच्याकडे निरखून बघेल हे संभवत नव्हतें ! त्यांचें वय आतां तिशीच्या आसपास आले होतें. काळ्याभोर जमिनीवर मधूनच कापसाचीं बोंडें विखुरलेलीं असावींत तसें त्यांच्या काळ्या केसांत पांढरे केस डोकावूं लागले होते. गाल अधिकच खोल गेले होते. डोळ्याजवळचीं हाडें जास्त वर आलीं होतीं अन् डोळ्यांतलें तेज ओसरत चाललें होतें. टारगट विद्यार्थी त्यांच्या अपरोक्ष "बिच्याऱ्याचं आतां केव्हां लग्न होणार !" अशा अर्थाचे उद्गार काढून आपली भूतदया प्रकट करीत होते. अन् तें मंगेशरावांना कळतहि होतें.

म्हणूनच कधीं कधीं सकाळीं दाढी घोटून झाल्यावर ते तासन् तास आरशांत आपला चेहरा पहात बसत अन् स्वतःलाच प्रश्न विचारीत,

"खरेंच का मी अकालीं म्हतारा झालोंय् ?"

पण या प्रश्नाचं उत्तर शोधायला त्यांना फार वेळ वाट पहावी लागली नाहीं. जूनमध्यें कॉलेज सुरू झालें अन् मंगेशरावांच्या हृदयाला दिलासा देणारें एक गोड माणूस कॉलेजच्या आवारांत दाखल झालें. मंगेशराव प्रसन्न दिसूं लागले. कारण कुठून तरी त्यांच्या हृदयाला कुणी तरी गुदगुल्या करीत होतें तो अनुभव त्यांना अगदीं नवीन होता.

तसें पाहिलें तर प्रमिला औरंगाबादकर दिसायला यथातथाच होती. " नवमीची गे रात्र सावळी " म्हणून तिच्या सावळेपणाचें मंगेशरावांना कौतुक करतां आलें असतें. तिचे डोळे मासळीच्या डोळ्यासारखे नव्हते, पण जगांत काय केवळ मासळीचेच डोळे सुंदर असतात ! ती थोडीशी स्थूल होती, किंचित् नकटी होती—तरी सुद्धां ती मंगेशरावांना 'दिलपसंत' वाटत होती. कारण तिचा एकंदर नूर अगदीं न्यारा होता. बोलतांना किती गोड हंसत होती ती ! मंगेशरावांच्या हृदयाची 'सावकार' नोटसूच्या 'घेण्यादेण्या' वरनं सुरू झाली होती. युनिव्हर्सिटीनें त्या वर्षी इंटरला शेलेची 'प्रेमाचें तत्त्वज्ञान' ही कविता नेमली होती. ती शिकवितांना मंगेशराव रंगांत येत होते. त्यांचा तो रागरंग पाहून हा 'तत्त्वज्ञ' एकाएकीं 'प्रमत्त प्रेमाचा शाहीर' कसा झाला या प्रश्नार्थक अचंब्यानें सर्वजण त्यांच्याकडे पाहात होते.

प्रमिलेला हें कळत होतें कीं काय कोणास ठाऊक ! पण तिला आपलें हृदय पूर्णपणें कळत आहे असेंच मंगेशराव धरून चालले होते ! तिची परीक्षा होतांच हा विषय तिच्याजवळ काढावा असा त्यांनीं इरादा केला होता कारण त्यांच्या प्रेमाच्या पॅसेंजरला विवाहाचें स्टेशन लवकर गाठायचें होतें.

पण गंमत अशी झाली कीं, परीक्षा ज्या दिवशीं संपली, त्याच सायंकाळीं प्रमिला आपल्या घरीं निघून गेली. तिनें आभारप्रदर्शनाचें एक साधें पत्र शिष्टाचार म्हणून मंगेशरावांना पाठविलें. त्यांत तिने स्वतःचा पत्ता सुद्धां दिला नव्हता ! मंगेशरावांना नवल वाटलें. पण प्रीति अन् भीति या जुळया बहिणी आहेत असें कुठेंसें वाचलेलें त्यांना आठवलें. प्रीतीची भीति वाटत नसेल ना प्रमिलेला ? आपलीं प्रेमपत्रें तिच्या घरच्या पत्त्यावर गेली तर तिच्या आई-वडिलांना हें प्रकरण कळून येईल म्हणूनहि कदाचित् तिनें आपला पत्ता मुद्दाम लपवून ठेवला असावा अशा कल्पना मंगेशरावांच्या मनांत तरंगत होत्या कॉलेजच्या रजिस्टरांत तिचा पत्ता पाहून घ्यावा असें एक वेळ त्यांना वाटलें,. पण नंतर त्यांनीं आपल्या मनाला आवर घातला. त्यांना वाटलें कीं आपल्या

आयुष्याचा ग्रीष्म संपुष्टांत येत आहे......आतां लवकरच प्रीतीचा वर्षा येईल अन् आपल्या आयुष्याच्या आतांपर्यंतच्या वाळवंटांत सुद्धां हिरवळ उगवेल !

त्या सुखद स्वप्नांच्या हुरहुरींतच मे महिना संपला. वीस जूनला कॉलेज उघडलें. मंगेशरावांच्या हृदयाच्या उत्सुकतेचा पारा वाढत होता. प्रमिला पंचवीस तारखेला कॉलेजांत आली. किती थंड वाटली तिची प्रकृति मंगेशरावांना ! त्यांनी तिच्या प्रकृतीची, तिच्या आईवडिलाची, अन् घरची आस्थेनं चौकशी केली पण त्या मोहमय सहवासाचा साक्षात्कार त्यांना चटकन् होईना.

त्या वर्षी ज्यूनियर बी ए. मध्यें एक विचित्र वल्ली कॉलेजांत दाखल झाली. रमाकांत रणबावरे म्हणजे कॉलेजचें 'वंडर' होतें एक ! पहेलवान गडी ! कॉलेजला एकादा आधुनिक आखाडा समजून स्वारी कॉलेजांत दाखल झाली असावी ! कुस्त्या नू खेळ यांच्याखेरीज दुसरा धंदा नाहीं ! सकाळ, दुपार, सायंकाळ स्वारी या नाहीं त्या कोर्टावर खिदळत असावयाची ! आयुष्याची सुरुवात मॅचनें करून शेवट एखाद्या बक्षीस-समारंभानें करण्याची त्याची आकांक्षा. स्वतःच्या शरीराच्या वजनाबरोबर त्यानें बक्षिसें पटकावलीं होतीं म्हणे ! रणावर रमाकांतला पाहातांच इतरांनी बावरून जावें असाच त्याचा खाक्या होता ! अक्षरशः रणबावरे ! मोठा आडदांड प्राणी ! प्रोफेसरांना त्रास देण्यांत पहिला नंबर !

पण केवळ याच गोष्टीचें मंगेशरावांना वैषम्य वाटत नव्हतें. रमाकांताबद्दल त्यांना जबरदस्त असूया वाटत होती. कारण मुलींच्या घोळक्यांत तो फार प्रिय झाला होता ! ती त्याची वाढती लोकप्रियता पाहून मंगेशरावांना वाटे, आजकालच्या मुलीच उच्छृंखल ! दार्शनिक सौंदर्याला भाळणाऱ्या–!

पण प्रमिला औरंगाबादकर मात्र अशा सामान्य मुलींसारखी नाहीं असें त्यांचा आंतला आवाज त्यांना सुचवीत होता !

जूनपासून नोव्हेंबरपर्यंतचे महिने मंगेशरावांच्या आयुष्यांत गोड हुरहुरीचे गेले. आपलें प्रेम व्यक्त करण्यासाठीं त्यांनीं किती तरी युक्त्या

योजिल्या. पण प्रमिला किती भाबडी ! अन् त्यावेळचे मंगेशराव म्हणजे लाजाळूच झाड ! मंगेशराव प्रमिलेवर जिवापाड प्रेम करीत होते ! प्रमिलाहि त्यांच्यावर जिवापलीकडे प्रेम करते असें त्यांना वाटत होतें—नव्हे, खात्री होती ! पण उभयतांहि लाजाळु ! भाबडे जीव ! बोलायचं कुणीं, कसं अन् केव्हां !

मोठा विचित्र पेचप्रसंग होता तो !

पण मंगेशरावांच्या तल्लख डोक्यांत एक कल्पना चमकून गेली.

प्रमिला दिवाळीसाठीं घरीं गेली होती. तिलाच पत्र लिहून मागणी घालावी असें क्षणभर त्यांना वाटलें. पण मंगेशरावांना समाजाचें जें थोडें बहुत ज्ञान झालें होतें त्यावरून मुलीपेक्षां तिच्या बापाची घरची संमति अधिक महत्त्वाची आहे असा त्यांचा समज झाला. म्हणूनच त्यांनीं सरळ प्रमिलेच्या वडिलांनाच पत्र लिहिण्याचें ठरवलें अन् मनांत विचार येण्याचाच अवकाश त्यांनीं तावडतोब प्रमिलेला मागणी घालणारें पत्र तिच्या वडिलांना पाठवलें.

प्रमिलेचे वडील एकनाथराव औरंगाबादकर म्हणजे मोठा करडा मनुष्य ! मुलीचें लग्न शक्य तितक्या लवकर व्हावें असें त्यांचें मत ! तें अनपेक्षित पत्र वाचून त्यांना जरासें आश्चर्य वाटलें, परंतु एका प्रोफेसराला हि आकृष्ट करण्याजोगें आपल्या मुलींत कांहीं तरी आहे हें समजल्यामुळें आनंदहि वाटला. त्यांनी आपल्या तीनचार मित्रांना लगेच पत्रें लिहून मंगेशरावांची इत्थंभूत माहिती काढली. सर्वांचें म्हणणें स्थळ मोठें नामी आहे ! त्यांनीं आपल्या पत्नीचा विचार घेतला, वडील बंधूंचें मत घेतलें अन् शेवटीं आपल्या मनाशींच कांहीं तरी ठरवून मंगेशरावांना पत्राचें उत्तर लिहिलें

या सगळ्या धांदलींत त्यांनीं आपल्या स्वभावाला अनुसरून प्रमिलेच्या मनाचा मात्र कयास घेतला नाहीं ! प्रमिला काय आपल्या आज्ञेबाहेर जाणार असेंच त्यांना वाटलें.

एके दिवशीं आकस्मिकपणें मंगेशरावांना एक पत्र आलें. त्यांत लिहिलें होतें—

" सप्रेम आशीर्वाद तुमचें मोकळेपणानें लिहिलेलें पत्र मिळालें. फार आनंद झाला. चि प्रमिला तुम्हांला पसंत आहेच आम्हांलाहि हा योग उत्तम वाटतो सर्व विचार करून आपल्या वडील बंधूंनाहि मीं पत्र लिहिलें आहे एकंदर व्यवहार ठरतांच तावडतोब व जवळचाच मुहूर्त धरून लग्नाचा बार उडवून देऊं. कळावें.

आपला

एकनाथ औरंगाबादकर

तें पत्र वाचतांच मंगेशराव स्वर्गीय सुखाच्या सागरांत डुंबून गेले. दुसऱ्याच आठवड्यांत आणखी एक दुसरें पत्र आलें. त्यांच्या वडील बंधूंनीं अन् एकनाथरावांनीं अगदीं जवळचाच मुहूर्त धरला होता. मंगेशरावांचें प्रमिलेशीं लग्न होणार ही बातमी सगळ्या कॉलेजांत पसरली. चोंहोकडून अभिनंदनाचा वर्षाव होऊं लागला.

अखेर लग्नाचाच दिवस उगवला. दोन दिवसांची रजा काढून मंगेशराव बऱ्हाणपूरला लग्नाला गेले. सकाळीं साडेसाताचा मुहूर्त होता. आदल्या रात्रीं मंगेशरावांना कसलेसें विचित्र स्वप्न पडलें होतें. उठून पाहतात तों—

प्रमिला घरांतून एकाएकीं नाहींशी झाली होती.

एकनाथरावांच्या अंगाचा नुसता तिळपापड झाला ! त्यांची आवडती प्रमिला एकाएकीं अगदीं अनपेक्षितपणें घरांतुन पळून गेली होती । त्यांचें सगळें कुटुंब लाजेनें चूर होऊन गेलें होतें !

मंगेशरावांना बसलेला धक्का मात्र विलक्षण होता !

कुणाशीं कांहींच न बोलतां ते परत आले. सगळीकडे तीच चर्चा ! कॉलेजांत आल्यावर त्यांना समजलें कीं, प्रमिला औरंगाबादकर रमाकांत रणशावरेबरोबर पळून गेली होती. ती बातमी ऐकून त्यांना दुसरा धक्का बसला !

सगळीकडे छीः थूऽ ! सर्वत्र हेटाळणी ! तिरस्कार ! मंगेशरावांना तें न करवेना ! त्यांनीं ताबडतोब आपल्या नोकरीचा राजीनामा खरडला.

कुठें तरी दूर दूर त्यांना जावेंसें वाटत होतें ! शेवटीं २६ जानेवारीला ाला नकळत ते सैन्यांत दाखल झाले. युद्धाच्या काळांत किडकिडीत माणसा- हे सैन्यांत प्रवेश मिळत असल्यामुळें त्यांनाहि कसलाच त्रास झाला नाहीं. ना जीवनाचा विसर हवा होता, तो सैन्यांत मिळाला. ते हुद्याच्या आगेवर ःत गेले. एक वर्षानंतरच्या जानेवारींत ते ब्रह्मदेशांत गेले अन् त्याच वर्षी जानेवारीला ते जपान्यांच्या हातांत कैदी म्हणून सांपडले.

किती रोमांचकारी तो प्रसंग ! पण, खरे रोमहर्षक प्रसंग पुढेंच होते. । महिने तुरुंगवासांत काढल्यानंतर नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वा- ळीं आझाद हिंद फौजेची स्थापना झाली त्याना तुरुंगांतून सोडण्यांत आले ते आझाद हिंद फौजेचे प्रमुख कार्यकर्ते म्हणून सयाममध्यें कार्य करूं ाले. त्या धादलीच्या रम्यभीषण जीवनात-त्यानी किती तरी बरेवाईट प्रसंग भवले. ते रेडिओवरून ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध जोराचा प्रचार करीत. नाच्या, धकाधकीच्या, संकटाच्या शाळेंतले ते एक विद्यार्थी बनले होते.

त्यांना खूप काम पडे. खूप श्रम, खूप जेवण. त्यांची प्रकृति खूपच सुधा- । होती. मधून मधून त्यांना प्रमिलेची आठवण होई, विषाद वाटे, दुःख ! पण त्याचें मन कर्णासारखें उदार होतें ! प्रमिलेचा सूड उगवावा ही नाच त्या उदार अंतःकरणाला सहन होत नसे !

प्रमिला म्हणजे त्याच्या आयुष्यांतलें अर्धवट, अधीर स्वप्न होतें. स्वप्न कधीं साकार होईल ? त्या स्वप्नाच्या स्मृति मात्र त्यांनीं आपल्या हृदयाच्या ऱ्यात जतन करून ठेवल्या होत्या.

त्या जतन केलेल्या स्मृति घेऊनच त्यांनीं काल आपल्या मायदेशांत ल टाकलें होतें काल च त्यांची बोट हिंदुस्थानच्या किनाऱ्याला लागली होती.

आज स्वातंत्र्यदिन! ते मुंबईतील बड्या हॉटेलच्या प्रशस्त खोलींत पहुडले होते···चार वर्षांनंतर ते मायदेशीं परत आले होते न् म्हणूनच तो गतायुष्याचा चित्रपट त्यांच्या डोळ्यांसमोर धांवत होता!

सव्वीस जानेवारी! हाच दिवस!

त्या सव्वीस जानेवारीच्या निमित्तानें त्यांच्या आयुष्यांत विलक्षण बदल झाला होता! त्यांचें व्यक्तित्व, त्यांचा मान, त्यांची कीर्ति···आज त्यांचे सर्वस्व उजळलें होतें! पण त्यांचें हृदय?–आयुष्यांत एकदां ते होरपळून निघाले होते–इतकें असूनहि त्यांचें औदार्य मुळींच कमी झालेलें नव्हतें!

हा विचार त्यांच्या मनांत आला अन् त्यांना रग दूर सारून उठावेंसें वाटलें. तेवढयांत दारावर 'टिक टिक' ऐकूं आली.

हॉटेलचा बॉय होता तो!

त्यानें एक 'परिचय-पत्रिका' आणून दिली. आय् एन्. ए. रिलीफ कमिटीचे एक सेक्रेटरी मंगेशरावांना सकाळींच भेटायला आले होते. अतिशय महत्त्वाचें काम होतें. मंगेशरावांनीं तोंड धुतलें, चेहरा अन् हातपाय धुतले, नेताजींच्या फोटोला नमस्कार केला अन् त्या गृहस्थांना आंत पाठवून देण्याबद्दल बॉयला फर्मावलें

ते गृहस्थ आले व त्यांनीं अभिवादन करून मंगेशरावांच्या हातांत एक तार दिली मंगेशरावांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची तार होती ती कलकत्त्याला कमिटीनें एक वर्तमानपत्र काढलें होतें. त्याचा संपादक व्हायला चालकांना मंगेशरावांसारखा अनुभवी, सुशिक्षित माणूस मिळत नव्हता. म्हणून, ती जबाबदारी तावडतोब स्वीकारण्याची प्रेमळ आज्ञा त्या तारेंत वरिष्ठांनीं मंगेश रावांना केली होती.

मंगेशरावांना दुसऱ्या दिवशीं विमानानें कलकत्याला जाणें आवश्यक होतें. त्यांनीं सगळी तयारी केली. ती सूचना त्यांना मान्य होती. कारण, त्यांचें

जीवन त्यागासाठीं होतं, समाजसेवेसाठीं होतें,...म्हणूनच त्यांचें हृदय अधिकाधिक विशाल होत होतें !

त्यांच्या संमतीमुळें खुष होऊन सेक्रेटरी म्हणाले, " आम्ही खरेंच आपले फार आभारी आहोंत. आपली शक्य ती सोय मी करतोंच कलकत्त्याला याच वृत्तपत्राच्या कचेरींत चन्द्रकिरण सारडा या नांवाचे असिस्टंट आहेत. त्यांना मी तार करतों. ते तुम्हाला विमानतळावर न्यायला येतील अन् तुमची सगळी सोय करतील. "

सेक्रेटरी निरोप घेऊन गेले.

एअर इंडियाचें विमान कलकत्त्याच्या विमानतळावर उतरलें अन् मंगेशराव आपली बॅग घेऊन जिन्यावरून खालीं आले व जमलेल्या जमावावर त्यांनीं चौकस नजर टाकली. तेवढ्यांत एक स्थूल, दुसरा गृहस्थ पुढें आला अन् म्हणाला,

" आपणच मंगेशराव का ? "

" हो. "

" मी चन्द्रकिरण सारडा. माफ करा. मीं एकदम ओळखलें नाहीं. चलावें ! गाडी उभी आहे ! आमचें घर आदरातिथ्याला उत्सुक आहे ! "

" वा ! " मंगेशराव म्हणाले, " म्हणजे ! माझ्यामुळें तुम्हाला कशाला त्रास ! मला एखादें चांगलें हॉटेल पाहून द्या ! मी तिथेंच राहीन ! "

मंगेशरावांनीं खूप आढेवेढे घेतले. पण, चन्द्रकिरण सारडा कसला वस्ताद ! पाहुणचारामध्यें तो कोणाला हार जाणारा नव्हता ! शेवटीं मंगेशरावांनीं तडजोड केली. त्यांचें सामान हॉटेलांत नेऊन ठेवायचें अन् आज रात्रीं जेवायला मात्र चन्द्रकिरणकडे जायचें !

रात्रीचे नऊ वाजले. चन्द्रकिरण मोटार घेऊन आला. दहा मिनिटांतच ते त्याच्या घरीं जाऊन पोंचले.

ते दिवाणखान्यांत शिरले. शेजारच्या खोलींत सँडल्सचा आवाज होत होता.

पडदा दूर सारला गेला अन् काळा चष्मा चढवलेली एक गोरीपान तरुणी आंत आली.

तिच्याकडे पाहातांच मंगेशराव एकदम ओरडले,

" कोण प्रमिला ! तूं इथें ! "

प्रमिलेच्या तोंडून उद्गार बाहेर पडला,

" मंगेशराव ! तुम्हीच मंगेशराव !..."

ते विचित्र उद्गार ऐकून चन्द्रकिरण वरमून म्हणाला,

" ही माझी पत्नी—प्रमिला सारडा अन् हे मिस्टर मंगेशराव पण तुमची पूर्वीचीच ओळख दिसतेय् ? "

" तर ! तर ! " मंगेशराव स्वतःला सावरीत हंसून म्हणाले, " त्यामुळे तुमचे अन् माझें नातें आतां अधिक जवळचें झालेंय् ! " मंगेशराव मोठ्या आनंदांत जेवले. रमाकान्त रणबावरे याने फसवणूक केली. नंतर प्रमिलेनें निराशेच्या भरांत आंतर्जातीय विवाह केला हें त्यांना कळून आलें.

मंगेशरावांचें वर्तमानपत्र खूप लोकप्रिय आहे मंगेशराव अन् चन्द्रकिरण एकत्र उत्साहानें काम करीत आहेत अन् प्रमिला ?—

तिला एका गोष्टीचा साक्षात्कार झालाय ! अन ती गोष्ट म्हणजे मंगेशरावांचें विशाल हृदय !

" ध्रुव " दिवाळी अंक, १९४९

# ३. ब ढ ती !

टक्टक् टिक्टिक् टक्टिक् टक्टिक्...भगवानच्या आयुष्याच्या टाइपरायटरचं टंकलेखन आज एकदम थांबलं होतं ! सात वर्षं, सतत सात वर्षं सकाळसंध्याकाळ त्याचीं बोटं यंत्रावर फिरत आलीं होतीं; त्या यंत्रावरच्या ए बी सी या अक्षरांनी भगवानच्या शरिरांतल्या व्हिटॅमिन्सविरुद्ध तब्बल सात वर्षं लढाई पुकारली होती त्या सव्वीस अक्षरांच्या चक्रव्यूहांत गेलीं सात वर्षं भगवान फिरत होता. आपली लाडकी सुमन अन् छोटा छतू यांच्याकडे लक्ष पुरवायला त्याला वेळ कुठं होता ? एखाद्या पूर्वजन्मांत त्यानं 'रेमिंग्टन'चं घोडं मारलं होतं की त्याचा चावा घेतला होता म्हणून सात वर्षं त्याला आपल्या पापाचे घडे अशा रीतीनं भरावे लागत होते !

पण आज भगवानची त्या यंत्राच्या मगरमिठींतून मुक्तता झाली होती !

भगवान टायपिस्ट नव्हता; आज तो स्टेनोग्राफर झाला होता ! रेमिंग्टनच्या सात वर्षांच्या गुलामगिरीचीं बंधनं झुगारून देऊन त्यानं आज 'पिट्मन अन् ग्रेग' यांच्याशीं जोडीनं करार केला होता ! अन् मुख्य गोष्ट म्हणजे त्याच्या पगारांत तीस रुपयांची जादा वाढ झाली होती—साठाचे नव्वद झाले होते ! खेरीज महागाई-भत्ता काळ्या बाजाराला आणखी काजळ लावायला उपयोगी पडत होता. या काजळाच्या जोरावर सुमनला पांढरं तलम पातळ अन् छतूला साखरेचा खाऊ बक्षीस देण्याचे भगवानचे मनसुबे चालले होते कोळशाच्या शेगडीला कंटाळलेली सुमन त्याला डोळ्यांपुढं दिसूं लागली. तेवढ्यांत शेगड्याऐवजीं भगवानला स्टोव्ह दिसूं लागला ! पंप देण्याचं काम त्याच्याकडे होतं. सुमनन पाणी ठेवायचं अन् त्यांत मोजून चहासाखर त्यानं टाकायची. छतूचा साखरेचा हट्ट तिनं पुरवायचा तर चॉकोलेटचा पुरवठा करण्याचं काम त्याचं ! लहानग्याचा हट्ट पुरविण्याच्या बाबतींत त्यांच्यांत

चढाओढ लागायची अन् मग लटक्या रागाच्या आविर्भात त्यांचं गोड भांडण व्हायच

'पिटमन' बगलेंत मारून आज भगवान् ऑफिसांत आला तरी त्याच्या भावी जीवनाचीं सुखस्वप्नें त्याला सारखीं दिसत होतीं. आंत येतांच टाइप रायटरवरच्या त्या काळ्याभोर झाकणाकडे त्यानं एक तीव्र अन् उपेक्षागर्भ दृष्टिक्षेप टाकला. आज साहेबापुढे सतत उभं राहायचं म्हणून भगवाननं ठेवणींतला टाय बांधला होता, केसांवर कसलंसं 'सुवासिक' शिंपडलं होतं, खूप घोटून दाढी केली होती अन् त्यामुळं अधिक घाम येईल म्हणून की काय लाडक्या सुमननं तिच्या ट्रंकेच्या गाभ्यांत दडवून ठेवलेला तलम रुमाल कोटाच्या वरच्या खिशांत मोठ्या डौलांत खोवून ठेवला होता

तेवढ्यांत पट्टेवाला पुढं झाला अन् थोडंसं अधिक लवून सलाम करीत भगवानला म्हणाला, "साब, आपको बडेसाब याद फरमाते हैं।"

भगवाननं झटकन तोंडावरून रुमाल फिरविला अन तो आंत शिरला. साहेबाचा आजचा नूर कांहीं न्यारा होता! तलम रेशमी सूट, तसलाच टाय अन् तोंडांत त्यांचा आवडता चिरूट! साहेबांना एवढा कसला आनंद झाला होता नकळे! भगवाननं हॅट काढून लवून त्यांना अभिवादन केलं

"ओ ऽ! मिस्टर भगवानराव!" चिरूट बाजूला सारून साहेब उद्गारले, "आज तुमचं टायपिंग बंद! दुसऱ्या कुणाचीतरी टायपिस्ट म्हणून नेमणूक होईल. मला एक स्टेनोग्राफर गेलीं सात वर्षं हवा होता. सात वर्षं! स्टेनोग्राफरशिवाय सात वर्षं काढलीं. शेवटीं फिनान्सनं दिली एकदाची मंजुरी! आणि असं पाहा, मिस्टर भगवानराव! एखाद्या प्रबंधाच्या धर्तीवर खाणींच्या उत्पादनाचा अहवाल लिहिणार आहे मी"

"ठीक आहे, साहेब! फार उत्तम!" भगवान हसून म्हणाला. त्याच्या मनांत आलं, 'आतां आपल्याला जादा कामाचे जादा पैसे मिळणार!'

तेवढयांत साहेब पुढं म्हणाले, "शनिवार अन रविवारखेरीज रोज रात्रीं आठ ते अकरा तुम्हाला माझ्या बंगल्यावर यावं लागेल. रिक्षाच्या खर्चाचा हिशेब ठेवा. अन असं पाहा, कागद जातांना घेऊनच जा काम कसं व्यवस्थित पार पडलं पाहिजे. या स्थितीवर माझी बढती अवलंबून आहे, समजलांत ! बाराशेंचे पंधराशे व्हायला सहा वर्षं लागलीं. तसं आता उपयोगी नाही. पे कमिशनचा पाचकळपणा अमलांत येण्यापूर्वी मला दोन हजार झालेच पाहिजेत तर..."

"काय साहेब ?" भगवान बावरत म्हणाला.

"तर तुमच्या अधिक बढतीची मी पुन्हा शिफारस करीन "

"पण...पण..." भगवान चाचरत म्हणाला, "रोज रात्रीं यावं लागेल मला ? त्याचं कांही विशेष नाही...पण..."

"तुम्हाला तीस रुपये बढती दिली आहे !" सगळ्या जगावर उपकार करणाऱ्याचा आव आणून साहेब म्हणाले, "समजलांत !...उद्या आठाच्या ठोक्याला हजर राहा तुम्ही, अच्छा !"

पाच वाजले. तोंडाला पावडर लावून, शेपटा सोडून, छतूला कडेवर घेऊन सुमन भगवानची वाट पाहात दारांत उभी राहिली. पण, भगवान आला तो किंचितशा त्रासिक चेहऱ्यानंच त्यानं ठरल्याप्रमाणं छतूला चॉकलेट आणलं नव्हतं सुमननं किंचित चपापून विचारलं, "कांही विशेष ? चहा तयार आहे म्हटलं केव्हाचा !"

"वा रे वा !" भगवान उसनं हसूं आणीत उद्गारला, "छान ! घरीं केव्हा येईन असं झालं होतं मला !"

"फार काम पडलं वाटतं ऑफिसांत आज !"

"छेः छेः ! तसं काही नाही !"

"मग ? बढतीचं नक्की आहे ना ? का आणखी...?"

"छेः ग! बढती मिळणारच! पण साहेबाचं काम फुकट करावं लागणार! ते सुद्धां रात्रीं! त्यांनी जादा पैसे नको का द्यायला? महागाई ही अशी येवढी!"

"तर बाई! द्यायला हवे म्हणजे काय दिलेच पाहिजेत! मेली पाउस् पावडर तर किती महाग आहे! चौदा आणे! काय चेष्टा आहे?"

"मी सोडणार नाही त्याला. बघूया आता उद्या!"

"हो ऽ! विसरलेंच मी." सुमन म्हणाली, "रखमा धुण्याला आली नाही आज पगारात येक रुपया वाढवा म्हणतेय!"

"भलतंच!" भगवान संतापून म्हणाला, "या मोलकरणींनी ठरवलंय तरी काय? सदान कदा बढती, बढती, बढती! आहे तरी काय हें?"

भगवानचा पारा शंभराच्या पुढं थोडा सरकला तों रखमा आंत आली, तिला पाहतांच भगवान ओरडला, "काय ग रखमे! सदान कदा तुला रुपया कशाला हवा ग? काय चेष्टा आहे का थट्टा आहे?"

"मालक, मीठमिरची लई महाग झालीया! रुपयाला दीड शेर. जवारीला हवा रुपया मालक भाव कडाडलेंत!"

"मग अम्ही काय करणार त्याला?" सुमनबाई चेकाळल्या.

"रुपया जादा हवा. नाहींतर उद्यापासनं काम नाहीं होणार माझ्य हातानं!" रखमेचें शेवटचें शस्त्र बाहेर आलें.

झालं! भगवानचं डोकं भडकलं! साहेबाला बढती हवी होती, भगवानला बढती हवी होती, रखमेलाहि बढती हवी होती! साहेबानं भगवानला बढती दिली तें आपलं खाजगी काम होऊन आपल्यालाहि बढती मिळेल म्हणून. भगवानला हा भयंकर अन्याय वाटत होता! पावडर, स्नो, तलम पातळं, रुमाल, वुलनचे सूट, कित्ती कित्ती महागले होते! साहेबानं जादा कामाचे जादा पैसे दिलेच पाहिजेत, असं भगवानला राहून राहून वाटत होतं.

साहेबाची नाझीशाही त्याला क्रूर, भयंकर, निर्दय, आत्यंतिक अन्यायाची वाटत होती !

छे! छेः! भगवान हा जुलूम सहन करणार नव्हता ! रखमा भगवानचा जूलूम सहन करणार नव्हती !

भगवानला साहेबाचा जाच असह्य वाटत होता; पण रखमेवर कामाचा जुलूम करायला त्याला कांहींच वाटत नव्हतं ! रखमा एक मासोळी होती, भगवान मासा होता, तर त्याचा साहेब जणु एखादा भला मोठा शार्क होता !

दुसरा दिवस उजाडला. रखमाला रुपया बढती मिळाली नाही म्हणून ती कामावर गेली नाहीं. ठरल्या वेळीं रात्रीं आठ वाजतां भगवान साहेबाच्या बंगल्यावर हजर झाला नाही म्हणून त्याची बढती संपली. भगवानची फुकटी स्टेनोग्राफी मिळाली नाही म्हणून साहेबांच्या थेसिसच्या वह्या त्यांच्या मुलांना माशाचं ड्राइंग काढायला बहाल करण्यांत आल्या अन् साहेबांच्या बढतीचे मनोरे ढासळले !

तिसरे दिवशीं साधा टाय लावून भगवान ऑफिसांत आला. त काळं झाकण बाजूला सारून यंत्रावर त्यानं कागद लावले व त्याचीं बोटं त्याला नकळत त्या यंत्रावर झरझर फिरूं लागलीं...

टक्टक् टिक् टिक्टक्टिक् टक्टिक् !

"मनोहर" आक्टोबर १९४७.

# ४. खरं न वाटणारं सत्य

यशवन्तानं परक्या देशांत 'असं कांही' केलं असेल यावर माझा विश्वासच बसेना ! पण, धडधडीत ज्यांच्या डोळ्यांसमोर ती गोष्ट घडली, ज्याचे नेत्र ती विलक्षण घटना पाहून विस्फारले गेले अन् ज्यांच्या ओठांच्या खेबर-खिडींतून ती भयंकर गोष्ट पाहतांच आश्चर्याचा काफिला बाहेर पडला···अशा यशवन्ताच्या जानी दोस्तांवर कोण विश्वास ठेवणार नाही ? मुंबईला येतांच ईश्वराची शपथ घेऊन त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलेली ती विदारक घटना सुषमा वहिनींना इत्थंभूत वर्णन करून सांगितली···किती भयंकर ती गोष्ट ! किती अनपेक्षित ! किती विलक्षण ! छेः ! छेः ! कल्पनाच करवत नाही !

तसं पाहिलं तर यशवन्ता तत्त्वज्ञानाचा प्रोफेसर ! भगवद्गीतेऐवजीं ज्ञानेश्वरी अन् कान्ट ऐवजीं बर्गसाँ वाचला कीं त्याची करमणूक व्हायची ! संत तुकारामाखेरीज आयुष्यांत त्यानं दुसरा चित्रपट पाहिला नव्हता अजून ! परीक्षेसाठीं बाणाची कादंबरी वाचावी लागल्यामुळें एकंदर कादंबरी वाङ्मया-बद्दल त्याचा इतका भलता गैरसमज झाला होता की कादंबरी दिसतांच तो डोळे मिटून घेई ! नाटकमंडळ्या म्हणजे तर त्याला आधुनिक अस्पृश्यच वाटत ! सिगारेटच्या वासानं तो गुदमरून जाई, दारुच्या दुर्गंधींनं हैराण होई ! नृत्य पाहून त्याचं हृदय खालींवर होई ! यशवन्त म्हणजे गांभीर्याचं चालतं-बोलतं रूप होतं ! तत्वज्ञानाचा शब्दकोश होता तो ! धीरगंभीर वृत्तीचा बालेकिल्लाच जणुं ! पण एका परक्या देशांत, अनोळखी वातावरणांत या बालेकिल्ल्याला मोठं भगदाड पडलं ! प्रणयाचे घाव पडतांच तो किल्ला जमीन दोस्त झाला ! चुंबनाचे आघात होतांच त्याच्या पोलादासारख्या कणखर भिंती धडाधड कोसळल्या ! किती विलक्षण ही घटना !

ती गोष्ट ऐकून सुषमावहिनींचा आपल्या कानांवर सुद्धां विश्वास बसेना !

आजवरोवर पांच वर्षं झाली त्या घटनेला ! असाच यशवन्तचा तो एक वाढदिवस होता वाढदिवसाच्या निमित्तानं त्याच्या आमच्यासारख्या निकटच्या मित्रांचं एक संमेलनच त्याच्या घरी भरत असे. आमच्याप्रमाणं पांच वर्षांपूर्वीहि तें भरलं होतं…किती आनंदांत ? किती उत्साहांत ! त्यावर्षी यशवन्ताला सरकाराकडनं दोन वर्षांची 'फॉरेन स्कॉलरशिप' मिळाली होती ! त्याचे वडील तर नुसते नाचत सुटले होते ! यशवन्त इंग्लंडला जाणार ! पी एच् डी होणार ! त्याचा पगार वाढणार ! मानमरातब ! लौकिक ! त्याच्या वडिलांना आकाश ठेंगणं झालं होतं अन् सुषमावहिनी ?–आनंदाचे अन् दुःखाचे दोन पदर असलेला हारच जणुं त्यांच्या गळयांत कुणीं घातला होता ! पतीचा एवढा लौकिक वाढत असलेला पाहून कुठल्या आर्य स्त्रीला आनंद वाटणार नाहीं ? पण, पतीचा दोन वर्षांचा विरह ! त्या कल्पनेनं त्यांचं मन व्याकुळ होत होतं ! आम्ही सगळे त्यांना दिलासा देत होतों ..अन् त्यावेळेपासनं सुषमा वहिनींनी आपलं दुःख कधीं कुणाच्या नजरेला येऊ दिलं नव्हतं. बोटीवर निरोप देतांना-सुद्धां त्यांनीं आपलें अश्रु पापण्याआड दडवून ठेवलें होते. दोन वर्षांनंतरचीं स्वप्नं त्यांना पडत असावींत.

त्यावेळीं यशवन्ताची तिशी उलटून गेली होती. एकतिसावा वाढदिवस होता तो ! तिशी उलटून गेलेला, मनानं अकालीं म्हातारा झालेला, तत्व ज्ञानांतच रमणारा यशवन्त...छे : ! छे : ! त्याच्या हातानं होईलच तें कसं ! त्याचं हृदय, मन, बुद्धि, आचार, विचार...सगळं सगळं परिपक्व झालेलं होतं ! त्याच्या धीरगंभीर डोळयांवर प्रणयाची धुंदी चढणार तरी कशी ?... पण...पण...मेनकेच्या नृत्यानं विश्वामित्राची समाधि सुद्धां भंग पावली होती, नाहीं का ?

यशवन्ताच्या हातून घडलेल्या प्रकाराचं राहूनराहून मला आश्चर्य वाटत होतं...सुषमा वहिनींना वाटत होतं ! त्याच्या आई वडिलांनासुद्धां नवल वाटत होतं !! झालेला प्रकार त्याच्या दोन सहाध्यायांनीं प्रत्यक्ष पाहिला होता…

अन् तें सगळं नाकबूल करण्याचं यशवन्ताला अजून धैर्य झालं नव्हतं !

आज यशवन्ताला छत्तिसावं वर्ष लागत होतं. आज तरी त्या वाढ दिवसाच्या निमित्तानं तें विचित्र कोडं उलगडेल, अशी अंधुक आशा माझ्या मनाला वाटत होती. आज तरी मनमोकळेपणाची लहर त्याला येईल...अन् सगळ्या कुटुंबियांनीं एकमतानं त्याच्यावर ठेवलेल्या आरोपावर प्रकाश पडेल... कदाचित् तो गुन्हा सरळ कबूल करील.. वहिनींची क्षमा मागेल...आपल्या आई वडिलाच्या पायांवर डोकं ठेवील ! नाहीतर, त्या दोन साक्षीदारांना धादांत खोटं ठरवील ! त्यांचं बिंग बाहेर काढील, त्यांच्या पापाचं माप त्यांच्या पदरांत घालील !

अन् म्हणूनच रात्रीचे बारा वाजले, मित्रमंडळी निरोप घेऊं लागली तरी मी त्याच्या खोलींत बसून होतों. पाहुण्यांची पांगापांग झाली तशी यशवन्ताची धांदल थांबली होती खाद्यपेयांचा पसारा आवरण्यांत सुषमावहिनी गुंतल्या होत्या घड्याळाकडं पाहत यशवन्तानं आरामखुर्चीत अंग टाकलं अन् सहजच त्याच्या तोंडून उद्गार बाहेर पडला,

" सुटलों बुवा ! "

" का रे ? थकलास वाटतं फार ? "

" छेः छेः ! " स्वतःला सावरीत तो म्हणाला, " थकवा तर माहीतच नाहीं मला पण.. आपलं उगीच !...

" तरी पण ?... कांही विशेष ! "

" विशेष असं कांही नाही..." तो अडखळत म्हणाला.

ही उत्तम संधि आहे हे समजून मी त्याच्याजवळ गेलों, त्याच्या खांद्या-वर हात ठेवला अन् म्हणालों,

" यशवन्ता ! मी तुझा लहानपणापासून मित्र ! लंगोटीयार आपण ! मजपासनं काय लपवून ठेवतोस ? "

" वा ! " हसण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला, " असं कधीं शक्य आहे का ? "

" मग सांग तर मला ! अगदीं खरं सांग ! मार्सेलसच्या बंदरांत बोट उभी असतांना जे प्रकार घडले ते खरे का ? एका छचोर, नखरेल तरुणीनं तुझीं पटापट चुंबनं घेतलीं हें खरं का ? यशवन्ता ! तुझ्या मित्रासमोर खरं खरं सांग ! मी फार उत्सुक आहे ! माझा तुझ्यावर फार विश्वास आहे .. जें जें घडलं तें सगळं मला सांग... आता ! या घडीला सांग ! तें ऐकण्यासाठींच मी आज इथं खोळंबून राहिलों आहे ! "

मी त्याच्या नजरेला नजर भिडवली त्यानं खालीं पाहिलं. हलक्या आवाजांत तो म्हणाला.

" वसंता ? तें सांगून आता उपयोग ? कारण...कारण...खरं न वाटणारं सत्य आहे तें ! "

तेंच मला हवं आहे ! " मी ठासून म्हणालों.

" पण, उपयोग काय ? बाबांचा, आईचा अन् तुझ्या वहिनीचा सुद्धा त्या स्पष्टीकरणावर विश्वास बसत नाही ! त्यांना सगळ्यांना वाटतं...मी एक क्षण का होईना मोहाला बळी पडलों म्हणून ! पण...तें अगदीं खोटं आहे ! मला वाटतं कधी कधीं...पण जाऊं दे ! कुणाचा त्यावर विश्वासच बसणार नाही ! कारण, त्या प्रकाराचा फोटोसुद्धा सौभाग्यवतीला पाह्यला मिळालाय् ! "

" तरीच ! खरा आहे का तो फोटो ? " यशवन्तानं संमतिदर्शक मान हालविली.

" पण, मला सांग ना सगळं, " मी त्याला गळ घातली, " माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे... "

एक क्षणभर थांबून यशवन्त बोलू लागला,

"वसंता, तूं माझा निकटचा मित्र! तुझा माझ्यावर विश्वास आहे म्हणून वस्तुस्थिती आज मी तुला सांगणार आहे. पण...मी तुला आधीच सांगितलं तसं खरं न वाटणारं सत्य आज मी तुझ्यापुढं उघडं करणार आहे... स्कॉलर्शिप घेऊन मी इंग्लंडला गेलो तें ज्ञान संपादन करण्यासाठीं, पदवी मिळविण्यासाठी! चाळे करण्यासाठीं नव्हे! इंग्लंडांत मी दोन वर्षं घालवलीं... तीं केवळ अभ्यासांत! अगदीं जरूरी कामाशिवाय मी कुठल्याही तरुण किंवा म्हाताऱ्या स्त्रीशी कधींच बोललों नाही! प्रेमचाळे करण्याचं माझं नयहि नव्हतं अन् तशी मनःस्थितीहि नव्हती!

"माझी परीक्षा झाली. दोन वर्षं इंग्लडांत असतांना माझ्याहातनं आक्षेपार्ह असं काहीच घडलं नाही. माझ्या अभ्यासावर सगळे प्रोफेसर खुष असत. मला घरीं जाण्याचे वेध लागत होतें. आम्ही बोटीची चौकशी करूं लागलो. एका पंधरवाडयांतच एक बोट निघणार होती त्या बोटीनं आम्ही सगळे निघायचं निश्चित करणार तेवढयांत आमच्या कॉलेजांतल्या एका फ्रेंच मित्रानं पॅरिस पाहून जाण्याचा मला आग्रह केला. माझे दोन मित्र शंकर अन् विनायक यांना ती कल्पना पसंत नव्हती त्यानं मला गळ घातली प्रवासाची संपूर्ण व्यवस्था करणाऱ्या कंपनीच्या एका ऑफिसांत तो मला घेऊन गेला. तिथं कंपनीनं मला माफक दरात युरोपांतलीं पॅरिस ते मार्सेल्सपर्यंतचीं सगळीं शहरं, सगळीं प्रेक्षणीय स्थळं दाखवण्याचं अभिवचन दिलं ज्या बोटीनं मला हिंदुस्थानांत परत जायचं होतं ती बोट लंडनहून मार्सेल्सला ज्या तारखेला येईल, अगदी नेमक्या त्याच तारखेला कंपनी आगगाडीन मला मार्सेल्सला आणून पोंचवणार होती. माझा खोळंबा होण्याचा प्रश्नच नव्हता शंकर अन् विनायक यांना मी मार्सेल्सला बोटीवर चढणार हें ऐकून बरें वाटलें. त्यांनी मी शहर पाहण्याची संधि दवडूं नये असाच सल्ला दिला.

" ती योजना मला आवडली. माझ्या मित्रांना सोडून त्या फ्रेंच मित्राबरोबर मी पॅरिस पाहण्यासाठीं निघालों. परिसला पोचल्यावर कंपनीनं ठरवलेल्या हॉटेलांत आम्ही मुक्काम केला दुसरे दिवशीं पॅरिसच्या जमती माझा मित्र मला दाखवणार होता पण···पण, सकाळ होतांच पोस्टमन दत्त म्हणून दारांत उभा राहिलेला दिसला माझ्या मित्राची तांतडीची तार होती. त्याची आई एकाएकी आजारी पडली होती. ती तार वाचून त्याला फार वाईट वाटलं. पण, जाणं जरूरी होतं. तो माझी सारखी क्षमा मागत होता मी त्याची " जा जा " म्हणून विनवणी करीत होतों. जाण्यापूर्वी त्यानं कंपनीच्या प्रतिनिधीची माझी ओळख करून दिली. आता पॅरिस दाखवण्याचं सगळं काम तो प्रतिनिधि करणार होता

" मोठा गमत्या होता तो एजन्ट. दिवसभर आम्हीं खूप हिंडलो. संध्याकाळीं एका रेस्टॉरॉ मध्यें कॉफीचे घुटके घेत तो म्हणाला,

"रात्रीचं पॅरिस पहायचंय का तुम्हाला? थोडीशी गंमत ? "

मी मानेनंच नकार दिला. तो म्हणाला,

" पॅरिसच्या रात्रीं तुम्हीं पाहल्याच पाहिजेत ! तुम्ही त्यांत भाग घेऊं नका ! फक्त दुरून पाह्यचं ! नुसतं निरीक्षण करायचं ! माणसानं जग पाहिलं पाहिजे ! वस्तुस्थितीकडं डोळे झांक करून कसं चालेल ? तुमच्याच बेकननं म्हटलय् ना कीं माणूस मानवी चेष्टितांचा निरीक्षक असला पाहिजे म्हणून ! "

त्याच्या युक्तिवादाची मला गंमत वाटली त्याच्या आग्रहाखातर पॅरिसचें रात्रीचे क्लब दुरून पाहण्याचं मी कबूल केल

माझ्या आयुष्यांतला पहिलाच तो अनुभव. पण, माझं मन कच्चं नव्हतं. रात्रीं बारापर्यंत आम्ही खूपखूप हिंडलों प्रणयांचीं तीं उत्तान दृश्यं...त्यांचं वर्णन मला करवणार नाहीं. आम्ही एक अगदी निराळं जग पाहिलं. तें पाहून

मला शिसारी आली. अनीतीचे, बदफैलीपणाचे ते प्रकार पाहून किळस आली. शेवटीं त्या गाईडला म्हणालों,

"बस ! आता हॉटेलवर जाऊं या !"

त्यावर तो म्हणाला,

"बस ! आतां फक्त एकच स्थान राहिलंय ! तेवढं तुम्हाला दाखवतों. तें पाहून आपण हॉटेलवर जाऊं या !"

आमची मोटार एका गल्लीत शिरली, वळसे घेत घेत ती एका अरुंद, किंचित् अंधाऱ्या बोळींत उभी करून तो मला म्हणाला,

"या हें शेवटचंच अजब दृश्य पाहा !"

त्या औत्सुक्याच्या भरांत पायऱ्या चढून आम्ही आंत गेलों···त्या दिवाणखान्यांत जें मीं पाहिलं तें विलक्षण होतं. स्त्रीपुरुष सगळी लज्जा सोडून विवस्त्र हिंडत होते, गात होते, नाचत होते. एखादा नग्न-क्लब असावा तो. किती विलक्षण ! मी त्याच्या उंबरठ्यावरच उभा होतों तें भयंकर दृश्य पाहा· तांच मी डोळे मिटून घेतले अन् माझ्या तोंडून उद्गार बाहेर पडला,

"हरे राम !..."

मी त्या क्लबांत पाऊलही टाकलं नाहीं. दुसऱ्याच क्षणी गाईडला मला परत घेऊन जाण्याबद्दल निक्षून सांगितलं. माझा निश्चयी स्वर ऐकतांच तो ह परत फिरला. त्यानं मला हॉटेलवर पोचवलं त्या विमनस्क मन:स्थितींतच मी हॉटेलच्या पायऱ्या चढून तिसऱ्या मजल्यावरच्या माझ्या खोलींत आलों

अजून मी पूर्ण कपडे काढले नव्हते तोंच बॉयनं दारावर टकूटकू केलं. मॅनेजरची चिठ्ठी होती. मला कुणीतरी बाहेर भेटायला आलं होतं व्हिजिटिंग· रूम मध्यें ती व्यक्ति-माझी वाट पाहात होती. मी बुचकळ्यांत पडलों. अशा अपरात्रीं त्या अपरिचित ठिकाणी मला कोण भेटायला आलं होतं ? मी ओव्हरकोट चढवून खालीं गेलों. एक तरुण स्त्री माझी वाट पाहात होती. आंत

जातांच तिनं आपला हात पुढं केला अन् फुलांचा एक गुच्छ माझ्या पुढ्यांत धरला. तें पाहून मीं तिला एकदम विचारलं.

" आपण कोण ? आपलं नांव काय ? "

" माझं नांव मादाम बोऽहारी, " ती हसत हसत म्हणाली, " आपलं नांव काय ? "

" यशवन्त राजे " मी तुटकपणें बोललों, " आपल्याला कांही मदत हवी आहे का माझी ? "

" पण तुम्ही इंडियन नं ? " तिनं पृच्छा केली.

" हो. कांहीं विशेष ? "

" मला इंडियन लोक फार आवडतात ! फार फार आवडतात ! तुम्ही इंग्लंडहून आलांत ना ? "

" हो "

" हिंदुस्थानला परत चाललांत नं ? "

" हो "

" पॅरिस पाहायला आलांत नं ? "

" हो "

" तरीच ! मी तुम्हाला आता एका नग्नसंघाच्या व्हरांड्यांत उभं असलेलं पाह्यलं ! शिसारी आल्यामुळं तुम्हीं कांहीं तरीं उद्गारलांत ! तो उद्गार मीं ऐकला ! किती बरं वाटलं म्हणून सांगू ! तें पाहून कुणीतरीं किळस दाखवावी, तिरस्कार दाखवावा असं मला सारखं वाटत होतं ! किती किती रात्रीं अशा माणसाची मार्ग प्रतिक्षा करीत मी त्या ठिकाणीं घालवल्या आहेत ! आज तुम्हीच मला दिसलांत......खरंच ! तुम्हीच पहिले ! फार बरं वाटलं ! वाटलं तुमची एकदां भेट घ्यावी म्हणून...या अशा अपरात्री इथं आल्ये. मला माफ करा. "

तिचं तें आर्जव ऐकून मी म्हणालों, " माझी भेट घेऊन समाधान झालं न आपलं ? ठीक ! आता आणखी काय ? "

" छे: ! काम असं नाहींच ! किती दिवस मुक्काम आहे आपला ? "

' उद्याचा दिवस '

" मग माझ्या मोटारीतनं पाहा ना उरलेलीं प्रेक्षणीय स्थळं ! एवढं ऐका माझं ! मला माहीत आहे तुमचा गाईड...तुमची कंपनी ! तुमच्या सहवासाचा थोडा तरी लाभ मला मिळूं द्या ! मला फार आवडतात तुमच्या-सारखे सच्छील पुरुष ! "

तिची ती विक्षिप्त विनंती ऐकून मी बुचकळयांत पडलों. मी तिला सरळ म्हटलें, " नको. मी सगळी व्यवस्था केलेली आहे. " तोंच ती म्हणाली, " त्यांत वावगं काय आहे ? ऐका एवढी माझी विनंती ! तें कांहीं नाहीं ! ऐकलीच पाहिजे ! उद्या सकाळीं नवाला मी माझी मोटार घेऊन येईन अं... "

मला उत्तर देण्याची संधि सुद्धा न देतां ती त्या खोलींतून बाहेर पडली.

दुसरे दिवशीं सकाळींच ती आपली रोल्सराइस घेऊन आली. कंपनीचा माणूस आला नव्हता नको नको म्हणत असतां तिनं कंपनीला ' माणूस पाठवूं नका ' म्हणून फोन केला. दिवसभर तिनं मला हिंडवलं. सगळीं प्रेक्षणीय स्थळं दाखविलीं भारी लंच दिला. शेवटी रात्र झाली. आता तरी ती बया मला सोडेल अन् मी परत जाईन असं मला वाटलं. रात्रीं अकरा वाजतां तिनं मोटा-रीनं मला हॉटेलवर आणून सोडलं. ड्रायव्हरला ' जा ' म्हणून तिनं फर्मावलेलं पाहून मी बुचकळयांत पडलों, तोंच पायऱ्या चढत ती म्हणाली,

" मी इथंच खोली घेऊन राहाणार आहे. तेवढाच तुमचा सहवास. "

मला फार विचित्र वाटलं तें. कांहीं न बोलतां मी तिला तिथंच सोडून माझ्या खोलींत गेलों. कपडे बदलले. एक पुस्तक उघडून वाचणार इतक्यांत दारावर ' टक्टक् ' झालं. नाइलाजानं मी दार उघडलं. रंगीबेरंगी पोषाक

केलेली बोव्हारी दारांत उभी ! ती म्हणाली, "व्यत्यय नाहीं ना मी आणीत तुमच्या वाचनांत ?" मी कांहींच बोललों नाहीं ती खुर्चीवर बसली, पुनः उठली. मजजवळ आली. माझ्या गळ्यांत तिनं हात घातले. लगेच शांतपणानं मी ते हात सोडवले. मी तीव्र नापसंती दर्शविली. तिला मोठं नवल वाटलं. ती म्हणाली,

"इतके हिंदी विद्यार्थी पाहिले पण तुझ्यासारखा तूंच ! हिंदी विद्यार्थी किती लाघवी असतात !"

मी शांतपणानं म्हणालों, "तुझा हिंदी विद्यार्थ्यांबद्दल गैरसमज झालेला आहे."

"कांहीहि असो," ती म्हणाली. "मला तूं फार आवडलास ? लवकर वश न होणारा पुरुष मला फार आवडतो ! जितका तूं विरोध दर्शविशील तितकं माझं प्रेम वाढेल ! बोल...करतोस का माझ्याशीं लग्न ? स्वित्झर्लंडांत लाखावारी माझी इस्टेट आहे. मी तरुण विधवा आहे. जगांतलं सुख मला लुटायचं आहे मी सगळी इस्टेट तुला देते. आपण त्या राजवाड्यांत जाऊन राहूं. तुझ्या कुटुंबाला जें लागेल तें तूं दे. माझी कांहीं हरकत नाही. पण... तुला मी जिंकल्याचं समाधान मला लाभूं दे ! बस्स !..."

तिचं तें विचित्र आर्जव ऐकून मी थक्क झालों. मी तिला म्हटलं, "माझी पत्नी, माझी मुलं...हिंदुस्थानांत माझ्या येण्याकडे डोळे लावून बसलीं आहेत. तुला वाटतं तसा मी नाहीं. पैशाचा मोह मला पडणार नाहीं...अन् सौंदर्याचा तर मुळींच नाहीं !"

माझा कठोर स्वर ऐकून ती म्हणाली, "पण, यशू, तूं मला एक दे ! फक्त एक दे !"

"काय ?" मी विचारलं

"एक चुंबन"

मी नकारार्थी मान हालविली ती माझ्याजवळ सरकत येत होती. मी तिचे दोन्ही हात धरून तिला दाराबाहेर ढकललें अन् आतून कडी लावून घेतली.

सकाळ होताच ती पुनः आली कंपनीत कांहीं तरी कारभार करून तिनं आपल्या मोटारीत मला मार्सेल्सला पोंचविण्याची व्यवस्था केली. रस्त्यानं आम्ही खूप खाल्लं, खूप स्थळं पाहिलीं, खूप वस्तु खरेदी केल्या अनेकवेळां तिनं चुंबनाचं आर्जव केलं डोळ्यांत प्राण आणून ती विनवीत होती. शेवटी आम्ही मार्सेल्सला पोंचलों. बोट धक्क्याजवळ उभी होती. माझं सामान नेण्यांत आलं, निरोप देण्यासाठीं ती केबिनपर्यंत आली. ती सारखं सारखं बोलत होती, बोट लवकर सुटणार व पाहुण्यांनीं परत जावं असं सुचविणारा कर्णा वाजला. तिला आता जावं लागणार होतं. निरोप देण्यासाठीं मी केबिनबाहेर आलों. माझा हात हातांत घेत ती म्हणाली,

" माझं शेवटचं ऐक ! तुझं चुंबन घेऊ दे मला ! केवळ त्यासाठी पॅरिसहून मी इथवर आल्यें... एवढी इच्छा... "

तिच्या त्या बोलण्याची गंमत वाटली मला. मी तिला विनोदानं म्हणालों. " माझं चुंबन म्हणजे काय समजतेस तूं ! तें काय फुकट मिळेल तुला ! एका चुंबनाला पंचवीस पौंड पडतील ! "

तिला गप करायला तें उत्तर पुरेसं आहे असं मला वाटलं. पण, तेवढ्यांत तिनं आपल्या पर्समधून तीनचार नोटांचीं बंडलं मजवर उधळलीं अन् माझ्या गालांवर, ओठांवर, डोळ्यांवर, कपाळांवर चुंबनांचा वर्षाव केला !

त्या विलक्षण प्रकारानं मी शुद्धीवर येऊन पाहातो तों शंकर अन् विनायक दत्त म्हणून उभे ! शंकरच्या हातात कॅमेरा होता. कांहीं बोलायच्या आधींच मादाम बोन्हारी माझ्या दृष्टिआड झाली.

शंकरला अन् विनायकला तें पाहून धक्का बसला. तीं नोटांचीं बंडलं इतस्ततः पडलीं होती; त्यांना वाटलं जुगाराची कमाई आहे ती ! पण...पण...

इच्छा नसतांना, कल्पना नसतांना तो विलक्षण प्रकार होऊन गेला. त्यांच्यापेक्षां मीच अधिक दिङ्मूढ आलों !

नंतरचा सगळा प्रकार तर तुला माहीत आहेच ! वसंता ! बोव्हारी शिकारी वृत्तीची स्त्री होती. तिला पैशाची फिकीर नव्हती तिला तरुण जिंकायचे होते ! एकच क्षण...पण, ती एवढे पैसे देईल असं मला स्वप्नांतहि वाटलं नाहीं.. म्हणूनच मी तिची थट्टा केली पण, तीच माझ्या अंगलट आली "

यशवन्ता बोलता बोलता एकदम थांबला. त्याच्या पापण्या ओलावल्या होत्या. घोगऱ्या आवाजांत तो म्हणाला,

" वसंता ! खरा प्रकार असा आहे ! पण...दुसऱ्याला खरं न वाटणारं सत्य आहे तें अन्..."

दारांतनं सुषमा वहिनी आंत येत होत्या. यशवन्ताचं बोलणं त्यांनी भिंती आडून ऐकलं असावं तें खरं न वाटणारं सत्य पटल्यामुळेच कीं काय त्यांचे डोळे अश्रूंनीं भरून आले होते.

" सुषमा " जून १९४५

---

# ५. पऱ्यांचा खेळ !

बाहेर चांदणं अगदीं टिपूर पडलं आहे. चतुर्थीचा चंद्रच तो. सकाळचे पांच झाले असावेत. अंथरुणावरचा रग सारून नुकताच मी बाहेर बागेंत चांदण्याची शोभा पाहायला आलों होतों. सकाळचा सुखद शीतल वायु अन् शीतल प्रकाशानं न्हाऊमाखूं घातलेली सृष्टि ! वर आकाशांत तारे चमकत होते, तर खालीं नवोदित सुगंधी फुलांनीं झाडं बहरलेलीं होतीं ! वर स्वर्ग होता नि मी खालीं स्वर्गसुख अनुभवत होतो ! मी कवि असतों तर...

मनोविहाराच्या हत्तीवरून मी खालीं उतरलों तों बागेच्या पलीकडच्या बाजूस त्या छोटया बंगलीजवळ कसलीशीं पानं सळसळ वाजलीं! झाडांच्या आळयांना पाणी देण्यांत येत होतें अन् त्या प्रवाहाचा मंजूळ असा खळखळ आवाज होत होता. स्वर्गसंगीताच्या अनुरोधानं मी चालूं लागलों. पारिजातकाच्या झाडाला हालवून कुणी फुलं गोळा करीत होतं. ती स्त्री होती झाडा-आडून तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडं बघण्याचा मोह कां कुणास ठाऊक पण मला आवरतां आला नाहीं! साधीसुधी वेषभूषा अन् असामान्य सौंदर्य कुठं लपून राहतं कां!

तिच्या शुभ्र पातळाची किंचित् निळी किनार नितंबापासून टांचेपर्यंत रुळत होती. आणि विपुल केशसंभारामुळं मानेपर्यंत आलेल्या तिच्या गेंदवाज अंबाडया-जवळचा दोन्ही कर्णाग्रांचा गौरवर्ण खुलून दिसत होता. उभं राहून परिजातकाच्या झाडाला ती हालवत होती अन् तिच्या शुभ्र पातळावर देखील फुलांचा सडा पडत होता चांदण्यानं न्हाऊमाखं घातलेल्या पिठासारख्या शुभ्र सृष्टीवर वरच्या ताऱ्यांनीं सडा घातला होता! नि—

अंबाडयावर पडलेली तीं फुलं हाताच्या ओंजळीनं काढीत ती स्त्री खुद-कन् हंसली!

चतुर्थीच्या चंद्रानं सरोवरांतळीं चंद्रविकासी कमळं फुलायचीं कधीं राहिली आहेत कां? अर्थशास्त्राचा विद्यार्थी मी! पण मला देखील हास्य फुटलं! मागं न पहातांच मानेला गोडसा झटका देत ती म्हणाली,

"आतां गडी फूऽऽऽ..."

सतराव्या शतकांत तुकारामानं आपलिया बायकोला हातानं गोड घास घातला म्हणे! अन् मी तर विसाव्या शतकांत कॉलेज जीवनाची मजा चाखत होतों. क्षणभर ईस्टरच्या सुटीमुळं जयंत देशपांडयाकडं मुंबईहून मी आलों होतों हें मी अजिबात विसरून गेलों. अन् अगदीं नकळत काव्यतंद्रींत मी बोलून गेलों.

" तर मग गट्टी कोणाशीं ?..."

तिनं एकदम चमकून मागं वळून पाहिलं !

हरिणं सुंदर असतात ! गोड असतात ! पण माणसाजवळ एकदम गेणं त्यांना बरं वाटतं का ?

झाडाआड लपलेल्या मला पाहतांच " अगबाई ! " असा उद्गार काढून फुलांची दुरडी तशीच टाकून हरणाप्रमाणं ती फाटकाकडं पळाली. हरणं कुठं सांपडत असतात कां ? पण रामचंद्राप्रमाणं मला ...पण किती निराळ्या अर्थानं !

माझ्या हृदयाला गुदगुल्या झाल्या...मनोहर स्वप्न किती आल्हादकारक असतं ! बाहेर रस्त्यावर कुणी गाणं म्हणत चाललं होतं...

" मनकी आशा मनमें रही...."

मी भानावर आलों दुपारी देखील माझ्या मनांत तेंच गाणं घोळत होतं. अशांतच जयंताची थाप पाठीवर पडली व आम्हीं फिरायला निघालों.

" हें रावबहादुरांचें सुंदरभुवन " जयंत माहिती देत होता, " तें बघ रावबहादुरच येताहेत " मी समोर पाहिलं. तो एक जाडाजुडा निमगोरा, अंगांत पर्शीयन कोट घातलेला म्हातारा येत होता. जवळ आल्यानंतर त्यांना जयंतानें माझी ओळख करून दिली.

मी दुसरें दिवशीं मुंबईला परत जाणार हें पाहून रावबहादुर हंसत म्हणाले, " ठीक ! आमच्या शकूला ठाण्यापर्यंत चांगलीच सोबत आहे अन् खेरीज ठाण्याहून मुंबईपर्यंत रंगूलासुद्धां. "

ही रंगू कोण ?...दुसऱ्या दिवसापर्यंत माझ्या हृदयाला गोड गुदगुल्या होत होत्या आम्हीं स्टेशनवर गेलों. जयंत सारखा गाडी सुटावयाची वेळ झाली तरी माझ्याशीं बोलत उभा होता. रा. ब. परस्पर स्टेशनवर येणार होते. माझं लक्ष सारखं प्लॅटफॉर्मकडं लागलं होतं.

चेहऱ्यावर देवीचे वण असलेली, काळयाकुट्ट रंगाची, घामानं किचकट दिसत असलेली अन् कपाळावरच्या जाडया टिळयानं बावळट दिसणारी एक स्थूलदेही बाई येत होती. गुलाबाचे फूल तोडायला जावं तों कांटा— !

" आंत बैस " रा. ब. म्हणाले. मी दिङ्मूढ झालों. नंतर माझ्याकडे वळून ते म्हणतात, " संभाळून न्या हो आमच्या शकुंतलेला ! "

" नांव सोनूबाई पण "—..." मुंबईला असतां वाटतं ? " अघळपघळ हंसून तिनं विचारलं. उत्तर देणं भागच होतं. मी म्हणालों " होय ! "

" मग आमच्या रंगूला बरी सोबत आहे ठाण्यापासनं " ती म्हणाली. माझ्या मनांत रंगूविषयीं अधिकाधिक कुतुहल जागृत होऊं लागले. अन् कां कोण जाणे, सकाळचं स्वप्न मला पुनःपुन्हा दिसूं लागलं.

तेवढयांत ठाण्याचं स्टेशन आलं समोर पहातों तों सकाळीं मनाला हुरहुर लावून गेलेली स्वप्नांतली ती मोहक मूर्तीच डब्याकडं येत आहे असं मला वाटलं. माझं हृत्कमल फुलून गेलं ! कारण ते फुलवायला सूर्य येत होता !

किंचित् अधिक धिटाई आली होती माझ्या अंगीं. तिजजवळ एक इंग्रजी पुस्तक होतं. त्याचं नांव ' Human Happiness "

बाहेर वृत्तपत्रविक्री पोरं ओरडत होतीं " जर्मनीनं नॉर्वे घेतला ! " मला अत्यंत आश्चर्य वाटलं. परंतु, रंगूनं मला सायंत राजकीय परिस्थिति समजावून सांगितली. मी म्हटलं " दांडगा व्यासंग आहे हं तुमचा राजकारणाचा. " ' छे छे ! " ती म्हणाली. मी म्हटलं, " सुंदर माणसाला आत्मस्तुती प्रिय नसते म्हणे ! "

" तर तर ! " ती म्हणाली.

मी म्हटलं " दर आठवडयास मला आढावात्मक परिस्थिति समजावून सांगा ना ? " अन् अखेर मी तिचा होकार मिळविला.

त्या दिवसापासून नियमित ती हिंदुकॉलनीकडं दादरला येत होती. जयंताच्या बागेंत पाहिलेलं तें रम्य स्वप्न...जणूं निष्पर्ण लतेला बहर आला नि सुंदर कलिका...माझं हृत्कमल खरंखुर फुलून गेलं! तो दिवस...

दिवेलागणी होऊन अंधार पडला तरी त्यादिवशीं आम्हीं चौपाटीवरून परत फिरलों नव्हतों. दिवाळी जवळ येत चालल्यामुळं उजवीकडं वा० केश्वराच्या बंगल्यांत रोषनाईची तयारी होत होती. शेंकडों विजेचे दिवे लागत होते. त्यांचा प्रकाश नि आमच्या हृदय-एकीकरणाचा प्रकाश! आख्खी मुंबई आम्हाला प्रकाशित झाल्यासारखी दिसत होती.

"रंगू!" रुद्ध कंठानं मी म्हणालों.

"पद्माकर!..." तिनं प्रेमयुक्त दृष्टीनं मजकडं पहात म्हटलं झालें! दोन अंतःकरणं एक झालीं!

"रंगू! तूं माझी होणार ना?" मी तिचा हात हातांत घेतला तिनं मुळींच प्रतिकार केला नाहीं. तो क्षण आमच्या आयुष्यांतील वचनपूर्तीचा द्योतक होता. शीतल वायूंत उंच भराऱ्या घेत आम्हीं घराकडे परतलों.

अन् रावबहादुरांची–आपल्या काकांची–संमति मिळवून घ्यावयाचं तिनं कबूल केलं होतं! अन्—

कुठंसं माडीवरच्या कोनाडेवजा खिडकींत आपलीं पिलं दृष्टीस न पडल्यामुळं कळवळून त्या पिलाच्या आईनं काढलेला आर्तस्वर मला ऐकूं आला.

'चित्रे'च्या अंकांत आलेला माझा लेख नुकताच मी वाचत पहुडलों होतों. सुखवस्तु पित्याला पुत्ररत्न झाल्यामुळं आनंद होतोच! नाहीं का?... आणि आज तर लतिका–रंगूचं नांव देखील मी ठरवून टाकलं होतं–रावबहादुरांच्या अनुमताचं शुभवर्तमान सांगायला येणार होती. अन् खेरीज माझ्या बी. ए. च्या परीक्षेचा निकालहि पण होता! पेपर्स चांगले गेले होते. अन् त्या दिवसाला आमच्या भावी आयुष्याच्या आणाभाकांपेक्षां खास अधिक महत्व

होतं. परिक्षेच्या निकालापेक्षां लतिकेच्या बातमीसंबंधानं कितीतरी अधिक औत्सुक्य होतं. चार वाजावयाची मी चातकासारखी वाट पहात होतों. लतिकेकरितां तिच्या आवडीचं लिंबाचं सरबत कशारितीनं करावं याचा मी विचार करित होतों. तों काय आश्चर्य !

तीनाचा अलार्म नि लतिकेचं आगमन एकाएकीं झालं !

" तीन वाजतांच कसा उगवला बा सूर्य आज ? " तिला हंसविण्याच्या उद्देशानं मी म्हटलं. पण—

तीन वाजतां कधीं सूर्य उगवेल कां ? उलट तो मावळायच्या पंथाला लागायचा ! लतिकेची कळी कोमेजलेली दिसली. तिच्या गालावरचा गुलाबी रंग नष्ट झाला होता. मृगजळामागं धावणाऱ्या तहानेला प्रवाशाला खडक दिसावा तसं झालं मला. माझं हृदय धडधडूं लागलं. मी कळवळून विचारलं.

" लते ! काय झालं सांग ना ! "

ती स्तब्ध झाली. तिची मान खालीं झाली होती अगदीं न राहवून मीं म्हटलं " सांग ! लते सांग ! तुझं माझ्यावरचं प्रेम नाहीसं होण्यासारखी गोष्ट घडली कां ? बोल ! लवकर बोल !... "

तसंच खालीं पहात तिनं नकारार्थी मान हालविली. मी तिचा हात हातांत घ्यावयाचा प्रयत्न करूं लागलों. पण तिनं आपला हात जोरानं सोडवून घेतला अन्—

ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागली. एरव्ही कडाक्यानं वाद माजविणारी सभाधीट लतिका एकाएकी रडूं लागते हें पाहून मला आश्चर्य वाटलं. पण—

" पद्माकर ! विसरून जा आतां या लतिकेला ! "

" म्हणजे ? " मी आश्चर्यानं उद्गारलों.

" प्रेम आंधळं असतं. त्याला गरीबी श्रीमंती, लहान थोर, रंकराव असले दिखाऊ भाव दिसत नाहींत तें निर्मळ असतं, निखालस असतं !... "

तिचे पुढचे शब्द तिला आलेल्या हुंदक्यांतच विरले. तिच्या काकांनीं तिची पसंती धिःकारून लावली होती हें स्पष्ट होतें. माझं डोकं सुन्न होऊन गेलं! सर्व वस्तू मला भयाण वाटूं लागल्या. "ही आठवण ठेवा हं!" असं म्हणून धडाधड ती पायऱ्या उतरून खालीं गेली.

कुडींतला आत्मा नष्ट झाल्यासारखं झालं मला. मी समोर पाहिलं तो एक पत्त्यांचा डाव होता. पत्त्यांचा डाव!

त्या डावाशीं लहानपणच्या माझ्या कितीतरी आठवणी संलग्न होत्या. 'पांच-तीन-दोन' खेळतांना पांचाची वेळ आल्यावर आपला हुकूम सांगायला मिळतो, अन् दुसऱ्याच्या राजाराण्या आपल्या दुरीतिरीनं मारतां येतात. अन् दोनाच्या वेळीं—

कितीवेळ मी त्या तंद्रींत तसाच उभा राहिलों असतों कुणास ठाऊक! पण पाठीवर कुणाशीची थाप बसली म्हणून मागं वळून पहातों तों जयंत उभा!

"पद्मा! लेका, झोंप घेतोहेस कीं काय? फर्स्टक्लास गांठलास! Hearty Congrats! चलो!

गाईच्या स्तनाला दूध नसलं तरी वासरूं सोडतं कां? जिन्यावर सारखा पावलांचा धाडधाड आवाज होऊं लागला.

"पेढे काढा!" "अभिनंदन.स्पद!" इत्यादि नियमित प्रकारांनीं माझी खोली भरून गेली.

उसन्या हंसतमुख चेहऱ्यानं मी त्यांचं स्वागत केलं. चहा चिवड्यावर ताव मारीत भावे म्हणाला—

"अरे पद्माकर, तुझ्याबरोबर मि. शाळीग्राम अन् मि. पाध्यांचं अभिनंदन करणं अवश्य आहे."

माझी मुद्रा प्रश्नार्थक झाली.

" अरे, घरजांवई होणार आतां ते रावबहादुरांचे. " पाठीमागून कुणीसं ओरडलं.

" म्हणजे ? " मी आश्चर्यानं प्रश्न केला.

" अरे पद्मा, " मध्येंच भावे म्हणाला, " शकुंतला या सिनेमाशोकीन सुप्रसिद्ध गायक मि. पाध्ये आणि रंगू कुलकर्णी या वेदाभ्यासजड शाळिग्राम-शास्त्र्यासाठीं ! "

" नांवावरून तर जुळलं बाबा ! " शास्त्र्याला कुणीसं चिडविलं !

मला काय होत होतं तें समजत नव्हतं ! नमस्कार करून मित्रमंडळी केव्हां गेली तें देखील मला पुरतं समजलं नाहीं ! फराळांच्या बशा, चहाचे कप, केळींच्या सालीं...सर्वच अस्ताव्यस्त पसरलं होतं. गुलाबाच्या फुलाच्या आयुष्यांत प्रथमच मला कांटा मोडला होता. मी स्वतःला फार दुःखी समजत होतों.

दुसरें दिवशीं सकाळीं तीन पाकीटं पोस्टमननं आणून दिलीं एक शास्त्र्यांच्या नि रंगूच्या लग्नाची पत्रिका; दुसरी पाध्ये न् शकुंतलेच्या लग्नाची पत्रिका. पाध्ये ! किती आनंदी, खेळकर अन् विनोदी अन् शकुंतला...नांव सोनूबाई अन् हातीं कथलाचा वाळा !...

तिसरं पत्र उलगडून मी वाचूं लागलों.

" प्रिय पद्माकर,

' प्रिय ' म्हटलं म्हणून रागवाल ? प्रिय माणूस कधीं अशी ' वंचना' करील कां असं तुम्हाला वाटत असेल. पण पद्माकर ! शरीरानं मी कुठल्याशा भटाला जरी बांधलेलें असलें तरी मनानं तुमचीच आहे पद्मा !...तुम्हांला अशी गोड हांक मारायचं मी ठरवलं होतं. अन् तुमची लतिका...ती आतां सुकून गेली, बाजारी आयुष्यांत जळून खाक झाली. लतेला सुंदर फुलं येणार असं तुम्हांला मनापासून वाटत होतं, नाहीं ? पण काकांच्या आसुरी अभि-

मानाला मी बळी पडले. शकीला त्यांनीं कुठलासा फॅशनेबल मुलगा पाहिला म्हणून आनंदानं ती उड्या मारीत आहे! सुखी होवो बिचारी! पण मी...निर्जन, ओसाड वनांत सांपडलें आहे, तहानेनं घसा सुकून गेला आहे. पण पद्मा, अमृतानं तहान भागविणारे......मजपासून अगदीं दूरदूर आहेत. उद्यां मी बोहल्यावर चढेन, पण मनांतून सारख्या माझ्या देवाच्या चिंतनानं... अश्रुनं आतांच डोळे डबडबून येत आहेत किती लिहूं अन् काय लिहूं हें मला समजत नाहीं. माझा पत्त्यांचा डाव! जपून ठेवाल ना? तुम्हीं म्हणाल ही असली कसली भेट? पण—आपण त्या दिवशीं डाव खेळत होतों ना? माझे एक्केराजे तुमच्या हुकूमाच्या दुरीतिरीला बळी जात होते. अन्...आज तुमची लतिका देखील अशाच हुकमी डावाला बळी जात आहे. आम्हीं अबला बलवान केव्हा होणार आहोंत ते एकटा परमेश्वरच जाणें! आज तर त्यांची आहुति पडत आहे. हुकमी दुरीतिरीला ह्या राण्या बळी पडत आहेत खरोखर स्त्रियांचं आयुष्य पत्त्यांच्या खेळासारखं आहे।

"पद्मा" म्हणून एकदां शेवटची गोड हांक मारूं कां?

मनानं सर्वदा तुमचीच

पण

शरीरानंही तुमची होऊं इच्छिणारी "**लतिका**"

"दीप" १९४१

# ६. पोलिसी तर्कशास्त्र

एक भयंकर घटना घडली होती.

एका व्यक्तीचा खून झाला होता खून ! अगदीं खूनच होता तो !

ती व्यक्ति नेहमीप्रमाणं आपल्या खोलींत रात्रीं झोपली होती सकाळ होऊन उन्ह चांगलं चमकल तरी खोलींत कांहीं हालचाल दिसेना. अर्थातच नोकरानीं दार ठोठावलं उत्तर येईना. शेवटी दार मोडून ते आंत घुसले. पाहातात तों मालक खलास झाले होते !

नक्कीच खून झाला होता !

या घटनांच्या मालिकेंतला मुख्य नायक जो 'गुप्त पोलिस' तो वेळेवर हजर झाला मानवी जीवनाचीं कोडीं उलगडण्यांत अन् उलगडलेलीं कोडीं गुंतवण्यांत त्याचे केस पांढरे झाले होते. सी. आय्. डी. खात्यांतला मुख्य अधिकारी म्हणजे तुम्ही काय समजलांत !

प्रेताप्रमाणं त्या खोलीचीहि अगदीं कसून तपासणी झाली. खुनी इसम कोण असावा ? कांहींच थांगपत्ता लागण्याचं चिन्ह दिसेना. तेवढयांत त्या खोलीच्या खिडकीच्या तावदानावर कांहींतरी वर्तुळाकार विचित्र रेषा दिसली...

आमच्या वीरपुरुषानं-गुप्त पोलिसानं-लगेच त्यावर झडप घातली. पाहातो तों तो एक पिंगट, कुरळा, राठ केस होता !

झालं ! खुनी इसमाचं पितळ उघडं पडलं ! खुनाचा शोध लागला ! या सगळया प्रकरणाची किल्ली आमच्या विलक्षण- बुद्धिमान वीर-पुरुषाच्या हातीं सांपडली. त्याच्या डोळ्यांत परिस्थितीवर विजय मिळविल्याची चमक दिसली 'अतीव' समाधानामुळें कीं काय त्याच्या ओठावर हांसू झळकलं.

शर्यतीचा निम्मा अंक त्यानं जिंकला. त्याचं सुपीक डोकं विचार करूं लागलं,—

“ चला ! खुनी इसमाचा शोध लागला ! गुरुकिल्ली सांपडली ! आतां कुठं जाईल चोर ? बदमाष लेकाचा ! मात्र हुशार दिसतो बेटा ! कांहीं, कांऽहीं खूण उमटवूं दिली नाहीं लेकानं ! मोठा बिलंदर ! पण शेवटी सांपडला एकदाचा माझ्या जाळ्यांत ! ‘ गद्धा ’ आपला एक केस विसरून गेला ! गळून पडलेल्या केसाकडं त्याचं लक्ष गेलं नाहीं ! मूर्ख लेकाचा ! शिताफी असावी तर पूर्ण असावी......अन् केस तरी कसा ! पिंगट !.. कुरळा...अन् राठ ! पन्नाशीच्या माणसाचाच हा एक ‘ अवशेष ’ असणार ! त्याच्या डोक्याच्या त्वचेचा रंगही फिकट पिंगट असला पाहिजे ! ती त्वचा कठिण असली पाहिजे ! सारखं डोकं तासून तासून हे केस राठ झाले असले पाहिजेत ! ‘ब’ जीवनसत्त्व कमी प्रमाणांत मिळाल्यामुळं ते बिचारे केस गळूं लागले असले पाहिजेत अन् हा केस कुरळा दिसतो ! म्हणजे हा षंढ केसांना कित्येक वर्षं तेल चोपडीत नसावा !

सांपडला ! लुच्चा माझ्या जाळ्यांत सांपडला ! केस तर आहेच ! आतां असे केस राखलेला माणूस दिसला कीं त्याच्यावर छापा घातला पाहिजे !... ”

असा मनाचा दृढ निश्चय करून आमचा वीरशाली गुप्त पोलिसाधिकारी मुंबईच्या प्रमुख रस्त्यावर, तर कधीं गल्लींत, तर कधीं जुहूच्या समुद्रकिनाऱ्यावर भटकूं लागला त्याची चालण्याची शक्ति अन् प्रयत्नांची चिकाटी विलक्षण होती. त्यानं आपल्या मनीपर्समध्यें अभ्रकाच्या आड तो केस-तें झांकलं माणिक, गुप्त धन-दडवून ठेवला होता. संशय येतांच तो पर्स उघडी, पुनः मिटवी, पुनः पाठलाग करी.

सहा महिने झाले तरी आमच्या वीरपुषाचं चित्त विचलित झालं नव्हतं.

तो डॉकयार्डच्या बाजूनं हिंडत होता. तेवढयात त्याला आरमारी कपडे घातलेला एक शिपाई दिसला. त्याच्या मानेचा रंग फिकट पिंगट असा होता. आमच्या गुप्त पोलिसानं लगेच त्याचा पाठलाग करायला सुरवात केली. सावज सांपडलं होतं ! अगदीं आवाक्यांत आलं होतं ! अन् काय आश्चर्य ! त्यानं

आपली खलाशी टोपी डोक्यावर अगदी दाबून बसविली होती. लुच्चा लेकाचा! आपले केस इतरांपासून लपवूं पहात होता !

पण, तो दूरवर चालला होता. त्याला एका बोटीवर चढायचं होतं. बोट सुटण्याची वेळ होत आली होती. आमचा पोलिस विचारांत पडला. त्यानं शिटया फुंकल्या. पांचसात पोलीस जमा झाले. ही मंडळी बोटीच्या रोखानं निघाली. धक्क्यावर पोंचतांच बोट आणखी अर्धा तास थांबण्याचा हुकूम झाला. तों खलाशी–खुनी बोटीवर गेला असावा या कल्पनेनं आमचा अधिकारी पोलिसांच्या तुकडीसह बोटीवर चढला. कॅप्टननं त्यांचं स्वागत केलं. लगेच त्या विशिष्ट खलाशाला पुढें आणण्याचा हुकूम झाला.

तो खलाशी पुढं हजर होतांच विलक्षण आनंदाच्या स्वरांत आमचे अधिकारी ओरडले, " हाच तो ! हाच ! याचेच केस पिंगट आहेत !"

कॅप्टनच्या हुकुमावरून खलाशी खालीं वांकला. अधिकाऱ्यानं पर्समधून तो केस बाहेर काढला. कॅप्टननं त्या खलाशाच्या डोक्यावरची टोपी काढली. त्याला सपशेल टक्कल पडलेलं होतं ! तें पाहतांच आमचा गुप्त पोलिस दचकून ओरडला, " या माणसानं केवळ एक खूनच केलेला नाहीं ! कमींत कमीं दहा हजार तरी खून यानं केले असले पाहिजेत ! "

" हंस " दिवाळी अंक १९४८

# ७. कामधेनु !

" तूं कामधेनु ! खरी कल्पवल्ली ! सदा लोभला लोक सारा तुला..."

टिळकाच्या कवितेचे ते चरण मालू झोपाळ्यावर बसून गात होती. ती नुकतीच न्हाऊन आली होती व केस वाळवीत झोके घेत होती. न्हाल्यामुळं तिची गौर काया केवडयाच्या पानाप्रमाणं शोभायमान दिसत होती.

आमची मालू म्हणजे कधीहि न सुकणारं फूल होतं नुसतं ! ती परकर-धारी पोर झाली तशी कुणीसं तिला विचारलं होतं, " बाळ, कोणतं फूल आवडतं तुला ? "

ती खुदकन् हसली.

" गुलाब आवडतो तुला ? "

" उं ऽऽ हूं ऽऽ "

" मोगरा हवासा वाटतो तुला ? "

" उं ऽऽ हूं ऽऽ "

" जाइजुइ पसंत आहे तुला ? "

" उं ऽऽ हूं ऽऽ "

" मग काय शेवंती, चाफा, चमेली, बकुल, मधुमालती ? सांग ना, कोणतं फूल आवडतं तुला ? "

" मालती ! "

अन् त्या क्षणापासनं माझ्या चिमुकल्या बहिणीचं नांव मालती ठेवण्यांत आलं. आमची मालू म्हणजे किती निर्मळ अन् निष्पाप ! निसर्गाचं तें इवलुसं रुपच जणुं विधात्यानं ओतलं होतं ! मालू म्हणजे माझ्या जीवितांतल्या

शुष्क वाळवंटांतली हरळी होती! काव्यहीन जीवनाचे ती कविता होती! भावरहित जीवनाची ती भावकुता होती! पहाटेच्या प्रहरीं भूपाळया म्हणायचा तिचा प्रघात होता. "तूं कामधेनु! खरी कल्पवल्ली! सदा लोभला लोक, सारा तुला......"

मी अंथरुणावरच लोळत होतों. तरी मला त्या परकरधारी पोरीचं कौतुक वाटलं! टिळकांनीं भारतमातेची केलेली ती काव्यात्म आळवणी... कामधेनु आणि कल्पतरू यांच्या स्वभावधर्मांचं संमीलन!

खरी कामधेनु!...

ते सुस्वर ऐकून मी मुग्ध होऊन गेलों.

हीच वेळ अन् असाच प्रसंग...

एक वर्षापूर्वीचा प्रसंग माझ्या डोळ्यापुढं उभा राहिला.

असेच हिंवाळ्याचे ते दिवस होते. कवींना स्फूर्ति देणारी गुलाबी थंडी! पण कुठें कवि अन् कुठे सकाळपासून सायंकाळपर्यंत गिरणींत राबणारा माझ्या-सारखा साक्षर मजूर! कवींना जीवन गुलाबासारखं दिसतं, पण दुर्दैवानं आमच्या वांट्याला त्याचे कांटेच आले होते!

महागाई मी म्हणत होती. खेड्यापाड्यांतले माझ्यासारखे हातातोंडाशीं गांठ असलेले शेतकरी शहरांतल्या गिरण्यांकडे धांव घेत होतें. या यांत्रिक युगांतल्या जीवनाच्या झळा! त्यांची आंच आम्हाला लागत होती. गिरण्यांच्या अगडबंब बंबांतून निघणारा धुराचा तो काळाकुट्ट लोट! दीन अन् दुबळ्या मजुरांच्या मनांत तो अनेक लहरी निर्माण करी...आपल्या गतप्राण शरीरांतून निघणारा धूरही इतकाच काळाभोर असेल कां? आमच्या अर्थस्फूट जीवनांतल्या त्या विचारलहरी जणुं मृत्युलाच आव्हान देत होत्या!

पण, तींच अगडबंब अकाळविकाळ धुम्रवलयं आकाश ग्रासून टाकतांना मिलमालकांना मात्र निराळीं भासत होतीं! सूफी कवींनीं आकाशाला विधाता

मानला आहे म्हणे ! पण, विधात्यालाही विज्ञानाचा विस्तव धुराच्या रूपानं ग्रासून टाकतांना दिसत होता. मालकांचं मन म्हणत होतं,

"खरंच, कोळशांतून हिरे निर्माण होतात असं प्रतिपादणारे शास्त्रज्ञ बेटे अजिबात वेडे नाहींत, एकूण त्यांनाही थोडीबहुत अक्कल आहे !......"

माणसाचं मन म्हणजे मोठाच त्रिकोण आहे एक ! पण त्याचें कोन मात्र सतत बदलत असतात.

मी गांव सोडून त्या गिरणगांवाकडं जाणार—त्या दिवशीं गाईचे बारस होती. दिवाळी नाहीं तरी बारस तरी निदान घरींच व्हावी असा 'घरांतला' आग्रह होता. मी शहरगांवीं जाणार होतों माझ्या एका मित्राबरोबर. त्या मित्राचं नांव फरीदभाई. फरीद हा मोठा कर्डा खाटीक होता. पण, गायबैल हेंच शेतकऱ्याचं खरं वैभव. हें त्यालासुद्धां कळत होतं. त्या दिवशीं गाईला पान्हा सोडवायला लावला नव्हता. कधीं न मिळणारे हरबरे तिला घातले होते. गुळाची थिटुकली पोळी तिच्या पुढयांत आली होती. तिच्या गळ्यांत परसांतल्या फुलांचा हार करून घातला होता. सर्वजण भक्तिभावानं तिची पूजा करीत होते.

संध्याकाळ झाली. हाच झोपाळा अन् हेच मालूचे बाळबोल ! ते अद्यापि माझ्या कर्णरंध्रांत घुमत आहेत,—

ढळला रे ढळला दिन सखया !
सन्ध्या–छाया भिवविती हृदया !

माझ्याही जीवनघटांत शुष्कतेनं ठाणं दिलं आहे हे त्या चिमुरड्या मालूला कसं कळणार !

जड मनानं मी सर्वांचा निरोप घेतला. सौभाग्यवती दाराआड उभ्यानेंच हुंदके देत होती. आतांना आई म्हणाली,

"आमची कांहीं काळजी करूं नकोस बाळ, गोमातेच्या पाया पड, कामधेनु आहे ती ! तिच्या कृपेनं तूं लवकर परत येशील. तू येईस्तवर अक्षी गोग्रास देईन बाबा !..."

तिचा कंठ दाटून आला. पोट खपाटी गेलेली माउली घरांत धान्य नस-तांना गाईला रोज घास घालण्याची इच्छा व्यक्त करते! माझं हृदय भरून आलं.

मी गाईला थापटलं, वासराला कुरवाळलं......फरीदभाईलाही कळवळा आला, गायही हंबरू लागली. तिलाही जणुं कळत होतं कीं आपला मालक आज कुठंतरी दूरदूर चालला आहे! आईची केवढी भक्ति गाईवर! आपल्या मुलाला सुखात पहाण्याचें मनोरथ तो जणुं पूर्ण करणार होती! खरी कामधेनु!

पण, गिरणगांवांत येतांच गाईचा मला विसर पडला. आमच्या आयु-ष्यांत केवढं तरी परिवर्तन झालं होतं. त्या गिरण्याच्या यंत्रांनीं आम्हा माण-सांना पण यंत्र बनवून सोडलं होतं!

पहाटेच्या प्रहरीं शिदोऱ्या खांद्यावर घेऊन धांवणाऱ्या त्या प्रचंड जन-संमर्दाकडं पाहून मला कधींकधीं असं वाटे कीं, ही यात्रा जाणार तरी कुठं अखेर? या पोटार्थी जिवाचं अंतिम सातासमुद्रापलिकडं तरी असेल कां?

असेच माझ्यासारखे कांहीं साक्षर मित्र माझ्याभोंवतीं जमले आम्ही पुराण्या संघाची शक्ति वाढविली. लाल बावट्याखालीं सगळ्या धंद्यांचे किरिस्तान, हिंदु अन् मुसलमान एकत्र येऊं लागले. कारण, आम्हाला भरडणारं यंत्र जातपातीचा विचार करीत नव्हतं! तिथं धर्मही नव्हता अन् जातही नव्हती! समाजाच्या दोन अंगांचा तो झगडा होता! दळणारे अन् दलित यांचा तो संग्राम होता! चैन अन् चणचण, बंगले अन् झोपड्या, दौलतवान् अन् दरिद्री यांची ती टक्कर होती!

अन् हातीं शस्त्र न धरतां हा झगडा रंगांत येण्याचीं पूर्वचिन्हं अधिका-धिक सुस्पष्ट होत होतीं...

त्यावेळीं उदरंभरण हेंच आमच्या आयुष्याचं ध्येय ठरू पाहात होतं पण, शेवटीं बाजारांत औषधालाही धान्य मिळेनासं झालं. अन्नधान्य वाटपपद्धति अद्यापि अस्तित्वांत आली नव्हती. जपान नुकतंच युद्धांत पडलं होतं. बाजार

एकाएकी कडाडला होता. कित्येकांना उपास पडूं लागले. मालक लक्ष देईनात. संप उभारण्याचे मनसुभे होऊं लागले. आमच्यांतली एकजूट वाढूं लागली. फरीदभाई अन् रहीमभाई यूनियनचे कार्यकर्ते बनले.

अन् अकस्मात बातमी लागली कीं दिल्लीचे बडे लाटसाहेब अगदीं शेजारच्या एका संस्थानाला भेट देणार आहेत. अधिकारी अन् पोलिस यांची गडबड सुरू झाली. पोलिसांची तिकडे रवानगी होऊं लागली.

मंगळवारचा दिवस. आठवडयाचा बाजार. धान्याचे ढिगारे लागले होते. परंतु, भाव कडाडलेले ।

पोलिसांचा पत्ता नव्हता ! चौकीवरचे दोन शिपाई पसार झाले होते. अन् अशांत कसा एकाएकी लोट भडकला कुणास ठाऊक ! कामगारांनींहि संधि साधली. वाण्याचं भांडण निमित्त मात्र झालं अन् लुटालुटीला आरंभ झाला.

निमिषार्धांत आकाश भरून यावं अन् धो धो पाऊस पडावा तसा धान्याचा पाऊस पडूं लागला. दुकानदार अन् कामगार यांची झटापट सुरू झाली. त्यांना अडवायला पोलीस कुठं होते ? ज्याच्या हाताला जें येईल तें पसार होऊं लागलं...हा हिंदु...हा मुसलमान...कसलाही विचार कुणी करीत नव्हतं ! पाकिस्तानाची प्रौढी मिरवणारे फरीदभाई अन् रहीमभाई आपल्या बोहरीभाईवर हात टाकतांना दिसत होते !

तें दृश्य मोठं विलक्षण ! युगायुगांचं दैन्य आपल्या दीनतेची अन् दौर्बल्याची घट्ट आवरणं फाडून नागडया स्वरूपांत जगापुढं प्रकट होत होतं ! मिलमालक म्हणत कामगार सापाप्रमाणं उलटतात. पण सापसुद्धां आपली कांतण केव्हांतरी टाकतोच ! मग कामगार तर माणसं आहेत !

बाराचे ठोके पडले, आठवडयाच्या बाजाराचेही बारा वाजले होते ! तेवढा प्रचंड जनसमुदाय माझ्यासारख्या खेडवळांच्या आयुष्यांत पाहण्याचा तोच पहिला प्रसंग.

"आतां कसं होणार? आतां काय व्हायचं?" हाच प्रश्न सगळ्यांना पडला होता. तोंच चार म्होरके पुढं झाले. शहरांतल्या धान्याच्या मुख्य कोठारावर आतां मोहीम नेण्याचं ठरलं. लूटच करायची तो अर्धवट काय म्हणून! सदर बाजारांत धान्याचे प्रचंड कोठार होते. ती प्रचंड मिरवणूक सदर बाजाराच्या रोखानं निघाली.

मैल दीड मैलाचं अंतर असेल. उन्हं तळपत होतं. तसा आमच्या मनाचाही पारा चढत होता. विचाराला वाव नव्हता. आमच्या हातांत भावनेचे अंकुश होते. सगळ्या जगाच्या झिंदाबादच्या आरोळ्या आकाश दुम-दुमून सोडीत होत्या. दलित मानवतेनं नृसिंहासारखं विक्राळ रूप धारण केलं होतं!

इतक्यांत—

एकाएकी भूकंप व्हावा तसं आमच्या भोंवतालचं जग पालटून गेलं!

विधात्याचे रंग विविध हेंच खरं!

फरीदभाई अन् रहीमभाई हातांतल्या लाठ्यांनीं मुंडासेधारी माणसांवर प्रहार करूं लागले. "मुस्लीम लीग झिंदाबाद! कायदेआजम जिन्हा झिंदाबाद! कायदेमिल्लत झिंदाबाद! पाकिस्तान झिंदाबाद! इस्लाम झिंदाबाद!" असल्या कर्णकर्कश आरोळ्या ठोकणारी पंचवीस जणांची एक सशस्त्र तुकडी धांवत आली.

हिंदू कामगारांना चेव आला! अन् त्याला कारणही पण तसंच घडलं होतं—!

गोहत्या घडली होती!

एका गाईचं भररस्त्यांत बलिदान झालं होतं!

तें एका मुसलमानानं मुद्दाम केलं असं हिंदू ओरडत होते. तें मुसलमानांनीं मुळींच केलं नाहीं. असा पुकारा मुसलमान करीत होते.

तेहतीस कोटि देवांचा घोष होऊं लागला. हिंदुत्वनिष्ठेला पान्हा फुटला! काटया मोडल्याचे आवाज येऊं लागले.

झालं! त्या मिरवणुकीची तिथंच इतिश्री झाली!

त्या दंगलींत माझा डावा पाय दुखावला होता. आतां मिलिटरी पोलिस अवतरले होते! मी लंगडत कोठाराकडं जात असतांना एक कारंजं दिसलं. त्या चौकाच्या मधोमध कारंजं असून अगदीं समोर ग्रेनमार्केटचं मोठं फाटक होतं. कारंजांतल्या लोखंडाच्या नळीवाटं स्रवणाऱ्या जलधारा रक्तानं माखलेल्या गाईला अभिषेक घालीत होत्या! बीभत्सतेचं एवढं प्रदर्शन क्वचित्‌च पाहायला मिळालं असतं! त्या गाईनं मृत्यूला केंव्हांच कवटाळलं होतं!

तें दृश्य पाहून मला एकदम मालूची, घरची, आईची अन् घरच्या गाईची आठवण झाली, मालूचं गाणं कानांत घुमत होतं—

"तूं कामधेनु! खरी कल्पवल्ली!" फरीदला स्ट्रेचरवर घालून नेण्यांत येत होतं. त्याला पहातांच मी धावलो. तो रक्तस्राव पहातांच मी ती दंगल विसरून गेलों! मी त्याचा हात हातांत घेतला. त्याच्या डोक्याला जबर दुखापत झाली होती. त्याच्या फाटक्या शर्टाच्या खिशांत नोटांचं पुडकं दिसत होतं. मी आश्चर्यचकित झालों. तो एखाद्या वेडयाप्रमाणं समोरच्या दुकानाकडं हातवारे करीत बरळूं लागला.

"मी धंद्याचा खाटीक हाय! मला काय! पांचशें रुपये! पांच शंभर रुपये! एका गाईला मारण्याकरितां पांच शंभर! अरे रूपचंद! पांचशें रुपयांत पांचशें गाई खतम केल्या असत्या मी!......"

तेवढयांत त्या फाटकाच्या आंतील पटांगणांतल्या सर्वांत मोठया धान्याच्या कोठाराचे मालक रुपचंद शेटजी बाहेर आले. ते नुकतीच पूजा आटोपून आले होते! रूपचंदजी हे केवळ मोठे धान्याचे व्यापारीच नव्हते तर मोठे धर्मनिष्ठ, हिंदुत्वनिष्ठ पुढारी होते! त्यांच्या अंगावरचं सोवळं अद्याप सुटलं नव्हतं. तें सोडायला नोटांच्या बटवाच्या धांदलींत अवसर नव्हता!

या प्रकरणानिमित्तानं वृत्तपत्रांचे जादा अंक निघाले गोहत्येचें खापर खाटकाच्या माथीं फोडणारे लांबलचक अग्रलेख तळपले. रूपचंदजींनीं स्वतः मौज सोसून फरीदला कायद्याच्या कचाट्यांतून मुक्त केलं. या जैन मारवाडी मालकाच्या सुपीक डोक्यांतून उद्भवलेली शक्कल समजूनहि संपादकांना त्याची स्तुती करतां येत नव्हती !

तेहतीस कोटि देवांना पुष्पांजलि अर्पण करणारे असंख्य अग्रलेख घोष करीत होते,

" कामधेनु ! कामधेनु ! ! "

" कामधेनु ! कामधेनु म्हणजे काय, दादा ? " मालूच्या बाळबोलानं माझी तंद्री भंग पावली.

मी तिला टिळकांच्या कवितेचे चरण समजावून सांगितले. मालू मोठ्या-नंच मनाशीं म्हणूं लागली.

" आपली मायभूमि ही एक कामधेनु आहे. कामधेनु म्हणजे आपल्या सगळ्या इच्छा पुरविणारी गाय ! अगदीं कल्पतरुसारखी ! गाय ही आपली माता आहे, आपली देवता आहे, आपलं वैभव आहे ! तिचं दूध हें अपलं जीवन ! तिच्या पोटांत तेहतीस कोटि देवांची वसति आहे ! "

मोठ्या भक्तिभावानं तिचं पाठांतर चाललं होतं. ती एकाएकी थांबली अन् एकदम म्हणाली,

" दादा ! आपला फरीदभाई गाई मारतो म्हणे ! मोठ्ठा वाईट आहे फरीदभाई !... "

या तिच्या माहितीचं आश्चर्य वाटून मी म्हटलं, " हूं ! "

पण, हातांत सुरी न धरतां गोहत्या करणारे रूपचंद शेटजीसारखे असंख्य खाटीक या जगांत आहेत हें त्या लहानग्या मालूला कसं कळणार ?

आमच्या आईला वाटतं कीं आपली गाय ही जणुं कामधेनूच आहे ! मालूला तर वाटतं कीं जगांतल्या सगळ्याच गाई कामधेनु आहेत !

रुपचंदजींनाही त्या कारंजावर रक्तानं न्हात असलेली गाय एखादी कामधेनूच वाटली असेल ! पण, ती किती निराळ्या अर्थानं !

मालूचं गायन चालूंच होतं,

" तूं कामधेनु ! खरी कल्पवल्ली ! सदा लोभला लोक सारा तुला !...

मालूचं तें कवितागायन ऐकलं कीं अजूनही कारंज्यावरची ती बीभत्स 'कामधेनु' माझ्या डोळ्यापुढं उभी राहते.

" झंकार " १६ मे, ४८

---

# ८. गंगा-खेडकर !

गाडीनें गंगाखेडचें स्टेशन सोडलें अन् माझ्या समोरच्या बाकावर बस-लेल्या माणसानें दीर्घ सुस्कारा सोडला ! त्यानें बांधलेलें गाठोडें सोडल्यासारखे पाय मोकळे केलें, शर्टच्या बाह्या सावरल्या, साखळी हालवून घड्याळाशीं चाळवाचाळव केली, कपाळावरचा घाम पुसण्याच्या मिषानें केस सारखे केले ! जणुं वाहत्या वाऱ्यानें त्याच्या शरीराच्या अलगुजांतून सुखाचे स्वर बाहेर पडूं पाहत होते !

" सुटलों बुवा ! "

या त्याच्या एकाकी उद्गारापेक्षां त्याच्या मनोज्ञ हालचालींनेंच माझें लक्ष वेधून घेतलें ! त्याची राहणी अन् वागणूक त्या मोंगलाई मुलखाच्या सांच्याशीं अगदीं विसंगत होती हें तेव्हांच माझ्या ध्यानांत आलें. माझ्या नजरेला नजर भिडवितांच कांहींतरी बोलण्याच्या इच्छेनें त्याचे ओठ हालले.

अबोल माणसाचे उद्गार नेहमींच कांहींसे अस्फुट असतात. अशी माझी समजूत असल्यामुळें त्याच्या सौजन्याची परीक्षा न पाहतां मी एकदम म्हणालों,

" कां प्रवासाला कंटाळलांत वाटतं ? "

" छे: प्रवासाला नव्हे; या आगगाडीला न् प्रदेशाला ! "

तें त्याचें उत्तर ऐकून मी हंसलों. पुढें मीच म्हणालों,

" तुम्हीं बार्शी-लाईट-रेल्वेनें प्रवास केलेला दिसत नाहीं कधीं ! "

" या गाडीचा लाभ झाल्यावर जरूर नाहीं त्या प्रवासाची ! "

नैराश्यानें भरलेलें हंसें पांघरीत तो म्हणाला, " काय तुमचें तें गंगाखेड ! दगडांची खाण नुसती ! "

धोंडी स्टेशन जवळ आल्यामुळें गाडीचा वेग कमी झाला होता. मी हंसत म्हटलें, " पाषाणाच्या पर्वतांतूनच प्रेमाच्या हृदगंगा वोळतात बरं का ! "

" अगदीं कवि आहांत बुवा ! "

त्याचें तें मुक्तहास्य पाहून माझ्या मनाला वाचा फुटली. मी परभणीला डॉक्टर. परंतु मेडिकल कॉलेजापूर्वी इंटर सायन्सपर्यंत मी फर्ग्युसनला होतों, हें सांगताच त्याला माझ्याविषयीं अतिशय आपुलकी वाटली. नागपूरच्या हिस्लॉप कॉलेजांतुन तो आतां पुण्यास फर्ग्युसनला आला होता. अनेक गप्पांचा मसाला मीं त्याला नजर केला. कदाचित् त्याला नागपुरी 'फोकनाड' आवडत असेल अशा सहजस्फूर्त कल्पनेनें मी एकदम म्हणालो,

" तुम्हांला गंगाखेड अगदीं शुष्क वाटलें नाहीं ? "

" हो ! " तो उद्गारला, " नदी नसती तर सहारा म्हटलें असतें सहारा ! "

मी मौजेनें म्हटलें, " पण मला तें फार रम्य वाटतें !... "

त्याच्या विस्फारलेल्या डोळ्यांकडे दुर्लक्ष करून मी म्हणालों,

" या गंगाखेडच्या माझ्या मित्रानें पंधरा वर्षापूर्वी फर्ग्युसन कॉलेजांत नुसता डोंब उसळविला होता डोंब ! "

त्याच्या चेहऱ्यावर मात्र आतां खरोखरच डोंब उसळला होता ! एकदां तापलेले लोखंड थंड होऊं देणाऱ्यांपैकीं मी नसल्यामुळें लगेच पुढें म्हणालों,

" कॉलेजांत सर्वत्र एकच विषय गंगाखेडकर, गंगाखेडकर, गंगाखेडकर ..."

त्या उद्गारांनीं त्याच्या हृदयांतली जिज्ञासा जागृत झाली होती ! मला वाटतें, त्या क्षणापुरती मनांतली गंगाखेडची शुष्कता त्यांच्या चेहऱ्यावरील उत्सुकतेंत विरून गेली असावी !

मी बोलत होतों, तो निमूटपणें ऐकत होता.

" आमचा गंगाखेडकर म्हणजे अजब मूर्ति होती एक ! भिक्षुक घराण्यांत वाढलेलें पोर तें ! पण आईच्या मायेबरोबर बापाची शिस्त मात्र विलक्षण होती ! पहाटे कोंबडा एक वेळ आरवणार नाहीं, पण भिकंभटाचें भजन मात्र कधीं चुकलें नाहीं ! हा बापाचा उपजत गुण मुलानें उचलला तर त्यांत नवल काय ? मुलगा औरंगाबादेसारख्या परगांवीं हायस्कूलांत शिकत असला तरी भिकंभट त्याचा आठवडयाचा कार्यक्रम मोडींत मुलाला लिहून कळवायचे !—

अन् चिरंजीव आज्ञाधारकपणांत सवाई रामचंद्र ! त्यावेळीं पाणी सहाला सुटत असल्यामुळें बिचाऱ्या गंगाखेडकराच्या नशिबीं नेहमीं स्नानाला शिळें पाणी पिताज्ञा ! तिळभर उशीर कामा नये ! साडेनऊला झोंप ! आम्ही अत्याग्रहानें एकदां त्याला चित्रपटाला नेलें असतां साडेनवाचा ठोका कानीं पडतांक्षणीं तेथेंच त्यानें तोंडावर हातरुमाल पांघरुन घेतला ! दुपारीं गणिताचीं उदाहरणें सोडविण्याची पिताज्ञा असल्यामुळें एकदां एका अनपेक्षित निबंधाच्या पेपरांत त्यानें भास्कराचार्यांची भूमिका त्यावेळीं सजविली !

" बारा वाजतां बरोबर स्टेशनवर येऊन गाडीची मार्गप्रतिक्षा करण्याचा बापाचा हुकूम असल्यामुळें स्वारी सहाच्या गाडीला सहा तास आधीं बिस्तऱ्यासह हजर ! "

आतां मात्र माझ्या मित्राला हंसू आवरेना !

पण शक्य तितका गंभीर चेहरा करून मी म्हणालों,

" मी सांगणार आहे ती फर्ग्युसन कॉलेजांतील गम्मत तुम्हांला, असा अविश्वास दाखवूं लागला तर, कधीं खरी सुद्धां वाटायची नाहीं ! पण मी म्हणतों ना, या गंगाखेडकरानें फर्ग्युसन कॉलेजांत त्यावेळीं हुल्लड उडवून दिली होती, ! " तें ऐकून माझ्या नवपरिचित मित्रानें सशासारखे कान टंवकारले ! मी हंसत हंसत माझें पुराण सुरू केलें,

" गंगाखेडकर—त्याला आम्ही महाराजासाहेब म्हणत असूं—मॅट्रिकला पास झाला हेंच आम्हाला आधीं खरें वाटेना ! परिस्थितीचें पाणी झालें तरच या गंगाखेडकराच्या दगडांतून त्याला वाट मिळायची ! मग आमच्या ' इन्फर्मेशन ब्यूरो ' ला बातमी आली कीं एम् आर. एस. गंगाखेडकर आतां फर्ग्युसनमध्यें अवतरणार आहेत. !

" अन् अखेर एके दिवशीं मला वे. शा. सं. भिकंभटाचें पत्र आलें. आषाढांत गंगाखेडकर पुण्याला वरसणार ! अर्थात आमचें कॉलेज वीस जूनलाच सुरू झालें होतें. मलाहि उशीर झाला असल्यामुळें रेसिडेन्सींत जागा मिळणें कठिण होतें. तात्पुरतें मी माझ्या मित्राकडे बस्तान ठेवलें होतें. तों ठरल्या दिवशी महाराजासाहेब गंगाखेडकर येऊन दाखल झाले ! "

" मला वाटलें, ऋतु बदलला तर फुलांच्या रंगातही बदल होईल ! पण तुम्हाला माहीत आहे, गंगाखेड दगडाच्या खाणींतून उदयाला आलेलें आहे !"

त्याच्या चेहऱ्यावर तिरस्र स्मित झळकलें !

मी पुढें म्हणालों, " आमचा गंगाचखेडकर पांच वर्षांपूर्वी जसा होता तसा मला वाटला ! तें डोक्यावरचे गोल चक्कर, करवतीकांठीं धोतर, कोकणी जोडा, टोपी लहान झाल्यामुळें उद्दामपणें बाहेर डोकावणाऱ्या शेंडीच्या ' बटा '! अहाहा ! दिव्य मूर्ति !

" खोलीवर येतांच माझ्या मित्राला मी त्याची ओळख करून दिली– 'हे एम. आर. एस. गंगाखेडकर !' तो अवतार पाहून माझा मित्र किंचित चरकलाच ! जेवण झाल्यानंतर मी गंगाखेडकरांना विचारलें,

" कां, मग कुठें राहण्याचा बेत आहे ?"

"घरून निघतांना तर सांगितलंय कीं बहुधा वसतिगृहांत राहा म्हणून!" गभीर चेहरा करून गंगाखेडकर उद्गारले. मला रेसिडेन्सीची फारशी आशा नव्हती. तरी पण माझ्या मित्राला मी सुचविलें,

'कारे ? यांना रेसिडेन्सींत जागा मिळेल का ?' तो माझा मुंबईचा मित्र आधुनिक संस्कृतींत वाढलेला असल्यामुळें सभ्यतेचा आव आणीत म्हणाला,

'हो, प्रयत्न करायला काय हरकत आहे ?'

'हो, अवश्य,'

" माझ्या मित्रानें माझी रजा घेतली. रेसिडेन्सीच्या अर्जांचा निकाल एक आठवडयानें लागणार होता. त्यावेळीं रेक्टर मोठे कडक शिस्तीचे होते. मी त्यांना ऑफिसांत भेटायला गेलों त्यावेळीं त्यानीं साफ जागा नाहीं असें उत्तर दिलें !

" मी हात चोळीत खोलीवर परत आलों. तीं वार्ता माझ्या मित्राच्या कांनी घालतों तोंच गंगाखेडकरांची स्वारी हास्यमुखानें अवतरित झाली...

" अहो जागा मिळाली आम्हाला !"

तो त्याचा आनंदोद्गार ऐकून मला आश्चर्यच वाटलें !

माझ्यानंतर पंधरवाडयानें अर्ज करून जागा मिळाली हें आश्चर्यच नव्हे काय ? रेक्टरना जाब विचारण्याची सोय नव्हती ! 'आपलें नशीब' म्हणून स्वस्थ बसलों !"

" संपली गोष्ट ?" त्या तरुणानें विचारलें.

" छेः ! छेः !" मी हसत म्हणालों, " खरी मजा गंगाखेडकरांच्या तोंडूनच आम्हांला ऐकावयाला मिळाली. सायंकाळीं जिमखान्यावर तो भेटला तेव्हां मी त्याला विचारलें.

'का खोली सजवली का ?'

त्यानें एकदम मला एक ठोसा मारला ! त्या क्रोधाविष्ट मूर्तीकडे मी आ वासून पाहत होतों ! मीं पुनः विचारलें,

'कुठें आहे तुमची जागा ?'

'आगरकर क्वार्टर्समध्यें मला स्थान दिलेंत, नाहीं का ?' आतां मात्र मला हंसे आवरेना ! माझ्या मित्रानें त्याचा फार्म भरला होता, "Mrs. Gangakhedkar.

"अन् रेक्टरनें गंगाखेडकरांना मुलींच्या होस्टेलमध्यें स्थान दिलें"

आतां मात्र माझ्या नवपरिचित मित्राला हंसूं आवरेना ! पण मी पुढें म्हणालों, "मजा तर पुढेंच आहे ! हे राजेश्री जेव्हां आगरकर क्वार्टर्समध्यें दाखल झाले तेव्हां सगळ्या मुली कॉलेजांत गेल्या होत्या ! परत येऊन प्रत्येक जण त्याच्या खोलीपुढें उभी राही; आश्चर्य आणि उत्कंठा यांनीं ओथंबलेला एक कटाक्ष टाकी; हळूच स्वर्गांगनेप्रमाणें अदृश्य होई ! आमच्या अबोल गंगा-खेडकरांना सहा तास बाहेर निघणें मुष्कील झालें !"

आतां माझ्या मित्राला हास्याचें पेव फुटलें !

परभणीच्या पिंपळगडाचा पूल अन् त्या सिग्नलांची दुक्कल माझ्या दृष्टिपंथांत येतांच मीं माझें सामान सावरलें. गंगाखेड लाइनवरील त्या रुक्ष प्रवासांत करमणूक केल्याबद्दल त्यानें माझे आभार मानले. स्टेशनवर उतरून त्याचा निरोप घेण्यापूर्वी मी म्हटलें, "काय फर्ग्युसोनियन ! आतां बोला. गंगाखेड शुष्क आहे कां ?"

"It's marvellous !" माझ्या मित्रानें मुक्तपणें हसून उत्तर दिलें.

गाडी सुटली गंगाखेडकरांच्या स्मृतीच्या आनंदांत आम्ही रुमाल फडफडविले.

"मौज," १७ मार्च १९४३

---

# १. लपलेला प्रकाश

'आय्. सी. एस. नवरा बघूनच तुला हवाली करीन हं कोकेळा!' असं तात्या लहानपणीं म्हणत त्याची किती गोडी वाटे मला! 'आय् सी. एस्.' म्हणजे सारसर्वस्व वाटायचं मला. तात्या कुणीहि लंगोटीयार मित्र आला कीं माझ्या इंग्रजी वक्तृत्वाची तोंडभर स्तुती करीत म्हणतच मुळीं,

'आमची कोकिळा अशी बोलते सभेत विचारतोस, अप्पा, आय् सी. एस्. बघून देणार आहे तिला!...' अन् मग ह्यः ह्यः ह्यः करून ते जी हास्याची मजल उठवीत... आतां अगदीं किळस येते आहे त्याची! एक दिवस त्या वाराच्या मुलानं संध्या केली नाहीं म्हणून किती रागावले तात्या! मला वाटलं मोठीं माणसं कुसुमासारखीं मृदु अन् वज्रासारखी कठोर असतात! गांधी, जवाहिरलाल, सावरकर...किती ठळक उदाहरणं–मग आमचे तात्या कां बरं तसे नसतील?

पण कोव्हळ्याची साल...दुरून रम्य दिसली तरी किती टणक न् कठोर असते!

तात्या माझ्या खोलींत आले.

वेणी घालून मी नुकतीच आरशांत बघत कुंकू लावत होतें. तात्यांनीं काल मोठ्या आग्रहानें आणून दिलेल्या पावडर नि स्नोच्या बाटल्या टेबलावर होत्या. आवडत्या वडिलांनीं आग्रहानं आणून दिलेल्या वस्तू! कोणती आज्ञाधारक मुलगी त्यांचा अनादर करील?

मी सहजच केवळ नमुना म्हणून त्या बाटल्यांचें बूच काढलें, अन्—

अगदीं त्याचवेळीं तात्या आंत येऊन म्हणाले,

'अस्सं! पावडर नि स्नो लावायला शिकलं पाहिजेस तूं कुले! मोहनराव आय्. सी. एस्. बरोबर तूं आतां मोटारींतून मिरवणार अन्—'

'हें हो काय तात्या!' मी खरोखरच किंचित् रागानं उत्तर दिलं.

पण तात्यांना इंग्रजी कदबऱ्यातला लटक्या रागाचा अविर्भाव वाटला तो! मी लज्जनं सानंद मान खालीं घातली अस समजून ते म्हणाले,

'सूर्य उगवला म्हणजे सूर्यकमळं फुलतात असं आमचे गुरुजी सांगत; पण—'

'काय? आहे काय?' मीं उत्सुकतेनं विचारलं,

हीं कमळं फुलवण्याचं काम आजकाल पोस्टऑफिसानं घतलेसं दिसतंय!'

'म्हणजे?' तात्यांना एकदम अकालीं आठवलेली ही काव्यस्फूर्ति पाहून माझ्या तोंडांतून आश्चर्योद्गार बाहेर पडला.

'अग, एवढी कॉलेजियन पोरगी तूं! लंडनहून रावबहादुरांच्या चिरंजीवाचं पत्र आललं तुला समजू नये! बाल्यभावच अजून गेला नाहीं तुझा!'

असं म्हणून त्यानीं सदऱ्याच्या खिशांतून एक भलं मोठं लांबलचक पत्र बाहेर काढलं.

'बघ कसं गुलहौशी लिहिलं आहे पत्र! आय् सी. एस् ला शोभतंय अगदीं. वाचून बघ.'

असं म्हणून त्यांनीं लंडनहून आलेलं तें मोहनरावांचं पत्र माझ्या हातीं दिलं मोहनराव—रा. ब आगलाव्यांचे चिरंजीव अन्. आतां आडपडदा कशाला ठेऊ? ज्वालामुखी फुटल्यावर तो उकलल्याशिवाय राहतो कां? तसच! मोहनराव माझे भावी पति जवळ जवळ ठरूनच गेल्यासारखं होतं तें! वाङ्‌निश्चय झालेल्या भावी पतीचं पत्र...आनंदाच्या गुदगुल्या होत असतात सारख्या. निरभ्र प्रांगणांत शशीनाथ फुलला म्हणजे रजनीदेवी हंसत असते नाहीं? तिच्या हास्यमुखांतून झडणारी फुलं नाहीं कां त्या हंसऱ्या प्रांगणांत उमटत? किती मनोहर दृश्य!

पण तें अनुभवण्याचं भाग्य माझ्या नशिबीं आहे कां? आय सी. एस. नवरा!

राजप्रसादासारखा बंगला, खूण करतांच धांवणारे नोकर, बादशाही रोल्सराइस, नाटकं, सिनेमा अन् वर कलेक्टराच्या पत्नीचा अभिमान . !

अभिमान ?...छे !

भोंवतालचं जग काय सांगतं ?

हिंदुस्थानांतलं उत्पन्न विभागलं तर एकेकाच्या वांट्याला तीन तीन पया येतात म्हणे ! किती शोचनीय आर्थिक अवस्था ही ! आपल्या बांधवांसाठीं प्रयत्न करणं वाईट आहे असं कोण म्हणेल ? पण—त्यांचं पत्र मी वाचूं लागलें,

" माय डार्लींग,

तरीच भयंकर पॅशिनेट झाली असशील तूं ! पण लाडके तुझ्याकरतां मी किती व्याकुळ झालो आहे हे तिथे इंडियांत तुला कसं कळणार ? माझ्या भावना—काय सांगूं ? मराठीसारख्या 'आकुंचित' भाषेत मला आपले विचार सरळ कळवतां देखील येत नाहींत ? इंग्लीशसारख्या स्प्रेड लँग्वेजमधून लेटर्स लिहायला तुला किती वॉर्निंग्ज दिल्या तरी...आतां मात्र इंग्लीशमधून पत्र आलं पाहिजे ! अन् तें कसं...क्वाइट गिलब अँड पॅट !...बरं तुझा अँगर घालविण्याची मोठी मजेदार ट्रीक आली आहे माझ्या फर्टाइल डोक्यांत ! तुला येतांना अगदीं सुंदर...इंग्लंडांतल्या लेटेस्ट फॅशनचे झगे नि उंच टाचांचे बूट घेऊन येईन ! तुझा तो लांब केसांचा खडबळ गांठोड्यासारखा आंबाडा विचित्रच ! आय सी एस. च्या बायकोला पाहून हंसतील लोक !..."

तें अश्लील वाक्य पाहून माझं डोकं बिघडून गेलं तीं निर्लज्ज विधानं वाचून माझ्या डोक्यांतलं आधींच गढूळ झालेलं त्यांच्या संबंधीचं मत पार बिघडून गेलं.

त्यांनीं पुढें लिहिलं होतं,

" तुझी किती आठवण होते म्हणून सांगू ? निव्वळ तुझ्यासारख्याच चेहऱ्याची एक गोंडस पोरगी काल मला दिसली अन्...

आतां मात्र मला त्या निर्लज्ज प्रेमपत्राची शिसारी आली. पवित्र प्रेमाला आपल्या अश्लील शृंगाराची प्रेमपत्रें लागत नसतात! मजबद्दलच्या आपल्या प्रेमाची हौस एका इंग्रज छटेल पोरीवर भागवून घेतात म्हणे! किती निर्लज्जपणा! सारासाराचें तारतंत्र—आतां इंग्रज बनलेल्या माणसाला ते राहात नसतं हें मी विसरलें! विलायती गुलाबांना वास नसतो हें आतां कुठं माझ्या लक्षांत येत होतं!...

अन् तात्या—

'कुली आतां आय् सी. एस. ची बायको होणार!' असं बाहेर तंबाखूचें पान पितळी खलबत्यात कुटीत कुठल्याशा लंगोटीयार मित्राला म्हणत होते.

म्हातारपणीं माणसाची वृत्ती खरोखरीच बारगळते कीं काय कुणास ठाऊक? झाड जुनं झालं म्हणजे तें वर वाढण्याऐवजीं खालीं जमनींतच त्याच्या पारंब्या घुसूं लागतात हे काय मला माहीत नव्हतं?

—पण मूल जाऊन जिवलग बाळंतीण बायको वांचली म्हणजे नवऱ्याला हायसं वाटूं लागतं. त्याचा मला अनुभव येऊं लागला.

यशवंत...हो, माझ्या आयुष्यांत यशाची नवी ज्योत खेळविणारे यशवंत! ते खरोखरीच 'जयंत' आहेत! फब्रुवारी-मार्चचे कॉलेजांतले शेवटचे दिवस. तितकाच त्यांचा न् माझा सहवास! पण जिवाला कसा चटका लावून सोडलान् त्यानं! पहिल्या वर्गात येण्याचा अभ्यास असूनसुद्धां केवळ दलित कामगारवर्गासाठीं हातघाईस आलेली बी. ए. ची शेवटची परीक्षा सोडून देखील ते मुंबईला निघून गेले 'भाई' झाल्याबद्दल रावबहादुरांच्या मुलीनीं रागावण्याचं मुळींच कारण नाहीं असं किती गोड पत्र त्यानीं पाठवलं होतं. परेळच्या गिरणीकामगारांच्या हलाखीच्या जीवनाचं किती मूर्तिमंत चित्र त्यांनीं मागच्या पत्रांत रेखाटलं होतं. त्या पत्रातलं तें त्यांचं वाक्य अद्यापि माझ्या स्मरणांत आहे!

त्यांनीं लिहिलं होतं,

"या फुलबागेतून त्या फुलबागेवर उडत राहणाऱ्या कोकिळेला कांटेरी झुडपांत तळमळणाऱ्या जीवांची कधी कल्पना येईल कां? पण हरिश्चंद्र राजाला डोंबाच्या घरीं पाणी भरावं लागलं बरं का! तर..."

तारकांशीं नाचायला शशीनाथ हंसत अंगणांत आला म्हणजे त्यांना कशा गोड गुदगुल्या होत असतील! तसंच माझ्या हृदयाला देखील कुणीसं गुदगुल्या करीत होतं! पण—

हात धरून नाचायला अंगणच दिसलं नाहीं! मी समोर पाहिलं.

पोस्टमन नुकताच एक पाकीट टाकून गेला होता.

यक्षानं आपल्या प्रेयसीला मेघाबरोबर निरोप पाठवला होता म्हणे! त्या प्रियकरणीला मेघदूताचा निरोप--

माझं मन निर्भीड होऊन सांगूं लागलं, 'खात्रीनं तुझ्या हृदयस्वामींचं पत्र आहे हें!' अन् धडधडत्या अंतःकरणानं मी तें पत्र फोडलं माझं मन आजकाल खऱ्या होणाऱ्या पहांटेच्या स्वप्नांत विहरत असतं कीं काय कुणास ठाऊक?

मुंबईहून आलेलं यशवंतांचं तें पत्र होतं.

क्षितिजावर विलसणाऱ्या सुंदर उषादेवीच्या मनोहर दृश्याकडे बघायचा कवीला कधीं कंटाळा आला आहे कां?

तें पत्र मी सारखी वाचीतच होतें. तें कितीदां वाचलं याचं मला स्मरणच नव्हतं!

कोकिलेस सप्रेम नमस्कार वि वि.

तुझें पत्र मिळालें. तुझ्या मनांत असले देशप्रेमी विचार येतील अशी मला मुळीच कल्पना नव्हती. बड्या रावबहादुरांची मुलगी अन् पुनः त्यांतून कलेक्टर होणाऱ्या आय् सी. एस ची भावी पत्नि! पण चिखलांतहि कमळं फुलतात बरं का, कोकिळा! प्रत्यक्ष तुझंच उदाहरण. रावबहादुरी पोकळ डौल

नि गढूळ वातावरणानं उन्मत्त झालेल्या अर्धवट ' इंग्रजांच्या ' संसाराची भावी मालकीण तूं! असल्या चिखलाच्या घाणींत कमळं फुलतील असं मला स्वप्नांतही वाटलं नाहीं! बाकी याबद्दल उदार अंतःकरणानं तूं क्षमा करशीलच म्हणा!

इथं परळच्या विभागांत येशील तर तुला अठरा विश्वाचं दारिद्रय सामावलेलं दिसेल! हे लोक दलित न् पीडित आहेत. दिवसांतून आठदहा तास सारखे ते उभे राहून काम करतात, अशानं सगळ्या शरीरातलं रक्त पायांत न आलं तरच नवल!

या जगांत चाललेल्या गरीबी-श्रीमंतीच्या, लोकशाही साम्राज्यशाहीच्या फॅसिझम-कम्युनिझमच्या संग्रामांत दलित वर्गाची पिळवणूक किती होते म्हणून सांगू? त्यांच्या कल्याणाकरितां न् हिताकरितां आत्मार्पण करावसं वाटतं! पण कसं? तेंच कळत नाहीं मनातलं वादळ कधीं शांत होणार? उलट ते सारखं वाढतच आहे! अन् एक दिवस—

असाहि उजाडेल की त्यादिवशीं आमच्या सत्याधिष्ठित लढ्याला खात्रीपूर्वक यश येईल! पण— तो दिवस अद्याप बराच दूर आहे. तो जवळ आणण्याकरितां आपण झटलं पाहिजे! पण तूं कोकिळा?—

तूं इथं आली असतीस तर मी कितीतरी अधिक उत्साहानं काम करूं शकलों असतों? तुझ्या सहवासांत कांहीतरीं विलक्षण उल्हास वाटत होता खास!

अन् तूं मागच्या पत्रांत लिहिलंस, ' माझं हृदय हरवलं आहे म्हणून! वेडीं कुठली! हृदय कुठं हरवत असतं कां ग?......खरं मनांतून सांगूं?

तूं सुखी असावंस अशीच माझी आंतरिक इच्छा आहे! माझ्याविषयीं तुला ' आदर ' वाटतो ही जाणीव मला किती सुखाची वाटते. बॅरिस्टरच्या, आय् सी. एस् च्या घरीं किंवा आणखी कुठेंही तूं सुखानं रहावंस हीच माझी मनातून इच्छा आहे! प्रीति हांवरी नसते! खरी प्रीति दुसऱ्याला आनंदांत पाहूनच समाधान मानीत असते! तिच्यांत स्वार्थ नसतो. कोकिळा! तें प्रेम

नसून आसक्ति आहे तिसऱ्या चौथ्या पुस्तकांत हावऱ्या कुणब्याच्या लालची- पणाची गोष्ट तूं वाचलीस ना! अन् दोन आयांत भांडण लावून बिनतोड निवाडा दिलेल्या त्या चतुर न्यायाधिशाची गोष्ट! त्याने कसं बिनचूक ओळखलंन् सत्य!

कोकिळा! विचित्र वाटेल तुला माझं मत पण—पण परमेश्वराच्या दृष्टीत तरी सत्य कळून येईल ना? गारुड्यानं झुलविल्यासारखं हें जग झुलत असतं! अन् गारुडी?—

गारुडी व्हायची माझी इच्छा नाहीं!

म्हणतात ना सत्यमेव जयते! अगदीं तसंच! कोमल परंतु आपमतलबी आयुष्यातून मी या कांटेरी आयुष्याकडं धाव घेतली. बी. ए. च्या परीक्षेवर लाथ मारण्याचा प्रसंग आला. काय मला पुढं येण्याची आशा नव्हती? ख्याली खुशालीची, चैनीची, बंगला मोटारीची काय मला हौस नव्हती? काय मी प्रोफेसर होऊं शकलो नसतो?—पण ..

जाऊं दे!

माझ्या हृदयात तेवत असलेला नंदादीप जगाला कदाचित दिसणारहि नाही! न दिसेना का! दुसऱ्यानं आपलं गाणं ऐकावं म्हणून कां कोकिळा गात असते?

एक वेळ वाटतं—आपल्या बुद्धीची तेजस्विता, आपल्या हृदयाचा प्रकाश जगाला पुढं होऊन दाखवावा! अगदी आश्चर्यचकित करून सोडावं! पण कोकिळा! तोहि एक गारुड्याचाच खेळ आहे! काल रात्रीं झोपताना सहजच मनांत विचार आला.

प्रकाश-अन् तो कधीं लपून राहतो का! पण...

लहानपणी अलेक्झांडर पोपच्या "The Quiet Life" मधल्या त्या ओळी माझ्या कानांत घुमूं लागल्या.

Thus let me live, unseen, unknown;
Thus unlamented let me die;
Steal from the world, and not a stone.
Tell where I lie.

कोकिळा !...जास्त काय लिहूं ?

लपलेल्या प्रकाशांत चमकणारा

तुझा,
**यशवंत** ”

तें पत्र मी पुनः पुनः वाचीत होतें. तें वाचतांना माझ्या डोळ्यांतून किती अश्रुधारा वहात आहेत तें मला कळत नव्हतं !

मुंबईच्या कोपऱ्यांत तेवत असलेल्या नंदादीपाचा प्रकाश या अवाढव्य जगांत माझ्याशिवाय कुणाला दिसत असेल का ?

मी कॉलेजांत गेलें, स्त्रीस्वातंत्र्यावर सणसणीत व्याख्यानं दिलीं. त्यावेळीं तात्यांनी किती तोंडभरून स्तुती केली माझी. मला वाटलं आपले तात्या किती प्रेमळ !...

पण आतां ?...

गाईनं वाघाचं रूप धारण केलं म्हणजे माणूस किती स्तिमित होऊन जाईल ! अखेर व्हायचं तेंच झालं !

माझ्या मनाच्या इच्छेविरुद्ध मला आय्. सी. एस्. च्या गळ्यांत माळ घालावी लागली. परंतु ती माला अश्रूंची होती ! मनांत धुमसणाऱ्या अग्नीचे वाफारे त्या उष्ण जलबिंदूतून निघत होते ! अन्—

फुलांनीं सजविलेल्या गादीवर एखाद्याला कांटे मोडावेत तसं झालं मला ! मानसिक दुःखाग्नीनं माझं शरीर जळत होतं !

मुंबईला आय्. सी. एस्. कलेक्टरांची कसलीशी परिषद होती. म्हणून त तिकडं व्याख्यानाला नि खान्याला निघून गेले.

दररोज सारखं मनांत येई, 'आतां यशवंत काय करीत असतील ?'

मुंबईतल्या संपांच्या वार्ता कानांवर येत होत्या. आज ही गिरणी बंद आहे तर उद्यां ती बंद होणार आहे असा प्रकार चालला होता.

इकडून घरीं येणं झाल्यावर त्यांनीं वृत्तपत्रांत छापून आलेलं आपलं भाषण दाखवलं. सुन्दर पोझमधला फोटो दाखवला. प्रतिगामी विचारसरणी असूनसुद्धां अंध पत्रकारांनीं त्यांच्या भाषणावर अग्रलेख लिहून त्यांची तोंडभर स्तुती केली होती.

सकाळीं उठल्यावर सहजच वृत्तपत्र चाळतां चाळतां जाहिरातीच्या शेवटच्या पानावर कोपऱ्यांत यशवंतांना मार बसल्यामुळं हॉस्पिटलांत नेण्यांत आल्याचं वृत्त लिहिलं होतं !...

यशवंतांना जखम—

माझ्या मनाला असह्य वेदना होऊं लागल्या.

आम्ही मुंबईला आलों, अन् सरळ टॅक्सी करून दवाखाण्यांत गेलों.

यशवंतानां एका हवेशीर कॉटवर निजवण्यांत आलं होतं. आम्ही आंत गेलों.

'कोण कोकिळा ?'—त्यांनीं एकदम आश्चर्यानं किंचित् उठून विचारलं. वरकरणीं स्मित करीत त्यांच्या कपाळावरच्या जखमेवर बांधलेल्या पट्टीवर मी हात ठेवला.

त्यांच्या डोळ्यांत विलक्षण तेज विलसत होतं. हृदयांतल्या अतुल पराक्रमाचा तो दैदीप्यमान प्रकाश होता ! पण जग ?—

जगाला त्यांतलं कांहीं कळत नव्हतं ! जणुं बोलणं न् लिहिणं हेंच जगाच्या ग्राहकशक्तीचे व्यवहार होते ! वाघाच्या बाहुल्या उलट्या असतात ! सगळंच त्याला विपरीत दिसतं ! जगाचंहि तसंच नसेल ?...

मी यशवंतांच्या मुखाकडे पाहिलं.

त्यांचा नुकताच डोळा लागला होता. जणूं जगाचा अन्याय त्या इवलुशा नेत्रांना सहन होत नव्हता ! बाहेर पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राला काळयाकुट्ट मेघांनीं ग्रासून टाकलं होतं.

माझ्या तोंडातून अस्फुट उद्‌गार बाहेर पडले,

' लपलेला प्रकाश !... '

---

# १०. एकरात्र अन् एक दिवस

त्या सुंदर बंगलीच्या जिन्याची पायरी चढावी कीं नाहीं या विचारानं अब्दुल फुटपाथवरच थबकला.

आजची रात्र ' मजा ' करायची या विचारानं घरीं ' सेकंड शो ' ची थाप ठोकून तो बाहेर पडला होता. आपण कुठं जात आहोंत हें त्याला कळत नव्हतं असं नव्हे. उलट, कसली तरी अजब शक्ति त्याला ओढीत होती. त्या सुप्त शक्तीनंच त्याला त्या विभागांत त्या बंगलीपुढं आणलं होतं. तारुण्याच्या जोमांत सुखाची लयलूट करण्याची जी कधींकधीं जबर इच्छा होते तिच्या भरांत तो झपझप पावलं टाकीत त्या बंगलीपुढं येऊन थबकला होता.. आतां वर जावं कीं नाहीं याच कल्पनेनं त्याचं मन हेलकावे खात होतं...एखाद्या नवशिक्या पोहणारानं खोल पाण्यांत उडी मारण्यासाठी प्रयत्नांची चळवळ करावी तस्सं !

तेवढयांत—

' आइये ! आइये ! ! '

वरून बायकी आवाजांत कुणीतरी त्याला आग्रहानं बोलावत होतं. आतां पाऊल मागं घेण्यांत कांहीं अर्थ नव्हता. त्यानं पायऱ्या चढायला सुरुवात केली.

दुसऱ्याच क्षणीं तो एका प्रचंड दिवाणखान्यांत शिरत होता. त्याला पाहातांच मध्यम वयाची एक निमगोरं, स्थूल स्त्री सामोरी आली न् हसत म्हणाली.

'आइये ! राजासाहब ! आइये ! मेरे गरीबखानेकी रौनक बढाइये !...'

तिनं त्याला कोचावर बसण्याची खूण केली एखाद्या यंत्रासारखा अब्दुल त्या कोचावर बसला. दासीनं पानाचा डबा आणून ठेवला. तेवढ्यांत समोरच्या खोलीचा पडदा दूर सारला गेला अन् मंदगतीनं पावलं टाकीत आपली ओढणी सांवरीत एक तरुणी बाहेर आली ती विलक्षण सुंदर होती. एवढी असामान्य सुंदर स्त्री वेश्या असेल अशी अब्दुलला कल्पनाच नव्हती. तिचे ते टपोरे डोळे अन् धनुष्याकृति भुवया . अब्दुलचं जणुं सर्वस्व त्या हरण करीत होत्या ! तिनं पंजाबी पद्धतीचा पोषाक केला होता...अन् एक तलम निळसर ओढणी तिच्या खांद्यांची शोभा वाढवीत होती ती सामोरी आली न् हसून म्हणाली 'अदाबे-अर्ज !'

अब्दुलनं उठून त्या अभिवादनाचा स्वीकार केला. तेवढ्यांत ती स्थूल स्त्री म्हणाली,

'ही माझी मेहरुन्निसा ! माझी भाची आहे ! भारी गोड आहे ! काकडी सारखी कोवळी अन् रेशमासारखी मऊ ! ती तुम्हाला जहान्नमचं सुख देईल !...

एका वेश्येच्या कर्तबगारीचा किती विचित्र हा परिचय ! मेहरुन्निसा तर सारखी खालीं पाहत होती ! हा अभिनव प्रकार पाहून अब्दुल अगदीं बावरून गेला. त्या म्हातारीची टकळी चालू होती. शेवटीं तिनं विचारलं,

, आपका इस्मे-शरीफ ? ( तुमचं नांव काय ? ) '

' माझं नांव अब्दुल. मी एक कॉलेजचा विद्यार्थी आहे. माझे वडील एका फर्ममध्ये मॅनेजर आहेत, मी...... '

'छान ! छान ! !' ती म्हातारी त्याला थांबवून म्हणाली, 'आपली ओळख झालीं हें आमचं केवढं भाग्य ! आमच्यावर नेहमीं कृपादृष्टि ठेवा ! बरंय्... 'मी आतां येतेच !...'

असं म्हणून ती शेजारच्या खोलींत गेली. अब्दुलच्या आयुष्यांतला तो अगदीं 'पहिला-वहिला' प्रसंग होता. समोरच्या कोचावर बसलेल्या मेहेरशीं काय बोलावं हेंही त्याला सुचेना. मेहेरची ती बालिश, निष्पाप भासणारी मुद्रा...ही वेश्या असेल हें अब्दुलला खरंच वाटेना! कांहीं तरी बोलावं म्हणून तो तोंड उघडणार इतक्यांत आंतून हाक आली.

'मेहेर! मेहेरजान...'

ती चटकन उठून आंत गेली. पांच मिनिटांनंतर ती वयस्क स्त्री बाहेर दिवाणखान्यांत आली अन् अब्दुलला म्हणाली.

'आईये अंदर! मेहेर आपको याद करती है! बहुत अच्छी है हमारी मेहेर! आप बहोत खुष होंगे. खुष होकर जो आप देंगे वह हमें मंजूर होगा! आपकी खुषी और हमारी खुषी क्या अलग है?'

त्या म्हातारीची ती मिठ्ठास वाणी ऐकून अब्दुल गार झाला. अगदीं यंत्रासारखे त्याचे पाय उंबरठा ओलांडून आंत गेले. आंत शिरतांच पलंगावर मेहरुन्निसा बसलेली त्याला दिसली...त्या वयस्क स्त्रीनं तिला निश्चित सजवलं होतं...तें सौंदर्य पाहून अब्दुल चकित झाला. त्याच्या आयुष्यांत निर्माण झालेला तो पहिलाच प्रसंग—

तो आंत जातांच ती उठून उभी राहिली न् म्हणाली, 'बैठिये!'

एखाद्या सुसंस्कृत, सुविद्य तरुणीनं स्वागत करावं तसे ते बोल अब्दुलला भासले. वेश्या अशाच असतात का? सभ्यतेचं हें मोहजाल तर नसेल? अब्दुल स्तिमित झाला. जी भूक भागविण्यासाठीं तो त्या ठिकाणीं धाडस करून आला होता...त्या भुकेचंच त्याला विस्मरण घडलं. त्याची ती वावरलेली दृष्टि पाहून मेहरुन्निसाला नवल वाटलं. तिला वाटलं....एकंदरींत स्वारी नवीन दिसते! नेहमीं येणाऱ्या पुरुषांसारखी पाशवी बेफाट झालेली नाहीं अजून! सुरुवातीचा सौंदर्य पाहून बेभान अवस्थेत होत असलेला अनु-

नयही नाहीं अन् शेवटचा पशुत्त्वाकडं वाहून नेणारा निर्दय अत्याचारही नाहीं... ती स्तिमित झाली. सुरमा घातलेले डोळे फिरवीत ती म्हणाली.

' लीजिये ! पान तो लीजिये ! '

' हां, ' पुढं आलेला डबा उघडीत तो म्हणाला, ' पान और इतर (अत्तर) से तो बिदाई (निरोप देणं) होती है। ' ' नहीं, नहीं ! ' मेहेर हंसून म्हणाली, ' इसका मतलब है आप फिर इधर आवें ! '

तिचं तें विनोदी उत्तर ऐकून अब्दुलच्या मनावरचं दडपण एकदम कमी झालं अन् मोठ्या धारिष्टानं तिचा हात हातांत घेऊन तो उद्गारला.

' मेहेर ! किती सुंदर आहेस तूं ! '

' खरंच ? '

' तुझे डोळे ! फारच सुंदर ! फार छान ! .. '

' कसे ? मासळीसारखे ? कीं हरिणीसारखे ?... '

' खरंच ग ! अगदीं शरबती आँखें !... '

' अन् माझ्या भुंवया ? '

' नेत्रांतनं निघणाऱ्या बाणांचीं धनुष्यं !... '

अब्दुल रंगांत आला या आपल्या नेहमीच्या समजुतीनं मेहेरनं विचारलं, ' दिवा विझवूं ?... '

' विझव ! मेहेर ! तूं चन्द्र आहेस ! चन्द्राचा प्रकाश असल्यावर या दिव्याची काय कथा ! मेहेर ! तूं माझं सर्वस्व आहेस ! मेहेर ! तुझ्यावर माझं प्रेम आहे .. '

अब्दुलचे ते शब्द ऐकतांच खिन्न होऊन मेहेर म्हणाली, ' अब्दुल ! आता पुरे ! प्रास्ताविक पुरे ! आजपावेतों जेवढे खुशालचेंडु उंबरठा ओलांडून आंत आले त्यापैकीं प्रत्येकानं माझं शरीरसुख लुटण्यापूर्वीं असंच म्हटलं होतं. ' माझं तुझ्यावर प्रेम नाहीं... ' असं म्हणणारा एकही सच्चा सद्गृहस्थ

अजून या घरांत आला नाहीं. प्रत्येकजण लाळ घोटून हेंच म्हणत होता, माझं तुझ्यावर प्रेम आहे....' प्रेम ! ते किती वेळ ! पांच मिनिटं ! दहा मिनिटं! पंधरा मिनिटं ! मिनिटांचं प्रेम ! अब्दुल ! प्रवासांत तहान लागलेल्या वाटसरानं कधीं ओढयावर न् विहिरीवर प्रेम केलं आहे काय ?...'

तिची ती अमोघ वाणी ऐकून अब्दुल भावविवश होऊन म्हणाला.

'खरंच ! मेहेर, अल्लाची कसम ! माझं तुझ्यावर प्रेम जडलं आहे ! मी तुझ्यासाठीं वाटेल तें...'

त्याच्या त्या भावोद्रेकाला अडथळा आणीत ती म्हणाली, 'अब्दुल ! आजपावेतों अनेकांनीं माझ्यावर हार्दिक प्रेमाच्या शब्दसुमनांचा वर्षाव केला आहे....त्या ओझ्याखालीं मी दडपून गेलें आहे ..'

'पण,' अब्दुलच्या डोळ्यांत कसलीशी चमक भरली, 'माझ्यावर विश्वास ठेव मी तसा नाहीं मी तुझ्याशीं एकनिष्ठ...'

'काय अब्दुल ! तुम्ही कुणापुढं बोलत आहांत ? वेश्येशीं लग्न करायला तयार व्हाल तुम्ही ? वेश्या...वेश्या...अनेकांच्या लालसेचा न् उपभोगाचा विषय झालेली दुर्दैवी स्त्री...'

'हो . हो ! .. मी तुझ्याशीं लग्न करीन. मी तुझ्याशीं संसार करीन. माझे आईवडील फार चांगले आहेत तुझं आमच्या घरांत स्वागत होईल. पण, मेहेर, तूं या मार्गाला कशी लागलीस ? मला सांग ना !...'

'नको अब्दुल ! उगाच त्या दुःखी आठवणी नकोत ! तुम्ही सुखाच्या अपेक्षेनं वर आलांत, तुम्हाला का बरं मी दुःखी करूं ?'

'छेः ! छेः ! मेहेर,' अब्दुल अजीजीनं म्हणाला, 'मी फार उत्सुक आहे. सांग ना ! माझ्यावर विश्वास ठेऊन सांग ना "

'ती एक दुःखद कहाणी आहे .'

'सांग मला . . माझी उत्सुकता आतां वाढवूं नकोस.'

अब्दुलच्या त्या मधुर न् लाघवी भाषेनं मेहेर प्रभावीत झाली. तिला वाटलं .. करावं आपलं हृदय मोकळं एकदा .. तिनं बावरून विचारलं.

'मी सांगेन. पण, तुम्ही तें गुपित राखलं पाहिजे.'

'हो.'

अब्दुलच्या केसांकडे पाहात मेहेर बोलूं लागली.

'आमचं मूळ राहण्याचं शहर दिल्ली माझा जन्म तिथंच झाला. श्रीमंत आईबापाची एकुलती एक लाडकी मुलगी .. मी. अम्मा, अब्बा न् मावशी एवढीच घरांत माणसं. फार सुखांत अन् लाडांत गेले माझे दिवस. पण नशीबाला माझं तें सुख पाहावलं नाहीं. मॅट्रिक पास होऊन मी नुकतीच कॉलेजांत जाऊं लागलें होतें—न् दिल्ली शहरांत प्लेगची भयंकर साथ आली जुन्या शहरांत सर्वत्र घाण . त्यांत कांहीं तासांच्या अंतरानं अम्मा अन् अब्बा मला सोडून गेले या जगांत मावशीखेरीज मला कुणाचाच आधार नव्हता. पण, आधार कसला तो ! कुऱ्हाडीचा दांडाच म्हणतात ! त्यावेळीं मी अतिशय भावडी होतें ! अल्लड होतें ! मला 'जगाचा' संपर्क झाला नव्हता. व्यवहार कळत नव्हता, आंतबाहेर कळत नव्हतं ! मावशी म्हणाली, 'चल ! पुरे झाली ही दिल्ली ! ही कमनशिबी आहे. आपण मुंबईला जाऊ !' अन् लवकरच आम्ही मुंबईला आलों. प्रथम-प्रथम ती माझ्याशीं फार प्रेमळपणानं वागे आमचं दिल्लीचं घर भाड्यानं दिललं होतं. इथं आल्यावर एका तरुणाशीं माझी मावशीनंच ओळख करून दिली तो नेहमीं येई. ती उत्तेजन देई. एकदा त्यानं माझ्याशीं लगट केली तेवढयांत मावशी खोलींत आली न् ओरडली

'अवदसे हें काय माडलंस तूं ! तारुण्य तुला गप बसूं देत नाहीं होय ! थांब ! तुझी खोड काढतें...'

त्याक्षणापासनं तो तरुण रागावून परत गेला तो आलाच नाहीं ! मी भांबावून गेलें, मावशीच्या धमक्यांना मी बळी पडलें न् हळूहळू या व्यवसायाची पाऊलवाट चालूं लागलें...''

'तीच ना तुझी मावशी ?'

'हो'

'काय भयंकर स्त्री आहे ! जहांबाज ! अन् तूं एवढी कॉलेजांत शिकणारी, अन् तूं का बळी पडलीस ?'

'मी अननुभवी भाबडी पोर ! तिची हुकमतच जणुं ! तिच्या पंजांत मी सांपडलें ती सापडलें...'

'वा ! वा ! ! म्हणजे जन्मभर असं लाजिरवाणं जिणं कंठगार वाटतं ? छेः छेः ! मी तुला येथून नेणार !....'

'मला नेणार ? कुठं ? वेड तर लागलं नाहीं तुम्हाला ?'

'तुझ्यापायीं वेडा होईन खचित ! ऐक माझं ! आपण येथून पळून जाऊं ! या रात्रीन तुझी मुक्तता केली असं समज !....'

'काय म्हणतां अब्दुल ? मी वेश्या ! फुटकी कांच ! अन् मला....'

'छेः ! छेः तुला माझ्याबरोबर आलंच पाहिजे .. नाहीं म्हणूं नकोस !' असं म्हणून अब्दुल तिच्या अगदीं जवळ गेला न तिच्या डोळ्यांवर अन् कपाळावर त्यानं आपले ओठ टेकले तिनं त्याला प्रतिकार केला नाहीं. त्या मृदु स्पर्शानं तिचं धडधडत असलेलं ऊर शांत झालं. तिचं हृदय त्या स्पर्शातून निर्माण झालल्या मधुर कल्पनवर विसावलं .. तिला पहिल्याप्रथमच आपुलकी न् निष्ठा यात सामावलेल्या सुखाचा आभास होत होता

तेवढयांत अब्दुलची दृष्टि कोपऱ्यांत गेली .. लोखंडी गज नसलेली खिडकी होती ! खालीं जिन्याचा ओटा होता ! तिचा हात धरून तिला ओढीतच त्यानं खिडकीपाशीं नेलं . जिन्याच्या पायऱ्या न् खालचा शुष्क रस्ता पाहात तो म्हणाला,

'मेहेर ! पाहिलास आपल्या सुटकेचा मार्ग ! या खिडकींतनं त्या ओटयावर उडी मारली कीं झालं ! तूं लहानपणीं शिकलीस न् उडया मारा-

यला शर्यतींत ? आयुष्याची शर्यत आपल्याला जिंकायची आहे आता! चल या पिंजऱ्याबाहेर . .

त्यानं तिचं मस्तक आपल्या छातीशीं लावलं. त्याच्या शर्टच्या गुंड्यांशीं खेळत तिनं विचारलं, ' तुम्ही कुठं नेणार मला ? "

' मी तुझ्याशीं लग्न करणार आहे. तूं एक दिवस न् एक रात्र माझ्या मित्राच्या खोलीवर रहा . . परवां आपण काजीपुढं विवाहबध्द होऊं नंतर आपण घरीं जाऊं अम्मा न अब्बाजानची या बाबतींत मला मोकळीक आहे...

'कोण आहे तुमचा मित्र ?'

' माझा सहाध्यायी आहे. खोली घेऊन परळला राहतो तो आजच्या रात्रींच तिथं जाऊं आपण . परवा रात्रीं आपलं लग्न होईल . . मेहेर ! माझ्यावर विश्वास ठेऊन चल !...

त्यानं तिच्या डोळ्यांवर पुनः ओठ टेकले

रात्रीचे तीन साडेतीन झाले असावेत. मेहेरनं आयुष्यांत पहिल्यांदाच निर्णय घेतला. पिंजऱ्याबाहेर ! प्रथम त्यानं उडीं टाकली नंतर तिनं उडी टाकली. मावशी दिवाणखान्यांत डुलक्या घेत पहुडली होती. जिन्याच्या पायऱ्या सावकाश उतरत तीं दोघं रस्त्यावर आलीं चिटपाखरू नव्हतं. डाव्या बाजूनं तीं चालूं लागलीं. कोपऱ्यावरचं हाटेल अर्धवट उघड होतं. त्या हॉटेलचा मालक पापामियां भरभर चालणाऱ्या मेहेरकडं पाहून ताना घेत होता...हम चले परदेस..."

अब्दुल अन् मेहेर भरभर वाट चालत होते. एक तासानं ते परळला येऊन पोंचले मित्राची खोली जवळ आलेली पाहून मेहेरचं ऊर पुनः धडधडूं लागलं अब्दुलनं दारावर थाप मारली, दोनतीन हाका मारल्या मेहेर कोपऱ्यांत उभी राहिली. थोड्याच वेळांत दार उघडलं गेलं न् ती व्यक्ति जोरांत ओरडली

" वा ! अब्दुल ! तुम इधर किधर ? वा, दोस्त !...

' भैई हम आ ही गये...मेरी मदद करो, दयाशंकर !

दयाशंकर अन् अब्दुल जानी दोस्त होते अब्दुलनं त्याला सगळी हकीगत सांगितली. दयाशंकरनं मेहेरचं स्वागत केलं एक दिवस न् एक रात्र ...

" मेहेरबहेन ! यह आपकाही कमरा ( खोली ) समझो ! मै तो हूँ अकेला ' .."

' मोह का सागर, सुरा का रेला ! ' अब्दुल हंसत म्हणाला.

अंधाराची वाट चालून रात्र संपत चालली होती मेहेरला वाटलं, आपल्या आयुष्याचीही रात्र अशींच संपुष्टांत येत चालली आहे ! आता फक्त एक दिवस अन् एकच रात्र...तिनं चहा केला. दयाशंकर अन् अब्दुल यानी हसतखेळत चहा घेतला. दयाशंकर म्हणाला,

' मेहेर-भाबी ! तुम्हारा चाय तो चाय नहीं ! अमृत है अमृत ! ..'

मेहेरल अस्मान ठेंगणं झालं ! ' मेहेर-भाबी !...'

संध्याकाळीं येण्याचं वचन देऊन अब्दुल निघून गेला दयाशंकर कॉलेजांत निघून गेला. अन् आपल्या भावी सुखाचे मनोरें रचीत मेहेर घडयाळ न् रस्ता यांच्याकडं आळीपाळीनं पाहात वेळ घालवूं लागली. दुपारीं खाणावळीचा डबा आला. तिनं जेवण उरकलं न् सुपारी चघळीत ती खिडकींतनं बाहेर पाहूं लागली. एका ट्रॅममध्ये तिला पापामियाँ दिसला...तिच्याकडे पाहून. तो गुणगुणला असावा...' हम चले परदेस...'

तिचं पुनः घडयाळाकडं लक्ष गेलं. पांच वाजत आले असावेत...थोडयाच वेळांत अब्दुल येईल.

त्याच वेळीं—

काळबादेवींत अब्दुल मेहेरकरतां हिऱ्याची अंगठी विकत घेण्यासाठी दुकानांतनं हिंडत होता. तिच्याकरतां त्यानं डझनभर साडया खरेदी केल्या होत्या...आतां फक्त अंगठी घेतली कीं तो परळला जाणार होता...शेवटीं एका दुकानांत त्याला आवडणारा खडा असणारी अंगठी मिळाली. ती अंगठी

पाहून त्याला त्याच्या प्रेमळ आईचं सकाळचं बोलणं आठवलं. तो जेवतांना आईला म्हणाला होता.

‘ अम्मा ! तुम बोलते है ना बहु चाहिये ! ’

‘ वा ! अब्दुल ! इंतेजार करते करते थक गई ! ’

‘ अम्मा ! तुम्हें बहू मिल जायेगी ! बहुत अच्छी है... ’

अब्दुलच्या आईचा आनंद गगनात मावेना पण पुढं कांहीं अधिक न सांगतां अब्दुल बाहेर पडला. त्यानं कॉलेजला तर बुट्टी मारली होती लग्नाची कल्पना, तयारी, भीतीची भावना ! . कमल्याहतरी ओढ शिरशिरीचा त्याला आभास होत होता . . . तरी विलक्षण सुखाच्या लहरींत, आनंदाच्या धुंदींत तो चालत होता एका दुकानांतून दुसऱ्या दुकानात आनंदाचीं मनोराज्यं त्याला ओढून नेत होतीं...भोवतालच्या जगाचा त्याला विसर पडत चालला होता.

तेवढयात त्याला सुंदर फुलांची एक वेणी दिसली. रस्त्याच्या दुसऱ्या कडेनं तो फुलविक्या पोऱ्या ओरडत चालला होता ती वेणी पाहतांच अब्दुलचं भान हरपलं...वेडया प्रेमिकाप्रमाणं तो त्या मुलाकडं धावला,

तोंच—

एका टॅक्सीच्या ब्रेकचा ‘ कर्रर कर्र कर्र ’ असा आवाज झाला. अब्दुलच्या पायाला जोराचा धक्का बसला.. अन् पुढं काय झालं तें अब्दुलला कांहीं कळलं नाहीं तो जेव्हां जागा झाला तेव्हां तो एका हॉस्पिटलमध्ये होता.

त्यानं डोळे किलकिले करून पाहिलं तो एक नर्स त्याच्याकडं येत होती. ती जवळ येतांच त्यानं विचारलं,

“ मी कुठं आहे ? ”

“ तुम्ही शांत राहा...पाय हालवूं नका ”

‘ मेहेर कुठंय ? ’

'कोण मेहेर ? तुमच्या पर्सवर तुमचं नाव न् पत्ता होता. तुमच्या घरी फोननं कळवलं आहे. लवकरच तुमची माणसं येतील...तोवर तुम्ही शांत रहा. बोलूं नका...

अब्दुलनं पुनः डोळे मिटून घेतले. तो पुनः जागा झाला तों त्याची आई आली होती...वडिलही आले होते...तिचा प्रेमळ हात कपाळावर फिरताच त्याला बरं वाटलं...पण मेहेर ? त्याचा जीव सारखा तडफडत होता...त्याच्या अंगांत त्राण उरलं नव्हतं.

अन् मेहेर ?

ती अब्दुलच्या वाटेकडे डोळे लावून बसली होती. रात्र झाली. अंधार आला पण अब्दुलचा पत्ता नव्हता ! न् भीतीनं मेहेर घाबरून गेली. तिला धीर देण्याच्या उद्देशानं दयाशंकर म्हणाला,

'मेहेरबहेन घबराओ मत ! अब्दुल अभी आही जायेगा ! !

पण, अब्दुल आला नाही. रात्र संपली. दिवस उजाडला. एकच रात्र अन् एकच दिवस ! ...

मेहेरच्या मावशीच्या घरीं नुसता हाहाकार उडाला होता ! मेहेर पळून गेलेली पाहून मावशीच्या अंगाचा तिळपापड उडाला होता. तिची बटीक, तिची गुलाम...बंडखोर होऊन पळून गेली हृ ती. तिचं मस्तक मुडानं भडकून गेलं होतं...ती सकाळीं घराबाहेर पडली तों संध्याकाळ परत चालली होती.. कोपऱ्याच्या हॉटेलावर ती वळली न् पापामियाँ गाण्यात लकेर घेत असलेला तिला दिसला—

'हम चले परदेस......'

तिला पाहून तो म्हणाला 'क्यंव ? दीदी ! बहुत मरुफ (घाबरलेली) नजर आरही हो !'

'क्या करूं ?' मावशी कपाळावर हात मारीत म्हणाली, 'सुबह से मेहेर का पता नहीं ! कहां गई !...'

'मैं बताऊं ?' पापामियाँनं हसत विचारलं
'बताओ ! बताओ पापामियाँ ! ईश्वर तुम्हारा भला करे...'
'पहले तुम मेरा भला करो..'
'जो तुम चाहे सो दूंगी ' पहिले बता दो...'
अन् दुसऱ्या दिवशी—

अगदीं सकाळीं अब्दुलचा तपास काढण्यासाठीं दयाशंकर बाहेर पडला. तो परत येण्याची मेहेर उत्सुकतेनं वाट पाहात बसली. अर्ध्यातासानं दारावर थाप बसली मोठया आशेनं तिनं दार उघडलं——

पाहातें तों दारांत तिची मावशी !

तिच्या हातांत एक वेताची छडी ! तिच्या मागं दोन गडी न् पापामियाँ !

मावशीचा तो रुद्रावतार पाहून मेहेरला भोंवळ आल्यासारखं झालं. ती मटकन खालींच बसली. शिव्या, आरडाओरडा, लाथा, बुक्के न छड्या.. यांची आपसात जणुं शर्यतच लागली होती. शेजारी-पाजारी जमा झाले होते. पळून गेलेल्या भाचीला घरीं नेणारी कजाग मावशी...तिचा हक्कच नव्हता का तो ! तिच्या त्या हक्काची अंमलबजावणी आसपासचे तमासगीर बघत होते.

मेहेर ओरडली, रडली, किंचाळली.. अन् शेवटीं मार असह्य झाल्या-मुळं बेशुद्ध पडली. तिच्या मावशीनं तिला फरफटतच व्हिक्टोरियांत घातलं. तो तमाशा संपतांच तमासगिरांची पांगापांग झाली.

आठ दिवस झाले तरी तिच्या माराचे वळ अद्याप गेले नव्हते. पापामियाँनं तर नुसता हैदोस घातला होता. मेहेर जगाला कंटाळली.. तिच्या करपलेल्या मनांत आशेचा ओलावा न प्रीतीची उब निर्माण झाली होती—पण, ती किती वेळ ?...एक रात्र अन् एकच दिवस !...पुनः तिचं कष्टप्रद जीवन सुरू झालं होतं...

आठ दिवसांनीं अब्दुलचा पाय बरा झाला होता. त्याला हिंडतां फिरतां येऊं लागलं होतं म्हणून दवाखान्यांतून त्याला घरीं आणण्यात आलं होतं. तो पलंगावर पहुडला होता...अगदीं बेचैन होता अब्दुल. गेले आठ दिवस त्यांच्या घराला कुलूपच होतं दयाशंकरच्या खोलीवर जाण्याची त्याला विलक्षण अबर इच्छा झाली होती. शेवटीं त्यानं आईला विचारलं,

' अम्मा, मुझे जरा बाहर जाना है ! '

' तुम पागल तो नहीं हुये, अब्दुल ! '

' नहीं अम्मा,—मैं सहल करना चाहता हूँ ' मोटर में ! बहुत जल्दी वापस आ जाऊँगा ! मुझे जाने दो . '

त्यानं सारखा हट्ट धरला. आईनं परवानगी दिली. ताबडतोब टॅक्सीतनं तो दयाशंकरच्या खोलीवर गेला. त्या वेळी सहा वाजले होते. तरी दयाशंकर खोलीवर होता अब्दुलला पाहताच तो ओरडला,

' कमाल केलीस अब्दुल ! अरे गेले आठ दिवस...'

' दया, महर कुठंय ? '

' ती गेली ! तिच्या मावशीनं तिला मारीत नेलं...काय तमाशा केला ! सगळे शेजारी सांगतात...'

दयाशंकरनं अब्दुलला सगळी सविस्तर हकीगत सांगितली. ते ऐकून अब्दुलच्या हृदयाला विलक्षण वेदना झाल्या. तिच्या अपमानाला, दुःखाला न् माराला शेवटीं आपण कारणीभूत झालों...या कल्पनेनं अब्दुल व्यग्र झाला. शेवटीं त्यानं निश्चय केला कीं मेहेरला तिच्या कजाग मावशीच्या पंजांतून सोडवायचंच...

दयानं विचारलं, ' अब्दुल, एवढा कसला विचार करतोस ? '

' दया, मला फार दुःख होत आहे मी तिला सोडवणारच ! त्याशिवाय मी अन्न घेणार नाहीं...'

अब्दुलचं ते भाषण ऐकून दया एकदम म्हणाला,

' अरे, तूं पुनः तिच्या घरीं जा...अन्...'

' पण, तिची मावशी ?...'

' अरे, वेष बदलून जा ! त्या बुढ्ढीला अंधारांत...'

' शाब्बास ! दया ! शाब्बास ! '

एक दीड तासानं दयाशंकरच्या मदतीनं अब्दुलचा 'तल्यारखान' झाला. तो फेटा, त्या दाभणकाठी मिशा, ते कल्ले...तो सुरमा, तो चोळणा... ते जरीचं जाकीट ..अगदीं बेमालूम होतं सगळं !

टॅक्सी त्या बंगलीच्या रोखानं भरधांव निघाली. अब्दुल तिथं जाऊन पोंचला तों साडेनऊ होऊन गेले होते. तो टॅक्सीतनं उतरला तों मेहेरची मावशी समोरून येतांना त्याला दिसली. टॅक्सीतनं उतरणाऱ्या त्या दौलतमंद इसमावर तिची नजर गेली. ती जवळ येतांच आवाज बदलून 'तल्यारखाननं' तिला विचारलं,

' बूबी ! हम मजा करना चाहता है ! पेशावरसे बंबई आया !...

' आपका नाम ? '

' तल्यारखान '

' जी ! आइये ! कितने रुपये ? '

तल्यारखाननं चटकन शंभर रुपयांची नोट तिच्या हातावर ठेवली न् म्हटलं, ' खूबसूरत औरत चाहता है ! '

ती नोट पाहातांच मावशीच्या तोंडचं पाणी पळालं. ती त्याला आर्जवून म्हणाली, ' आइये ! हुजूर ! '

तीच बंगली. तीच दिवाणखाना. तल्यारखान कोचावर बसला. मावशी त्याला म्हणाली,

' अभी आही जाएगी '

'नहीं ! यहाँ नहीं ! किसी छोटे कमरे में !'

'अच्छा ! अंदर जाइए !'

त्यानं दुसरी शंभराची नोट मावशीच्या हातावर ठेवली. तो आंत गेला मेहेर त्याच्याकडं पाठ करून पलंगावर बसली होती. त्यानं आंत जातांच खोलीचं दार लावून घेतलं. त्याला पाहातांच मेहेर उभी राहिली. तिच्याजवळ जाऊन एकदम तिचा हात हातात घेत तो म्हणाला.

'मेहेर ! मला ओळखलं नाहींस ?'

मेहेर आश्चर्यानं त्याच्याकडं पाहातच राहिली. त्यानं आपला फेटा... आपल्या मिशा बाजूला काढून ठेवल्या. त्याला पाहातांच मेहेर आश्चर्यानं उद्गारली, 'कोण अब्दुल ? दुष्ट, पाजी, फसवा. अब्दुल ! तूं मला फसवलंस !..'

तिचे तें करुणार्त शब्द ऐकून अब्दुलच्या डोळ्यातनं घळघळां अश्रु ओसरतात त्याला रडत असलेला पाहून मेहेरही रडूं लागते. तिचे हुंदके संपल्यावर अब्दुल आपला पाय पुढं करतो. त्यावर एक बँडेज बांधलेलं असतं अब्दुल तिला सगळी घडलेली गोष्ट सांगतो. खिशांत हात घालून तो एक कागद बाहेर काढतो. मेहेर त्याला विचारते, 'काय आहे तें ?'

'दवाखान्यांतल्या ॲडमिशनचा कागद.'

'नको, नको, मला दाखवूं नका.'

'कां ? तुझा माझ्यावर विश्वास आहे ना ?'

'अब्दुल ! आतां माझा जगावरचाच विश्वास उडालाय्. तुम्ही प्रामाणिक असाल, आहांतच ! पण, माझं नशीब ? तें फुटकं आहे. त्याला तुम्ही काय करणार ?'

'तूं असं कां बोलतेस, मेहेर ! आयुष्यांत माणसाला जखमा ह्या व्हायच्याच !...'

'पण, हृदयाची जखम ?'

'ती सुद्धां भरून निघेल. मेहेर, आपण अजूनही सुखी होऊं.'

'छेः छे :! ते शक्य नाहीं आता ! अब्दुल ! तें शक्य होतं. पण फक्त एक दिवस न् एकच रात्र ! आतां तें अशक्य आहे ! ...'

'मेहेर ! तूं वेडी आहेस' अब्दुलनं तिला आपल्या छातीशीं लावलं, वळ आलेल्या तिच्या पाठीवर प्रेमानं हात फिरविला अन् तिच्या ओठावर ओठ टेकल्यावर तिला तो म्हणाला,

'मेहेर ! तुझी सुटका केल्याखेरीज मी अन्न घेणार नाहीं ! मेहेर ! आपण पुनः पळून जाऊं ! ..'

'अब्दुल ! तुम्ही पागल आहांत ! एकदा तमाशा झाला तो पुरे...'

'मेहेर ! माझ्यावर विश्वास ठेव. यावेळेला ईश्वर आपल्याला दगा देणार नाहीं ! अल्ला आपला पाठीराखा आहे...'

'नको, नको,'

'मेहेर ! लक्षांत ठेव ! मी प्रतिज्ञा केली आहे ! मी अन्न घेणार नाहीं ! मी या ठिकाणी मरेन ...'

'असं बोलूं नका. मी तुमच्याबरोबर येते. पण ...'

'पण, काय ?'

'माझं प्रेम...मला लग्नाचा आग्रह करूं नका'

'तूं वेडी आहेस. तूं भावविवश झाली आहेस. प्रथम आपण येथून जाऊं. सरळ घरीं जाऊं मग तें विचार...'

अब्दुलनं बाहेर निघण्याची तयारी केली. फेटा चढवला. मिशा फेकून दिल्या. त्याचा पाय दुखत होता तरी तो खिडकीपाशीं गेला. त्यानं बाहेर पाहिलं. सर्वत्र शुकशुकाट. बारा वाजून गेले असावेत. खिशांतनं त्यानं एक जाड दोरी काढली. तो मेहेरला म्हणाला

'तूं आज आधीं उत्तर. सरळ पुढं चालायला लाग. मी लगेच येतो. माझा पाय दुखावल्यामुळं...'

दोरीच्या सहाय्यानं मेहेर उतरली. ती जिना उतरून खाली गेली. ती दिसेनाशी झाल्यावर अब्दुल उतरला. त्यानं हलकेच दोरीला धरून उडी मारली पण त्याचा वजनदार फेटा निसटला तो एकदम खाली...तो वजनदार फेटा पडला तो एका कुत्र्याच्या अंगावर! तें विचित्र वजनदार 'लोढणं.' अंगावर पडतांच कुत्रं किंचाळून ओरडलं. कुत्र्याचंच किंचाळणं तें! तें कधीं लवकर थांबणार आहे का? सगळी चाळ जागी झाली. मावशी बाहेर आली, अब्दुल धावत सुटला. पण—

पांचच मिनिटांत अब्दुल अन् मेहेरला त्या माणसांनीं पकडलं. मावशी अब्दुल अन् मेहेर—ते त्रिकूट पोलीस स्टेशनच्या रोखानं निघालं.

सबइन्स्पेक्टर डिसोझा डुलक्या घेत पडला होता. तो जागा झाला तो मेहेरच्या हुंदक्यानीं अन् तिच्या मावशीच्या किंचाळण्यानं. मावशीनं आपलं गाऱ्हाणं पुढं मांडलं. तिचं म्हणणं होतं की अब्दुलवर माझ्या भाचीला फूस लावून पळविल्याच्या गुन्ह्याबद्दल ताबडतोब शिक्षा होईल अशी फिर्याद गुदरली पाहिजे. तिचा तो अवतार पाहून अब्दुलचं डोकं संतापान भडकलं, पण आता शांततेनंच काम साधेल हे तो ओळखून होता. तोंच त्याच्या मनात एक कल्पना चमकून गेली न् तो मिस्टर डिसोझाला इंग्रजीत म्हणाला.

'माझं म्हणणं ऐकून घ्याल काय?'

'हो तर! अवश्य!' डिसोझा म्हणाला,

'हें पहा, मिस्टर डिसोझा! ही बयाच खरी गुन्हेगार आहे! या मुलीला फसवून दिल्लीहून येथं आणलं-अन् जबरदस्तीनं तिच्या इच्छेविरुद्ध तिला या व्यवसायात घातलं. तिच्यावर नाहीं नाहीं ते जुलूम केले, खोटं वाटत असेल तर त्या मुलीलाच तुम्ही विचारा.'

डिसोझा तें ऐकून चकित झाला. त्यानं मेहेरला विचारलं, ' मिस् मेहेर! तुमचं काय म्हणणं आहे ! '

मेहेरनं मोडक्या इंग्रजींत डिसोझाला आपल्या जीविताची कहाणी सांगितली. तें ऐकून डिसोझाच्या पोलीसी हृदयालासुद्धा पाझर फुटला. त्याच्या चेहेऱ्यावरचे भाव अब्दुलला अनुकूल होत असलेले पाहून मावशी घाबरली. सगळी हकीगत ऐकून घेतल्यानंतर डिसोझानं मावशीला दरडावून विचारलं.

' बोलो ! इस लडकी को तुम दिल्ली से यहाँ क्यॅव लाये ? '

सगळा डाव आपल्यावरच उलटलेला पाहून मावशीनं दोन शंभराच्या नोटा डिसोझाच्या पुढयांत टाकल्या अन् हात जोडून म्हणाली,

' मुझे जाने दो ' मेरी कोई शिकायत नहीं...'

ते शब्द उच्चारतांच ती म्हातारी बया त्या पोलिसस्टेशनमधून बाहेर पळाली,

' मी तुमचा फार आभारी आहे ' अब्दुल डिसोझाकडं पाहून म्हणाला. मेहेरनं त्याच्याकडं एक कृतज्ञतेच्या कटाक्ष टाकला. नंतर तीं दोघेही बाहेर आली.

पश्चिमेच्या बाजूनं आकाश फटफटत होतं थोडयाच वेळांत पूर्वेचं क्षितिजही उजळलं. ट्रॅम्स सुरू झाल्या होत्या पक्ष्यांचा किलबिलाट सुरू झाला होता

' सुटलों बुवा ! ' अब्दुल हंसत उद्गारला.

' मी पण सुटल्यें ! ' मेहेरनं पुस्ती जोडली.

' आतां आपण घरीं जाणार !. '

' छेः छेः ! आतां--' मेहेरनं तीव्र नापसंती दर्शविली.

' वा ! ' अब्दुल म्हणाला ' उद्यां आपण जन्माचे सोबती होऊं.. अम्माजानच्या आशा पूर्ण होतील. '

' अब्दुल, तें शक्य नाहीं ! मला तुमच्याशीं लग्न करायचं नाही. अब्दुल ! मी पतित आहे ! भ्रष्ट आहे ! वेश्या होतें मी ! तुमच्याशीं कोणत्या

तोंडानं संसार करूं ? अब्दुल ! तें आतां शक्य नाहीं. . तें शक्य होतं. पण, एक दिवस न एक रात्र ! त्यानंतर पुनः माझे डोळे उघडले...'

'मेहेर, हें तूं काय बोलतेस ?'

'अब्दुल ! खरंच ! मला तें शक्य नाहीं ! तुम्ही माझी सुटका केलीत, पुनर्जन्म दिलांत...तुमचे उपकार मी कधीं विसरणार नाहीं. पण, मला माझ्या पापाचं क्षालन करूं द्या...मी शाळेंत शिक्षिका होईन, लोकसेवा करीन मला माझ्या मार्गानं जाऊं द्या .'

अब्दुलचे डोळे भरून आले. मेहेरच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या.

ती दोघं स्टेशनवर गेली. अब्दुलनं तिला दिल्लीचं तिकीट आणून दिलं गाडी सुटतांना तो म्हणाला, "पोंचल्याचं पत्र पाठव."

आठ दिवसांनंतर अब्दुल एक निळं पाकीट फोडून पत्र वाचीत होता. तें पाहून त्याच्या आईनं त्याला विचारलं,

'अब्दुल ! मेरी बहु कब आयेगी ? किसका खत है ?'

'यूँवही ! अब्दुल उत्तरला अन् त्याच्या मनांत आलं.. नशीबानं दगा दिला नसता तर !...एक रात्र अन् एक दिवस !......'

# ११. क्रीमची करामत !

बंगलोरच्या ‘ कॅफे यूनिक ’ मध्यें मी पाऊल टाकलं मात्र, माझ्या एकेक वस्तु ‘ लंपास ’ व्हायला सुरुवात झाली.

बंगलोरचं तें हॉटेल मला फार आवडे. बंगलोरचा दोसा अन् इडली यांच्यावरून मला जीव कुर्बान करावासा वाटे. या दक्षिणी चिजांच्या खुमारीवरच ‘ कॅफे यूनिक ’ चं असामान्यत्व अवलंबून होतं. अन या ‘ कॅफे ’ चे मालक शरणाप्पाशेट म्हणजे लाखांतला माणूस ! त्यांनीं एवढं मोठं टोलेजंग हॉटेल बांधलं तरी आमच्यासारख्या जुन्या गिऱ्हाइकांना ते विसरले नव्हते. केव्हांहि बंगलोरला जा, शरणप्पा मुक्त हास्य करून स्वागताला तयार ! त्यांच्या आवडत्या ‘ टर्यमे ’ ( ‘ टॉम ’ चं कानडी नांव ) नंसुद्धां मला लळा लावला होता ! तिसऱ्या मजल्यावर मला एक खास खोली मिळत होती, घरच्यासारखा पाहुणचार लाभत होता, कानडी पिठलं खायला मिळत होतं !

पण, यावेळीं येऊन पहातों तों सगळाच चमत्कार ! ‘ कॅफे यूनिक ’ चे फायरमन प्रो० पत्रावळी सुतकी चेहरा करून बसले होते. पत्रावळी लाकूड फाट्याच्या वखारींचे प्रोप्रायटर होते. कॅफेच्या शेजारींच त्यांची वखार–म्हणजे फायरवुड स्टॉल—होती कॅफेच्या अन् वखारीच्या मध्यें एक लहानसं मंदिर होतं. त्या मंदिराभोंवतीं छातीएवढया उंच भिंतीचं कंपाउंड नुकतंच तयार केलेलं दिसत होतं त्या भिंतीकडं वळून आमचे दांरत प्रोप्रायटर पत्रावळी देवाची करुणा भाकीत होते. कॅफेच्या तिकडच्या भागाला पांडुरंगी चितावरमचं ‘ प्रोव्हिजन स्टोअर ’ होत. एरंडेल तेलापासनं अत्तरापर्यंतच्या सगळया वस्तु त्याच्या स्टोअरमध्यें होत्या. त्याच्या दुकानात काण गर्दी असायची ! पण, आतां पाहातों तों पांडुरंगी दुकानांत पूजा करीत बसलेले ! कॅफेच्या समोर भाशूची “ भाष्यम रसवंती ” होती. आमचा भाशू म्हणजे मोठा रसिक प्राणी ! ‘ भाशूचा सोडा अन् अपचनाला सोडा ! ’ ही गोष्ट सर्वतोमुखीं झाली होती. सोडा, लेमन, रस, ड्रिंक्सचं त्याचं दुकान खूर लोकप्रिय होतं पण, आता पाहातों तों भाशू मारुतीच्या फोटोला फुलं वाहात असलेला दृष्टीस पडत होता !

आतांपर्यंत केवळ पैशाचीच पूजा करणाऱ्या या लोकांना हें झालंय् तरी काय असा विचार माझ्या मनांत आला. मी येऊन उतरलों तेव्हां शरणप्पा अन् त्यांच्या सौभाग्यवती कुठेंतरी बाहेर गेलीं होतीं खालच्याच मजल्यावर एका खोलींत मीं सामान ठेवलं अन् स्नान उरकून पत्रावळी—पाडुरंगी—भाष्यम् अन् मंडळीचा समाचार घ्यायचं ठरवलं. स्नान[illegible]ंत गेलों डोळे मिटून तोंडाला साबण लावला. नंतर तो भिंतीवर ठेवला डोळे उघडून पहातो तों साबण लपास सोपकेस बेपत्ता ! तो हातचलाखीचा प्रकार पाहून चारीमुंड्या चीत होण्याची माझ्यावर पाळी आली. ती भिंत म्हणजे पलिकडच्या देवळाचं कंपाउंड होतं. बंगलोरला येतांच झालेला तो अपशकुन पाहून माझ्या मनांत चर्र झालं

कपडे बदलून मी प्रोप्रायटर पत्रावळींकडं गेलों, कपाळावर हात टेकून ते बसले होते. त्यांनीं मान वर करतांच मी ओरडून म्हणालों,

“ हॅलो ! प्रोप्रायटर ! कसं काय आहे ? ”

“ ठीक आहे ! ” थंडपणानं पत्रावळी उद्गारले, “ केव्हां आलांत ? ”

“ आतांच आलों ! म्हटलं बरेच दिवस झाले बंगलोर आमच्या दौऱ्याच्या यादींत नव्हतं–तेव्हा म्हटलं यावं तुम्हाला भेटायला ! ”

“ छान् ” उसनं हंसू आणून पत्रावळी उद्गारले. त्यांची कळी खुलेनाशी पाहून मी विचारलं,

“ काय तब्येत ठीक आहे न ? ”

“ तर ! सर्वांची तब्येत उत्तम आहे. पण—”

“ सांगा ना पत्रावळी आम्हाला ! अहो, तुमची कळी आज खुललेली दिसत नाहीं ! कारण तर कळूं द्या ! —”

“ अहो, काय सांगणार डॉक्टर तुम्हाला ! आमचं नशीब फुटलं असंच म्हणायचं झालं ! रोज आमच्या स्टॉलमधनं माल चोरीला जातोय् ! गेल्या महिन्यांत चोवीस सागवानाचे ओंडके चोरीला गेले ! एककाची किंमत एकोणीस रुपये ! चारशें छप्पन रुपयांचं नुकसान झालं ! डोळ्यांत तेल घालून पहारा करतो तरी पत्ता लागत नाहीं ! पोलिसांत वर्दी दिली–अन् हात चोळीत बसलोंय् !”

" काय चमत्कार आहे ! " मी आश्चर्यचकित होऊन म्हणालों, " अहो, माझा साबण न् केस एका मिनिटांत न्हाणीघरातून लंपास झालीं आता ! "

" तरीच ? भुताटकी आहे कीं काय कुणास ठाऊक ! डॉक्टर, गेला महिनाभर सारखं असं चालू आहे ! सगळेजण ईश्वरावर भरोसा ठेऊन आहेत... "

पद्मावळीचे ते दैववादी उद्गार ऐकून मी पांडुरंगी चितांबरमच्या 'स्टोअर' मध्ये गेलो. पांडुरंगी जवळजवळ ध्यानस्थ बसले होते म्हणाना ! त्यांच्या लाडक्या पत्नीला मधूनच काहीतरी सांगायला ते आत जात, तोंवर बाहेरच्या टेबलवरनं काहींतरी लंपास होई ! ती संवय घालवणं त्यांना शक्य नव्हतं, पण त्यामुळं चोर मात्र चांगलाच माजला होता ! त्यानीं हरवलेल्या वस्तूंचं एक वहीखातंच उघडलं होतं .. ब्रश, ब्लेड, रेझर, उदबत्ती !

ती विलक्षण यादी पाहून झाल्यानंतर मी भाष्यम्च्या दुकानांत पाउल टाकलं. एका फुटक्या ग्लासात लेमन देत तो मला म्हणाला काय सांगावं ! माझ्या सगळ्या बाटल्या, ग्लास...एवढंच काय पण ऊंस सुद्धां चोरीला जातात ! कांहीं सुचत नाहीं...... "

पद्मावळी-पांडुरंगी-भाष्यम् प्रभृतींची ती केविलवाणी स्थिति पाहून मला फार वाईट वाटलं, या चोराचा छडा लावायचाच असा मी निश्चय केला अन् माझ्या खोलीवर परत आलों

शरणप्पांना मला पाहतांच फार आनंद झाला खरं म्हणजे मी एका औषधी कंपनीचा साधा फिरता एजंट. पण त्यांना मजबद्दल फार आपुलकी वाटे. त्याच्या सौभाग्यवतीहि माझ्या खोलींत आल्या. त्या उभयतांना मी विचारलं,

' कुठं गेला होतां एवढया सकाळीं ? "

" शेजारच्या देवळांत " त्या म्हणाल्या.

" अहो, या ठिकाणीं एक साधु पुरुष आले आहेत, " शरणप्पा आपल्या पत्नीकडं पाहात हंसत म्हणाले, " फार अधिकारी पुरुष ! त्या देवळाच्या ट्रस्ट-कडनं मी त्यांना पुजारीपण देववलं ! अन् आतां ते हिला एक गंमत देणार आहेत !.. "

शरणप्पा खो खो हंसू लागले मीहि पोट धरून हंसलों. सौ शरणप्पा त्या वयांतही एखाद्या षोडषीसारख्या लाजल्या न् निघून गेल्या शरणप्पांना मूल नव्हतं अन् अशारीतीनं त्याचे पुष्कळ प्रयत्न चालले हाते शरणप्पांनीं त्या साधु पुरुषाचं खूप गुणवर्णन केलं त्यांची ती हातभर शेंडी, वीतभर दाढी, ब्रह्मचर्याचं तेज...शरणप्पा पुरते भारून गेले होते !

दुसरे दिवशीं शरणप्पाच्या आग्रहावरून मी त्याच्याबरोबर बुवांच्या दर्शनाला गेलों बुवा एकटे राहात. केवळ फलाहार करीत त्याची खोली त्या भिंतीच्या अगदीं जवळ होती पालकडं पत्रावळींची वखार, आजूबाजूला 'कॅफे' अन् पांडुरंगींचं 'स्टोअर'! समोर भाष्यम्! माझ्या चौकस दृष्टींतून ती विवक्षित जागा सुटली नाहीं बुवांनी वेदान्तावर कानडीन एक व्याख्यान झोडलं, तें झाल्यावर मी त्यांचा निरोप घ्यायला उठलों—पाहतों तों एका कोनाड्यांत सेफ्टी रेझर !...

तो पहातांच माझ्या डोक्यांत एक विलक्षण कल्पना चमकून गेली. बुवांवर शरणप्पासहित पत्रावळी—पांडुरंगी—भाष्यम् सगळ्यांची भक्ति होती. काम एकंदरीत कठिण होतं. संध्याकाळीं त्या सर्वांना मी माझ्या खोलीवर बोलावलं न् म्हणालों,

"मंडळी ! मी तुम्हाला चोर धरून देईन !"

"ब्रव्हो !" भाश्र ओरडला.

"पण, तुम्हाला माझी फी द्यावी लागेल ! फार नाहीं अवघी अडीच रुपये !" असं म्हणून मी माझ्या पेटींतून दोन बाटल्या बाहेर काढल्या अन् त्यांच्या पुढ्यांत धरल्या. एक सुगंधी तेलाची होती अन्

दुसऱ्या बाटलींत डेपिलेटरी क्रीम होतं. केसांची एकजात, एकदम, नेहमी-करितां खच्ची करण्याचं सामर्थ्य त्या जहाल क्रीममध्यें होतं त्या दोन बाटल्या त्यांच्या पुढ्यांत धरून मी म्हणालों,

"या आयुधांच्या जोरावर मीं तुम्हाला चोर मुद्देमालासकट धरून देतों ! ठेवा माझी फी !"

अडीच रुपय ठेऊन पत्रावळी–पांडुरंगी–भाष्यम् मंडळी निघून गेली.

संध्याकाळीं बुवा आमच्या न्हाणीघरात स्नानाला येत. अगदीं त्याचवेळीं मी हटकून तिथं गेलों नमस्कार चमत्कार करून मी सुगंधी तेलाची बाटली आग्रहानं बुवांच्या पुढ्यांत धरली. अत्याग्रहानंतर बुवांनीं आपल्या हातभर शेंडीला तेल चोपडलं त्याचा सर्वत्र दरवळलेला सुवास घेऊन बुवा उद्‌गारले, " छान आहे बाबा ! "

दुसरे दिवशीं मी चार वाजतांच उठलों. बुवा सकाळीं पांच वाजतां स्नानाला येत. त्या आधीं जाऊन मी स्नान उरकलं अन् तीच तेलाची बाटली त्या भिंतीवर मुद्दाम विसरून आलों पंधरा मिनिटांनीं बुवा न्हाणीघरांत आले कालची बाटली पाहून त्यांच्या ' तोंडाला पाणी ' सुटलं असावं. त्यांनीं तें तेल सर्वांगाला चोपडलं अन् पाण्याचा पहिला तांब्या घेऊन डोकं चोळायला आरंभ केला तोंच—त्यांची सगळी शेंडीं त्यांच्या हातांत आली !

दुसऱ्या क्षणीं त्यांची दाढी घसरून गळून पडली ! !

शरीरावरचे सगळे केस पाण्याबरोबर वाहून जाऊं लगले ! ! !

आपलें तोंड झांकून बुवा न्हाणीघरांतून पळालेले पाहातांच " काम फत्ते " म्हणून मी ओरडलों. पत्रावळी धांवले ! पांडुरंगी पळत आले ! भाष्यम् उड्या मारीत आला ! शरणाप्पा नाचत आले ! अन् आम्ही सगळे बुवांच्या खोलीवर गेलों

मला पहातांच बुवा रडूं लागले ! गयावया करूं लागले ! त्याच दिवशीं पत्रावळींचे सगळे ओंडके, पांडुरंगींचा रेझर अन् भाष्यम्‌च्या सगळ्या सोड्याच्या बाटल्या परत मिळाल्या. तेलाच्या बाटलींतच डेपिलेटरी क्रीम घालून वर थोडा तेलाचा थर ठेवला होता. अंधारांत बुवांना तें कांहीं दिसलं नाहीं... अन् ते आपली शेंडी न् दाढी गमावून बसले !

बुवांची शेंडी अन् दाढी गेली पण, त्यांचं खरं स्वरूप जगाला कळून आलं ! आहे कीं नाहीं ही डेपिलेटरी क्रीमची करामत ?

---

# ना ग पू र प्र का श न

## सी ता ब र्डी, ना ग पू र

★

## प्रकाशित वाङ्मय

| | | |
|---|---|---|
| १ | माझें कादंबरी लेखन | १।। |
| २ | वीणा | ३. |
| ३ | लढवय्ये | ३ |
| ४ | शककर्ता शालिवाहन | २।। |
| ५ | परामर्श | ३ |
| ६ | प्रमद्वरा | २।। |
| ७ | द्राविडी प्राणायाम | २। |
| ८ | अमावास्या | २।। |
| ९ | कंगाल | १। |
| १० | अडेलतट्टू | ४ |
| ११ | प्रत्यय | २।। |
| १२ | पुनः एकदां | ४ |
| १३ | माझी शीला | १।। |
| १४ | मृगाचा पाऊस | २ |
| १५ | दोन घडीचा डाव | ३। |
| १६ | म्हणे लढाई संपली | १।। |
| १७ | लांब लांब सांवल्या | २ |
| १८ | तेरी चूप मेरी चूप | २ |
| १९ | दोन प्रख्यात युद्धतंत्रें | २ |
| २० | सन १८५७ चें स्वा. यु. | -।।- |
| २१ | नवीं मूल्यें | ४ |
| २२ | सखी | ३। |
| २३ | सांवलीच्या उन्हांत | ३ |
| २४ | जीवनप्रवाह | २।। |
| २५ | हंसदूत | २। |
| २६ | मार्क्सवादी अभ्यासक्रम | १।। |
| २७ | तिसरें राज्य | -।।= |
| २८ | इंदिरा | २।।। |
| २९ | गोल देऊळ | ३ |
| ३० | दूर कुठें तरी | २।।। |
| ३१ | जगाला कळलं पाहिजे | ३।। |
| ३२ | कालसमुद्रांतील रत्नें | ४ |
| ३३ | लकेरी | २।। |
| ३४ | मधु | २।। |
| ३५ | विचित्रिता | २ |
| ३६ | पहिला कवि | १।।। |
| ३७ | शापित आणि उःशापित | २ |
| ३८ | कोणी कुणाचें नव्हे | ५ |
| ३९ | रान गुलाब | २।। |
| ४० | मी एकटीच जाणार | ३ |
| ४१ | शलाका | २ |